सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | शुक्रवार, १७ जानेवारी २०२५ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४१ वे अंक ७२ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### शेअर बाजार तेजीसह बंद

**मुंबई** : देशांतर्गत शेअर बाजार गुरुवारी सलग तिसऱ्या दिवशी तेजीसह बंद झाला. दिवसभर चांगल्या रेंजमध्ये व्यवहार केल्यानंतर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक ३०९ अंकांनी वाढून ७७,०४३ वर बंद झाला, तर राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीत ९९ अंकांची वाढ झाली. दिवसअखेर निफ्टी २३,३१२ वर स्थिरावला. निर्देशांकातील ३० पैकी २० कंपन्यांचे शेअर्स नफ्यात होते. निफ्टीतील ५० पैकी ३३ शेअर्स तेजीत राहिले. निर्देशांकातील अदानीचे शेअर्स सर्वाधिक २.०३ टक्के वाढीसह बंद झाले. सर्वाधिक घसरण एचसीएलच्या शेअर्समध्ये दिसून आली.



### विदर्भासह महाराष्ट्रात दोन दिवस पावसाचे

**पुणे** : विदर्भासह संपूर्ण राज्यात ढगाळ हवामान राहणार असून, पुढील ४८ तासांत पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. थंडीचा जोर ओसरणार आहे तसेच किमान पाच दिवस असेच वातावरण कायम राहणार आहे. पुणे वेध शाळेने दिलेल्या माहितीनुसार राज्यात बहुतांश भागांत थंडीचा जोर ओसरला आहे. गेल्या तीन दिवसांत राज्यात किमान तापमानात दोन ते तीन अंश सेल्सिअसची घसरण झाली आहे. चक्राकार वाऱ्यांची स्थिती निर्माण झाल्यामुळे राज्यात ढगाळ वातावरण निर्माण झाले असून, पावसाची शक्यता आहे. नागपूर, अकोला, अमरावती, गोंदिया, भंडारा, गडचिरोली जिल्ह्यासह पश्चिम, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

### कोला, पेप्सीचा बाजार उठणार?

**मुंबई** : रिलायन्स इंडस्ट्रीजने शीतपेयांच्या क्षेत्रात पदार्पण केले आणि स्वत:चा कॅम्पा कोला ब्रॅण्ड विकसित केला. आता अंबानी आपले हे उत्पादन मध्यपूर्वेकडील देशात नेण्याच्या तयारीत आहेत. कारण, तेथील सरकारने अमेरिकी उत्पादनांवर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे कोका कोला आणि पेप्सिको यांचा मध्य पूर्वेतील बाजार उठणार, हे जवळपास निश्चित झाले आहे. त्याचा फायदा अंबानी घेणार असून, त्यांचे उत्पादन मध्यपूर्वेत जम बसवेल, अशी योजना तयार करण्यात आली आहे.

### व्हॉट्सॲपवर सेल्फी स्टिकर्स तयार करता येणार

**नवी दिल्ली** : इन्स्टंट मेसेजिंग प्लॅटफॉर्म व्हॉट्सॲपचे वापरकर्ते आता सेल्फी स्टिकर्स तयार करू शकणार आहेत. तुम्ही इतरांसह स्टिकर पॅक शेअर करण्यास सक्षम असाल. यासोबतच फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी नवीन फिल्टरचा पर्यायही उपलब्ध झाला आहे. मेटाने व्हॉट्सॲपमध्ये एक नवीन अपडेट आणले आहे, ज्याद्वारे ही वैशिष्ट्ये जोडण्यात आली आहेत. व्हॉट्सॲपने एका ब्लॉग पोस्टमध्ये लिहिले की, आम्ही नेहमी व्हॉट्सॲपला अधिक मजेदार आणि वापरण्यास सुलभ बनवण्यासाठी काम करीत असतो, त्यामुळे आम्ही नवीन वर्षाची सुरुवात नवीन वैशिष्ट्यांसह आणि तुमच्या अनुभवामध्ये सुधारणा करण्यासाठी करीत आहोत.

### आलोक आराधे मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश

**मुंबई** : मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी तेलंगणा उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक आराधे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यमान मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांची दिल्ली उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी बदली करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निवड मंडळाने ७ जानेवारी रोजी आराधे आणि उपाध्याय यांच्या नावाची शिफारस केली होती. न्या. आराध यांची २००९ मध्ये मध्यप्रदेशच्या उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली होती.

### राजस्थानातील तीन विद्यापीठांत पीएच.डी. अभ्यासक्रमावर मनाई

**जयपूर** : विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात् यूजीसी राजस्थानमधील तीन विद्यापीठांना पदवीच्या अखंडतेशी तडजोड केल्याचे आढळून आल्यानंतर पुढील पाच वर्षांसाठी त्यांना पीएच.डी. अभ्यासक्रम देण्यास मनाई केली आहे. यूजीसीच्या स्थायी समितीला असे आढळून आले की, विद्यापीठांनी पीएच.डी. पदवी प्रदान करण्यासाठी यूजीसीच्या नियमांचे आणि शैक्षणिक मानदंडांचे पालन केले नाही.

# केंद्राची आठव्या वेतन आयोग स्थापनेला मंजुरी

## २०२६ पासून लागू होतील शिफारशी
## केंद्रीय कर्मचाऱ्यांना मिळणार लाभ

◆ **नवी दिल्ली, १६ जानेवारी**
केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेला केंद्र सरकारने गुरुवारी मंजुरी दिली. या आयोगाच्या शिफारशी २०२६ पासून लागू केल्या जातील. मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले की,२०१६ मध्ये सातवा वेतन आयोग लागू झाला असून, त्याच्या शिफारशी २०२६ पर्यंत सुरू राहतील. एक कोटी सरकारी कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे.

केंद्र सरकार दर १० वर्षांनी नवीन वेतन आयोग आणते. सध्या सातवा वेतन आयोग सुरू आहे, त्याचा कार्यकाळ ३१ डिसेंबर २०२५ रोजी संपणार आहे. १ जानेवारी २०२६ पासून आठवा वेतन आयोग लागू होईल, अशी अपेक्षा आहे. आठव्या वेतन आयोगाचे वेतन मॅट्रिक्स १.९२ च्या फिटमेंट फॅक्टर वापरून तयार केले जाईल. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगाराचे १८ स्तर आहेत. लेव्हल-१ कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन १८,००० रुपये आहे आणि १८०० रुपये ग्रेड पे आहे. आठव्या वेतन आयोगाअंतर्गत ते ३४,५६० रुपये केले जाऊ शकते. त्याचप्रमाणे केंद्रात कॅबिनेट सचिव स्तरावरील अधिकाऱ्यांना लेव्हल-१८ अंतर्गत कमाल मूळ वेतन २.५ लाख रुपये मिळते. हे अंदाजे ४.८ लाख रुपयांपर्यंत वाढू शकते. (वृत्तसंस्था)





जर आठवा वेतन आयोग जानेवारी २०२६ मध्ये लागू झाला, तर केंद्रीय कर्मचाऱ्यांचे किमान वेतन ३४,५६० रुपये असेल असा अंदाज आहे. जर आपण २००४ जोडले तर, २५ वर्षे सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांची पहिली तुकडी २०२९ मध्ये निवृत्त होईल. समजा आठवा वेतन आयोग लागू झाल्यानंतर, लेव्हल-१ कर्मचाऱ्याचा मूळ पगार ३४,५६० रुपये झाला, तर त्याच्या रकमेच्या ५० टक्के रक्कम १७,२८० रुपये आहे. यानुसार, कर्मचाऱ्याला पेन्शन म्हणून १७,२८० रुपये अधिक डीआर रक्कम मिळेल. तथापि, केवळ क्वचित प्रसंगीच एखादा कर्मचारी, लेव्हल-१ वर नोकरीत रुजू झाल्यानंतर, सेवानिवृत्तीपर्यंत त्याच स्तरावर राहील. पदोन्नती आणि इतर नियमांनुसार ही पातळी वेळोवेळी वाढत राहते. त्यामुळे कर्मचाऱ्यांना पेन्शन म्हणून जास्त रक्कम मिळेल. त्याचबरोबर लेव्हल-१८ कर्मचाऱ्यांचे मूळ वेतन ४.८० लाख रुपये असेल. या एकूण २.४० लाख रुपयांच्या ५० टक्के रक्कम + डीए पेन्शन म्हणून दिली जाईल.

### नव्या वेतन आयोगात पगार कसा ठरणार?

एप्रिल २०२५ पासून आठवा वेतन आयोग लागू होण्याची फारशी आशा नाही, कारण आतापर्यंत सरकारने यावर कोणताही मोठा निर्णय घेतलेला नाही. अशा परिस्थितीत १ जानेवारी २०२६ पासून तो लागू होण्याची शक्यता आहे. आठवा वेतन आयोग लागू झाल्यावर, विशेष फिटमेंट फॅक्टरच्या आधारे सरकारी कर्मचाऱ्यांच्या पगारात सुधारणा केली जाईल. समजा, सध्याच्या सातव्या वेतन आयोगाअंतर्गत वेतन सुधारणेसाठी २.५७ चा फिटमेंट फॅक्टर लागू केला गेला आहे.

# स्पॅडेक्स मोहीम यशस्वी!

## अंतराळात 'डॉकिंग' करणारा भारत ठरला चौथा देश




◆ **बंगळुरू, १६ जानेवारी**
भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात् इस्रोने अंतराळात दोन उपग्रहांची गुरुवारी यशस्वी 'डॉकिंग' चाचणी करीत नवीन इतिहास रचला आहे. अमेरिका, रशिया आणि चीननंतर भारत अंतराळ डॉकिंगमध्ये प्रभुत्व मिळवणारा चौथा देश ठरला, अशी माहिती इस्रोने 'एक्स'वर पोस्ट करीत दिली. मिळवलेल्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू व इतर मान्यवरांनी इस्रोचे अभिनंदन केले.

**इस्रोने घडविला नवीन इतिहास**

भारताची महत्त्वाकांक्षी स्पॅडेक्स मोहिमेचे श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून ३० डिसेंबर रोजी प्रक्षेपण करण्यात आले होते. या मोहिमेत पीएसएलव्ही रॉकेट वापरून सुमारे २२० किलो वजनाचे दोन उपग्रह प्रक्षेपित करण्यात आले. चेसर आणि टार्गेट असे हे उपग्रह ४७० किलोमीटर उंचीवर इस्रोच्या माध्यमातून यशस्वीपणे 'डॉक' करण्यात आले.

भारताच्या अवकाश तंत्रज्ञातील ही कामगिरी उल्लेखनीय आहे. कारण रशिया, अमेरिका आणि चीन या तीन देशांनी यापूर्वी अशा गुंतागुंतीच्या स्पेस डॉकिंग तंत्रांमध्ये प्रभुत्व मिळवले आहे. त्यानंतर भारताने देखील डॉकिंग प्रात्यक्षिक यशस्वीरीत्या पूर्ण करून जागतिक स्तरावर अवकाश क्षेत्रात मैलाचा दगड पार केला

**'स्पॅडेक्स' तंत्रज्ञान मोहिमांसाठी अत्यावश्यक**

भारताच्या डॉकिंग प्रात्यक्षिकांच्या यशस्वी प्रयोगामुळे इथून पुढील अनेक अवकाश मोहिमांमधील उद्दिष्टे पार करण्यास मदत होणार आहे. चंद्रावर भारतीयांचे स्थलांतर, चंद्रावरून नमुने परत करणे, अंतराळ केंद्राची उभारणी आणि ऑपरेशन इत्यादी भारताच्या महत्त्वाकांक्षी अंतराळ मोहिमांसाठी हे तंत्रज्ञान आवश्यक आहे. (वृत्तसंस्था)

### मोहिमेची अशी आहेत उद्दिष्टे

स्पॅडेक्स मोहिमेचे प्राथमिक उद्दिष्ट म्हणजे कमी-पृथ्वी वर्तुळाकार कक्षेत दोन लहान अंतराळयानांच्या चेसर आणि टार्गेट यांची भेट, डॉकिंग आणि अनडॉकिंगसाठी असलेले तंत्रज्ञान विकसित करणे आणि प्रदर्शित करणे. या मोहिमेच्या दुय्यम उद्दिष्टांमध्ये डॉक केलेल्या अंतराळयानांमधील विद्युत ऊर्जेच्या हस्तांतरणाचे प्रात्यक्षिक, जे भविष्यातील अंतराळातील रोबोटिक्स, संमिश्र अंतराळयान नियंत्रणासाठी महत्त्वपूर्ण राहील आणि अनडॉकिंगनंतर पेलोड ऑपरेशन्स अनुप्रयोगांसाठी आवश्यक आहे, असे देखील इस्रोने म्हटले आहे.

# सैफ अली खानवर घरात घुसून हल्ला

## पाठीत अडकला होता चाकूचा तुकडा
## हात-खांद्याचीही शस्त्रक्रिया
## आरोपीची ओळख पटली

◆ **मुंबई, १६ जानेवारी**
बॉलिवूड अभिनेता सैफ अली खानवर घरात घुसून चाकूने हल्ला करण्यात आला. बुधवारी पहाटे दोनच्या सुमारास मुंबईच्या खार येथील गुरू शरण अपार्टमेंटच्या बाराव्या मजल्यावर ही घटना घडली. या हल्ल्यावरून राजकारण पेटले. सैफवरील हल्ला गंभीर प्रकार असला, तरी मुंबई असुरक्षित असल्याचे म्हणणे चुकीचे ठरेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

या हल्ल्यात सैफच्या मान, पाठ आणि हातावर एकूण सहा वार करण्यात आले. लगेचच त्याला लीलावती रुग्णालयात नेण्यात आले. लीलावती हॉस्पिटलचे



सीओओ डॉ. नीरज उत्तमानी यांनी सांगितले की, सैफच्या पाठीच्या कण्याच्या बाजूला चाकूचा तुकडा अडकला होता. तो तुकडा शस्त्रक्रियेद्वारे काढण्यात आला आहे. अभिनेत्याच्या डाव्या हाताला दोन खोल जखमा आणि मानेवर खोल जखम होती. तेथे प्लॅस्टिक सर्जरी झाली आहे. आता त्याची प्रकृती स्थिर असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, शस्त्रक्रियेनंतर लगेचच त्याला अतिदक्षता विभागात हलवण्यात आले. रुग्णालयातून सुटी मिळण्यास एक ते दोन दिवस आणखी लागणार आहेत.

मुंबई पोलिसांचे डीसीपी गेडाम यांनी सांगितले की, हल्लेखोराची ओळख पटली आहे. तो पायऱ्यांवरून अपार्टमेंटमध्ये शिरला होता. सैफ अली खानवर हल्ला करणारी व्यक्ती सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे. इमारतीच्या सहाव्या मजल्यावर तो दिसला. हल्लेखोराने पळून जाण्यासाठी पायऱ्यांचा वापर केला. पोलिसांनी जबरदस्तीने घरात घुसल्याचा आणि खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. ही घटना सैफ-करिनाची मुले तैमूर-जेहच्या खोलीत घडली. खोलीत त्यांची घरकाम करणारी अरियामा फिलिप उपस्थित होती, तिला अज्ञात व्यक्तीने पकडले. त्यांचा आरडाओरडा ऐकून सैफ मुलांच्या खोलीत पोहोचला. (वृत्तसंस्था)

### मोलकरणीसह तीन जणांची चौकशी

पोलिसांनी सांगितले की, सैफच्या घरातील तीन जणांना चौकशीसाठी पोलिस ठाण्यात नेण्यात आले आहे. यामध्ये हल्ल्यात जखमी झालेल्या घरातील नोकराचाही समावेश आहे. घरात कामाला असलेल्या कुणीतरी हल्लेखोराला प्रवेश दिल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मोलकरणीला हल्लेखोराने ओलिस ठेवून एक कोटी रुपयांची खंडणी मागितल्याचे वृत्त समोर आले.

### पोलिस आणि गुन्हे शाखेची १८ पथके तपासात

हल्लेखोरांच्या शोधासाठी वांद्रे पोलिस स्टेशनने १० पथके तयार केली आहेत. या प्रकरणाच्या तपासासाठी गुन्हे शाखेने ८ पथकेही तयार केली आहेत. घटनेच्या तपासासाठी एन्काऊंटर स्पेशालिस्ट दया नायक घटनास्थळी दाखल झाले होते. हाय प्रोफाईल प्रकरण असल्याने यासंदर्भातील तपास वेगाने होईल, अशी आशा आहे.

# लाडक्या बहिणींना २६ जानेवारीपूर्वी मिळणार १५०० रुपयांचा हप्ता

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरेंची माहिती

**मुंबई, दि. १६ जानेवारी-**
लाडकी बहीण योजनेचा जानेवारीचा हप्ता कधी मिळणार? असा प्रश्न राज्यातील लाडक्या बहिणींना पडला होता. मात्र, आता लाडकी बहीण योजनेच्या जानेवारीच्या हप्त्याबाबत महत्वाची माहिती समोर आली आहे. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेचा जानेवारी महिन्याचा हप्ता कधी मिळणार? तसेच जानेवारीचा हप्ता लाडक्या बहिणींना १५०० रुपये मिळणार की २१०० रुपये? यासंदर्भातील माहिती आदिती तटकरे यांनी सांगितली आहे. २६ जानेवारीच्या आधी लाभार्थी महिलांना जानेवारी महिन्याचा लाभ मिळणार असल्याचं आदिती तटकरे यांनी स्पष्ट केले आहे.




लाडकी बहीण योजनेचा डिसेंबरचा हप्ता आपण २५ डिसेंबर ते ३० डिसेंबर या दरम्यान वितरीत केला होता. आता लाडकी बहीण योजनेचा जानेवारीचा हप्ता २६ जानेवारीच्या आधी वितरित करण्यात येईल. या संदर्भातील आर्थिक नियोजन आम्हाला अर्थखात्याकडून महिला व बाल विकास विभागाला प्राप्त झालेलं आहे. त्यामुळे लाडकी बहीण योजनेचा जानेवारी महिन्याचा लाभ देण्यास २६ जानेवारीच्या आधी सुरुवात होईल. त्यानंतर ३ ते ४ दिवसांत या योजनेचे पैसे महिला लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा होतील, असं आदिती तटकरे यांनी सांगितलं.

मला सर्व लाडक्या बहिणींना सांगायचे आहे की दर महिन्याला आपण महिना संपवायच्या आधी या योजनेचा लाभ देत असतो. आता जानेवारी महिन्याच्या हप्त्याच्या वितरणाची सुरुवात २६ जानेवारीच्या आधी करण्यात येणार आहे. आम्ही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार आम्ही या महिन्याच्या वितरणाला सुरुवात करणार आहोत, अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली.

### २१०० रुपये कधी मिळणार?

लाडक्या बहिणींना २१०० रुपये मिळणार की १५०० रुपये मिळणार? असा प्रश्न मंत्री आदिती तटकरे यांना माध्यमांच्या प्रतिनिधींनी विचारला असता आदिती तटकरे यांनी सांगितले की, याबाबत आम्ही आधीही अनेकदा स्पष्टीकरण दिलेलं आहे. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही स्पष्टीकरण दिलेलं आहे. नवीन अर्थसंकल्पात लाडक्या बहिणींना २१०० रुपये देण्याबाबतचा सकारात्मक विचार करण्यात येईल. मात्र, सध्या तरी लाडक्या बहिणींना १५०० रुपयांचा लाभ आपण देणार आहोत, अशी माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितली.

### माळशिरस पंचायत समितीमधील शाखा अभियंता अँटीकरप्शनच्या जाळ्यात

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. १६ जानेवारी-**
माळशिरस पंचायत समिती बांधकाम उपविभागातील कनिष्ठ अभियंता शशिकांत सयाजी चौगुले (रा. माळीनगर, ता. माळशिरस) पन्नास हजारांची लाच घेताना अँटीकरप्शनच्या जाळ्यात गुरुवारी दुपारी अडकला.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुण्याचे पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपअधीक्षक शितल दानवे, पोलीस उपअधीक्षक दयानंद गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. माळशिरस पंचायत समिती येथे लाचखोर शशिकांत सयाजी चौगुले यांनी तक्रारदारांना एक लाख रुपये लाचेची मागणी केलेली होती. तक्रारदारांनी केलेल्या कामाचे मोजमाप व बिले काढण्याकरता पैशाची मागणी केलेली होती. तक्रारदारांनी पन्नास हजार रुपये दिल्यानंतर अँटीकरप्शनच्या टीमने त्यांना जाळ्यात अडकवले.



गुरुवार असल्याने माळशिरस पंचायत समितीमध्ये सर्व अधिकारी उपस्थित असतात. भर दुपारी अँटीकरप्शननेलाचखोर शशिकांत सयाजी चौगुले यांना अडकविल्यांनंतर पंचायत समिती मोकळी झालेली होती. लाचलुचपत प्रतिबंधक अँटीकरप्शन सापळा विभागाचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे, पोलीस हवालदार शेलार, पोलीस कॉन्स्टेबल दिनेश माने, पोलीस नाईक किरण चिमटे यांच्या पथकाने कारवाई केलेली आहे.



सोलापूर : माजी महापौर महेश कोठे यांचे नुकतेच निधन झाले. राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी कोठे कुटुंबियांची सोलापुरात भेट घेऊन सांत्वन केले.

# गिफ्ट सिटीच्या धर्तीवर महाराष्ट्रातही होणार इनोव्हेशन सिटी : फडणवीस

**मुंबई, दि. १६ जानेवारी-**
राज्यातील स्टार्टअप इकोसिस्टमला चालना देण्यासाठी महाराष्ट्रात गुजरात इंटरनॅशनल फायनान्स टेक-सिटी (गिफ्ट सिटी) प्रमाणेच एक इनोव्हेशन सिटी स्थापन करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.



यावेळी फडणवीस यांनी, पुढील दोन महिन्यांत सरकार एक नवीन स्टार्टअप धोरण अंतिम करण्याची योजना आखत असल्याचे सांगितले. राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त मुंबईत आयोजित केलेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी १०० कोटी रुपयांचा निधी उभारण्यासाठी भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI) सोबत सामंजस्य करारचीही घोषणा केली. इनोव्हेशन सिटीबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करण्यासाठी आम्ही गिफ्ट सिटीप्रमाणे एक इनोव्हेशन सिटी तयार करणार आहोत. पुढील दोन महिन्यांत, महाराष्ट्र सरकारकडून सर्वात प्रगतीशील स्टार्टअप धोरण तयार केले जाईल आणि यामध्ये बदल सुचवण्यासाठी ते सर्वांना उपलब्ध करून दिले जाईल.

**मुंबई स्टार्टअप कॅपिटल**

गुंतवणूक आणि मूल्याच्या बाबतीत महाराष्ट्र हे पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे, त्यामुळे मुंबई स्टार्टअप कॅपिटल आहे, असेही देवेंद्र फडणवीसांनी म्हटले.महाराष्ट्र सरकारने सुरक्षा क्षेत्रासाठी फंड ऑफ फंड्स निर्माण केला आहे. त्याचबरोबर या क्षेत्रातील ३०० सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग आणि स्टार्टअप्सना राज्याच्या फंड ऑफ फंड्सद्वारे निधी देण्यात आल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# फोंडशिरस खून प्रकरण; तिघा सख्ख्या भावांना जन्मठेप

## माळशिरस जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे न्या. एल. डी. हुली यांनी सुनावली शिक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सदाशिवनगर, दि. १६ जानेवारी-**
राहत्या घराच्या जागेच्या वादातून फोंडशिरस (ता. माळशिरस) येथे झालेल्या खून प्रकरणातील तीन आरोपींना माळशिरस येथील जिल्हा व अतिरिक्त सत्र न्या. एल. डी. हुली यांनी जन्मठेप व प्रत्येकी पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

किसन महादेव वाघमोडे (वय २२), धर्मेंद्र महादेव वाघमोडे (वय २८) व अंकुश महादेव वाघमोडे (वय ३५, रा. फोंडशिरस, ता. माळशिरस) अशी शिक्षा झालेल्या तीन सख्ख्या भावांची नावे असून याबाबत मयताचा मुलगा बापू नाना वाघमोडे यांनी नातेपुते पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती.

फिर्यादी व आरोपी हे एकमेकांच्या शेजारी गट नं १४१३ राहण्यास आहेत. त्यांच्यामध्ये जमिनीचा वाद होता. फिर्यादीचे घर हे आरोपींच्या शेतात येत असल्याने व फिर्यादीची जनावरे आरोपी आमच्या जागेत बांधायची नाहीत, असे सांगत असल्याने फिर्यादी व आरोपी यांच्यात नेहमी वाद होत होता. १९ ऑक्टोंबर २०२१ रोजी सायंकाळी साडेचार वाजता फिर्यादी व आरोपी यांच्यात घर व जनावरे बांधण्याच्या कारणावरून वाद झाला. या वादाच्या वेळी आरोपी किसन वाघमोडे यांनी लोखंडी पाईपने फिर्यादीचे वडील नाना आण्णा वाघमोडे (वय ७०) यांच्या डोक्यात मारहाण केली, तर धर्मेंद्र वाघमोडे व अंकुश वाघमोडे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. डोक्यात जबरी मार बसल्याने नाना वाघमोडे यांच्या तोंडातून व डोक्यातून रक्त येऊन ते बेशुद्ध पडले. त्यांना नातेपुते येथील दवाखान्यात नेले. तेथून अकलूज येथील दवाखान्यात हलविण्यात आले असता ते मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबाबत मयताचा मुलगा बापू वाघमोडे यांनी तीन आरोपीच्या विरोधात नातेपुते पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. या खटल्यात सरकारी पक्षातर्फे ॲड. संग्राम पाटील व ॲड. सूर्यकांत ढवळे यांनी काम पाहिले तर फिर्यादी पक्षातर्फे ॲड. राजाभाऊ वाघमोडे यांनी काम पाहिले.

**नातवाची साक्ष ठरली महत्त्वाची**

या घटनेचा तपास नातेपुते पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज सोनवलकर यांनी केला. या खटल्यात इतर साक्षीदार तपासण्यात आल. यात मयताच्या नातवाची साक्ष महत्वाची ठरली. पोलिसांनी दाखल केलेले पुरावे व सरकारी वकिलांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हा व सत्र न्या. एल. डी. हुली यांनी किरण वाघमोडे, धर्मेंद्र वाघमोडे व अंकुश वाघमोडे या तिघांना जन्मठेप व पाच हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची सिंगापूरचे राष्ट्राध्यक्ष थरमन षण्मुगरत्नम् यांनी गुरुवारी नवी दिल्ली येथे भेट घेत चर्चा केली

# युद्धबंदी करारावर शिक्कामोर्तब नाही

## नेतान्याहू यांच्या कार्यालयाची माहिती ● अटींचे उल्लंघन केल्याचा हमासवर आरोप

◆ **दोहा, १६ जानेवारी**

हमास शेवटच्या क्षणी झालेल्या संघर्षातील भागातून मागे हटत नाही, तोपर्यंत युद्धबंदी करार होणार नसल्याचे इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने गुरुवारी स्पष्ट केले आहे. कराराची पूर्तता अद्याप झालेली नाही, तसेच युद्धबंदी कराराला मंत्रिमंडळाची मान्यताही मिळाली नसल्याचे त्यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले.

नेतन्याहू यांच्या कार्यालयाने आरोप केला की, सवलती मिळविण्याच्या प्रयत्नात हमास अद्याप निर्धारित केलेल्या भागातून मागे हटलेला नाही.

### ओलिसांच्या सुटकेला मान्यता

युद्ध थांबवण्यासाठी अमेरिकेच्या पाठिंब्याने इजिप्त आणि कतारच्या पुढाकाराने अनेक महिन्यांपासून वाटाघाटी सुरू होत्या. त्याला बुधवारी यश आले. युद्धविरामासाठी सहा आठवड्यांची योजना आखण्यात आली आहे. त्यामध्ये इस्रायली फौजा गाझामधून टप्प्याटप्प्याने माघार घेतील आणि इस्रायलने ताब्यात घेतलेल्या पॅलेस्टिनी कच्च्या कैद्यांच्या बदल्यात हमासच्या ताब्यात असलेल्या ओलिसांची सुटका केली जाईल.

त्यामुळे युद्धबंदीचा करार लागू होणार नाही. हमास अटी, शर्तीचे पालन करीत नाही तोपर्यंत मंत्रिमंडळ कराराला मान्यता देण्यास तयार नाही. यावर हमासच्या वतीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, इस्रायल दिशाभूल करीत असून, त्यांना युद्धबंदी करायचीच नसल्याचे यातून स्पष्ट होत आहे. आम्ही करारात निश्चित करण्यात आलेला भाग सोडला आहे. त्यामुळे पंतप्रधान नेतान्याहू यांनी युद्धबंदीची घोषणा करून त्याची पूर्तता करावी. (वृत्तसंस्था)

### भारताने कराराचे केले स्वागत

ओलिस असलेल्या इस्त्रायली नागरिकांची सुटका आणि गाझातील युद्धबंदीच्या कराराचे भारताकडून स्वागत करण्यात आले. युद्धबंदी कराराचे भारताकडून स्वागत करण्यात येत आहे. गाझातील नागरिकांना सर्व प्रकारची मदत आणि सुरक्षा प्रदान केली जाईल अशी आम्ही आशा व्यक्त करीत असल्याचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने निवेदनात म्हटले.

## नेतान्याहू यांच्या मंत्रिमंडळात फूट

◆ **दोहा, १६ जानेवारी**

युद्धबंदी करारावर इस्रायलच्या मंत्रिमंडळात फूट पडल्याचे वृत्त असून, या मुद्यावर मतदान घेतले जाणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान इस्रायल-हमासमध्ये युद्धबंदी झाल्याची चर्चा असतानाच इस्त्रायलने गाझावर हवाई हल्ला केला. यात ४५ हून अधिक पॅलेस्टिनी नागरिक ठार झाल्याचा दावा गाझातील आरोग्य विभागाने केला आहे. युद्धबंदीचे कट्टर विरोधक असलेले अतिउजवे इस्रायलचे अर्थमंत्री बेझालेल स्मोट्रिच यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, आपण दुर्दैवी दिवसांच्या मध्यभागी आहोत, सर्व बंधकांना आपल्याकडे पाहण्याची इच्छा आहे. या करारासाठी इस्रायलला किती मोठी किंमत मोजावी लागेल. (वृत्तसंस्था)

# आप नेते अरविंद केजरीवालही करोडपती

### एकूण संपत्ती १.७३ कोटींची

◆ **नवी दिल्ली, १६ जानेवारी**

सध्या दिल्लीत विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. दिल्लीचे माजी मुख्यमंत्री तथा आम आदमी पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांनी नवी दिल्ली मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अरविंद केजरीवाल यांनी त्यांच्या उमेदवारी अर्जासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार ते करोडपती आहेत.

अरविंद केजरीवाल आणि त्यांच्या पत्नीची एकूण मालमत्ता ४.२३ कोटी रुपये एवढी आहे. अरविंद केजरीवाल यांनी निवडणूक आयोगाला दिलेल्या प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे की, त्यांची एकूण संपत्ती १.७३ कोटी रुपये एवढी आहे. त्यांच्याकडे ५० हजार रुपये रोख आणि २.९६ लाख रुपये बचत खात्यात आहेत. याशिवाय, त्यांच्याकडे १.७ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता आहे. आपल्या नावावर कुठलेही घर अथवा गाडी नाही.

२०२३-२४ मध्ये आपले एकूण उत्पन्न ७.२१ लाख रुपये होते, असेही केजरीवाल यांनी म्हटले आहे.

**सुनीता केजरीवाल यांच्याकडे अधिक संपत्ती**

अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता या आयआरएस अधिकारी होत्या. त्यांच्याकडे केजरीवाल यांच्या तुलनेत अधिक संपत्ती आहे. सुनीता केजरीवाल यांची एकूण मालमत्ता २.५ कोटी रुपये एवढी आहे. त्यांच्याकडे एक कोटी रुपयांपेक्षाही अधिक स्थावर मालमत्ता आहे. यात २५ लाख रुपये किमतीचे ३२० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ९० हजार रुपये किमतीची एक किलो चांदी आहे.

याशिवाय त्यांच्याकडे दीड कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता आहे. सुनीता यांच्याकडे गुरुग्राममध्ये घर आहेत तसेच त्यांच्या नावावर पाच सिटर कारही आहे. (वृत्तसंस्था)

# दोनपेक्षा अधिक मुले असणारेच स्थानिक निवडणूक लढवू शकतील

### चंद्राबाबू नायडू यांचे वक्तव्य

◆ **हैदराबाद, १६ जानेवारी**

एखाद्या व्यक्तीला दोनपेक्षा जास्त मुले असतील तरच तो सरपंच, नगरसेवक किंवा महापौर होऊ शकतो, असे वक्तव्य आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी केली. अधिक मुले जन्माला घालण्यास प्रोत्साहित करण्यासाठी राज्यात धोरण राबवले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

एकीकडे जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश, असे बिरुद भारत मिरवत असतानाच दक्षिणेकडील राज्यांतील राजकीय नेते लोकसंख्या वाढीला खतपाणी घालत असल्याचे दिसत आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री एन.चंद्राबाबू नायडू दोनपेक्षा जास्त मुलांना जन्म द्यावा, असा पुनरुच्चार करत आहेत. नायडू यांनी पुन्हा एकदा आपल्या भूमिकेचे समर्थन केले आहे.

यापूर्वी मुख्यमंत्री नायडू म्हणाले होते की, राज्यात विकास दर वाढला पाहिजे. प्रत्येकाने याचा विचार केला पाहिजे आणि कुटुंबांनी किमान दोन किंवा त्याहून अधिक मुले जन्माला घालण्याचे ध्येय ठेवले पाहिजे. केंद्राच्या 'युथ इन इंडिया-२०२२' अहवालानुसार, आपल्या देशातील २५ कोटी तरुण १५ ते २५ वयोगटातील आहेत. पुढील १५ वर्षांत ते प्रमाण आणखी घसरेल, अशीही भीतीही त्यांनी व्यक्त केली होती. नुकतेच नरवरीपल्ले येथे बोलताना चंद्राबाबू नायडू म्हणाले की, एकेकाळी जास्त मुले असलेल्या व्यक्तींना पंचायत (निवडणुका) किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणूक लढवण्याची परवानगी नव्हती. मात्र, आता मी असे म्हणतोय् की, कमी मुले असलेली व्यक्ती निवडणूक लढवू शकत नाही. तुम्हाला दोनपेक्षा जास्त मुले असतील तरच तुम्ही सरपंच, नगरपालिका नगरसेवक, महानगरपालिका अध्यक्ष किंवा महापौर होऊ शकता. (वृत्तसंस्था)

### आपल्याला योग्य वेळी निर्णय घ्यावा लागेल

मुख्यमंत्री नायडू म्हणाले, तुमच्या पालकांना चार ते पाच मुले होती. आताच्या पिढीने अपत्याची मर्यादा एक एवढीच केली आहे. आता आणखी हुशार लोक म्हणू लागले आहेत की, दुप्पट उत्पन्न नाही तर मुले आम्हाला त्याचा आनंद घेऊ देत. त्यांच्या पालकांनी त्यांच्यासारखा विचार केला असता, तर ते या जगात आले नसते. सर्व देशांनी ही चूक केली आहे आणि आपल्याला योग्य वेळी निर्णय घ्यावा लागेल.

# खंडणी मागणाऱ्या मैतेई संघटनेच्या सहा सदस्यांना अटक

◆ **इम्फाळ, १६ जानेवारी**

मणिपूरच्या थौबल जिल्ह्यात एका व्यक्तीच्या मृत्यूप्रकरणी कट्टरपंथी मैतेई संघटना आरामबाई टेंगोलच्या सहा सदस्यांना अटक करण्यात आली, असे पोलिसांनी गुरुवारी सांगितले. मोहम्मद नवाशला या गटातील सदस्यांनी मंगळवारी त्याच्या घरातून खंडणीसाठी अपहरण केले होते, असे त्यांनी सांगितले. सगोलसेम चिंगखींगनबा सिंह, चिंगाखाम सनातोंबा सिंह, सपम सोमोरजित सिंह, मैबाम बोकेनजीत सिंह आणि चिंगगाखाम मणि सिंह अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. या घटनेत युनिट-२ ॲन्ड्रो शाखेचे सदस्य सहभागी नव्हते, असा दावा आरामबाई टेंगोलने एका निवेदनात केला आहे. अपहरण करणाऱ्या एकाचा अमलीपदार्थाच्या सेवनाने मृत्यू झाला आहे. या गटाने घटनेत सहभागी असलेल्यांना पकडून पोलिसांच्या ताब्यात दिल्याचा दावा करण्यात आला आहे. (वृत्तसंस्था)

# सहा हजार कोटींच्या फसवणूक प्रकरणी बंगालमध्ये छापे

◆ **कोलकाता, १६ जानेवारी**

सहा हजार कोटी रुपयांच्या बँक फसवणुकीप्रकरणी अंमलबजावणी संचालनालय अर्थात् ईडीने गुरुवारी कोलकाता आणि हावडा येथे तीन वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळी छापेमारी केल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. एका व्यावसायिकाच्या निवासस्थानाची आणि कार्यालयांची झडती घेण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रकरणाचा तपास करीत असताना अनेक बनावट कंपन्या आणि एजन्सी आढळल्या ज्यांचा गुन्ह्यात सहभाग होता. ही व्यक्ती अशाच एका एजन्सीची संचालक आहे. तसेच पैसे कसे पळविले आणि फसवणुकीचे दुवे कोण आहेत याचा शोध घेत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

डिसेंबरमध्ये ईडीने या प्रकरणात कॉन्कास्ट स्टील आणि पॉवरचे प्रवर्तक संजय सुरेका यांना अटक केली होती.

तपास यंत्रणेने त्यांच्या ताब्यातून साडेचार कोटी रुपयांचे दागिने आणि अनेक विदेशी आलिशान गाड्या जप्त केल्या होत्या. अटक करण्यात आलेल्या उद्योगपतीने झारखंडमधील एका राष्ट्रीयीकृत बँकेची फसवणूक केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी २०२२ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. (वृत्तसंस्था)




# ५० वर्षांपासून काट्यांवर तपश्चर्या करणारे 'कांटे वाले बाबा'

**प्रयागराजमध्ये** सुरू असलेल्या महाकुंभादरम्यान कोट्यवधी भाविक दाखल झाले आहेत. येथे श्रद्धेची वेगवेगळी रूपे बघायला मिळत आहेत. अगदी स्प्लेंडर बाबापासून ते आयआयटीयन बाबापर्यंत, अनेक जण चर्चेत आहेत. यातच आता 'काँटे वाले बाबा' समोर आले आहे.



त्यांचा व्हिडीओ इंटरनेटवर जबरदस्त व्हायरल होत आहे. त्यांचे नाव रमेश कुमार मांझी असे आहे. त्यांच्या साधना करण्याच्या अनोख्या पद्धतीमुळे ते सध्या जबरदस्त चर्चेत आहेत. आकर्षणाचे केंद्र बनले आहेत. हे बाबा काट्यांवरच साधना करतात, यामुळेच त्यांना 'कांटेवाले बाबा', म्हटले जाते. ते गेल्या ५० वर्षांपासून दरवर्षी अशी साधना करीत आहेत. आपल्याला या काट्यांपासून कसलीही इजा होत नाही, असेही सांगतात. यासंदर्भात विचारले असता ते म्हणाले, मी गुरूंची सेवा करतो. गुरूंनी आम्हाला ज्ञान दिले, आशीर्वाद दिले. हा सर्व देवाचा चमत्कार आहे. मी गेल्या ४०-५० वर्षांपासून दरवर्षी अशा पद्धतीने साधना करतो.

बाबांनी म्हटले की, मी उज्जैन, हरिद्वार, नाशिक आणि गंगासागरलाही भेट देतो. मला फायदा होतो म्हणून मी हे करतो. यामुळे मला कधीही त्रास होत नाही. मी दिवसाला हजार रुपये कमवतो. मिळणाऱ्या दक्षिणेतील अर्धी रक्कम जन्माष्टमीला देईल आणि उरलेली माझ्या खर्चासाठी वापरेन.

# महाकुंभसंदर्भात सर्वाधिक 'सर्च' पाकिस्तानात



**आता** महाकुंभ केवळ भारतापुरताच मर्यादित राहिलेला नाही, तर जागतिक उत्सव बनला आहे. तीर्थराज प्रयागराज येथे सोमवारी महाकुंभाचा भव्य शुभारंभ झाला. येथे इंग्लंड, अमेरिका, ब्राझील, जर्मनी, जापान आणि स्पेनसारख्या देशांतून भाविक येत आहेत. यातून आंतरराष्ट्रीय पातळीवर सनातन संस्कृतीच्या वाढत असलेल्या प्रभावाचे दर्शन होते. महत्त्वाचे म्हणजे, पाकिस्तानसह अरबस्थानातील इस्लामिक देशही महाकुंभात रस घेत असल्याचे दिसत आहे. गुगल ट्रेंड्सनुसार, प्रयागराज येथे आयोजित महाकुंभाबाबत इस्लामिक देशांमध्ये जबरदस्त सर्च होत आहे. कुंभमेळा सर्च करणाऱ्या देशांच्या यादीवर एक नजर टाकली असता पहिले नाव पाकिस्तानचे दिसते. येथील लोक कुंभमेळा आणि तेथे जमलेल्या लोकांसंदर्भात मोठ्या प्रमाणावर सर्च करीत आहेत.

## यूएई आणि कतार घेताहेत रस

**पाकिस्ताननंतर,** कतार, यूएई आणि बहरीन सारखे देशही महाकुंभात रस घेताना दिसत आहेत. याशिवाय, नेपाळ, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, आयर्लंड, ब्रिटन, थायलंड आणि अमेरिकेसारख्या देशांतील लोकही महाकुंभात सर्च करीत आहेत आणि वाचत आहेत.

## विदेशातील लोकांचे स्नान



महाकुंभात येणाऱ्या विदेशी यात्रेकरूंची वाढती संख्या लक्षात घेता, जगावर सनातन संस्कृतीचा प्रभाव वेगाने पडत असल्याचे दिसते. संगमात स्नान करणारे भारतीयच नाहीत, तर परदेशातून येणारे लाखो भाविकही या दिव्य अनुभवाचा भाग होत आहेत. संबंधित वृत्तांवरून दिसून येते की, २०२५ चा कुंभमेळा संपूर्ण जगाला पुन्हा एकदा भारतीय संस्कृती, अध्यात्म आणि सनातन सभ्यतेचे, धर्माचे अद्भुत शक्तीचे दर्शन घडवत आहे.

## ९२ वर्षांनंतर प्रयागराजहून आंतरराष्ट्रीय उड्डाण

ॲपलचे सह-संस्थापक स्टीव्ह जॉब्स यांच्या पत्नी लॉरेन पॉवेल महाकुंभातील ३ दिवसांच्या मुक्कामानंतर अचानक परतल्या. ९२ वर्षांनंतर त्यांच्यासाठी प्रयागराजहून आंतरराष्ट्रीय विमानाने उड्डाण केले. त्या भूतानला गेल्या आहेत. त्यांचा प्रवासाचा कार्यक्रम गुप्त ठेवण्यात आला होता. याची माहिती मोजक्याच अधिकाऱ्यांना होती. बुधवारी सकाळी रॉयल भूतान एअरलाइन्सचे विमान प्रयागराज विमानतळावर उतरले. काही वेळाने लॉरेन पॉवेल विमानतळावर पोहोचल्या. त्यानंतर फ्लाइट लॉरेन पॉवेलला घेण्यासाठी आल्याचे समोर आले. लॉरेन यांनी विमानतळ संचालक मुकेश उपाध्याय यांची भेट घेतली, त्यानंतर इमिग्रेशन विभागाची औपचारिकता पूर्ण झाली.

# महाकुंभात कंपन्या ओतणार पाण्यासारखा पैसा!



**आयटीसीमधील** माचिस आणि अगरबत्ती विभागाचे विभागीय मुख्य कार्यकारी गौरव तयाल ललानी यांनी सांगितले की, कंपनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि इन्फ्लुएन्सरच्या माध्यमातून कुंभमध्ये आपल्या ब्रॅण्ड्सचा प्रचार करेल. ललानी म्हणाले की २०१९ मधील मागील कुंभपेक्षा ब्रॅण्डिंग दर किमान ५०-६० टक्के जास्त आहेत. बोटी, युनिपोल, होर्डिंग्ज, कमानी, आलिशान तंबू, टॉवर, वॉटर एटीएम आणि बॅरिकेड्सवर ब्रँडिंगच्या विविध संधी आहेत. कार्यक्रमातील जाहिरातींचे व्यवस्थापन करण्यासाठी उत्तरप्रदेश सरकारने वृत्ती सोल्युशन्स आणि श्रेयस मीडिया या दोन इतर जाहिरात एजन्सींना देखील अधिकृत केले आहे. जाहिरात कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, एका होर्डिंगची किंमत १.५ लाख ते ३ लाख रुपये आहे, तर बॉक्सच्या गेटवर ब्रॅण्डिंगचा दर २५ लाख रुपये आहे. विजेच्या खांबांवर ब्रॅण्डिंग करण्यासाठी जाहिरातदारांना ३० हजार रुपये मोजावे लागतात.

**सध्या** उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे गंगा नदीच्या किनारी देशभरातून साधू-संत जमा आहेत. हिंदू धर्मातील सर्वांत मोठा सांस्कृतिक महोत्सव या ठिकाणी भरला आहे. १२ वर्षांतून एकदा होणाऱ्या या कार्यक्रमात १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यान ४० कोटी यात्रेकरू सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे. हा जगातील सर्वांत मोठा मेळावा मानला जातो. याच संधीचा पुरेपूर फायदा घेण्यासाठी अदानी, अंबानी यांच्यासह अनेक मोठ्या कंपन्या पाण्यासारखा पैसा यावेळी खर्च करणार आहेत.

प्रयागराज महाकुंभात ६ शाही स्नान होणार आहेत. कंपन्या त्यांच्या एकूण बजेटपैकी सुमारे ७० टक्के रक्कम या मेळ्यात खर्च करीत आहेत. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर मार्केटिंगचा प्रचार करण्यासोबतच या कंपन्या ब्रॅण्ड एंगेजमेंटसाठी इन्फ्लुएन्सरचीही मदत घेत आहेत. एकूणच काय तर भारतीय कंपन्या त्यांच्या ब्रॅण्डचा प्रचार करण्यासाठी पैसे खर्च करणार आहेत.

क्रेयॉन ॲडव्हर्टायझिंगचे अध्यक्ष कुणाल ललानी, ज्यांच्याकडे महाकुंभासाठी जाहिरातीचे अधिकार आहेत. ते म्हणाले, ब्रँड्सना सहा स्नानस्थळाभोवती जास्तीत जास्त जाहिराती हव्या आहेत. महाकुंभातील एकूण खर्चापैकी जवळपास ७० टक्के खर्च ४५ दिवसांच्या कार्यक्रमादरम्यान शाही स्नानांवर केंद्रित आहे. कुंभाच्या पहिल्या दिवशी म्हणजे १३ जानेवारीला तीन कोटींहून अधिक लोक आले. महाकुंभ अधिकाऱ्यांच्या मते, आयटीसी, कोका-कोला, अदानी समूह, हिंदुस्तान युनिलिव्हर, डाबर, बिस्लेरी, पार्क प्लस, इमामी, रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स, बँक ऑफ बडोदा आणि स्पाइसजेट या ब्रॅण्डिंग अधिकार विकत घेणाऱ्या कंपन्यांमध्ये आहेत.

# चित्रपट वार्ता

## प्रसाद ओक साकारणार बाबूराव पेंटर



**मुंबई** : मराठी सिनेसृष्टी उभी करण्यात अनेक व्यक्तींचा वाटा आहे. त्यातील अत्यंत आदराने घेतले जाणारे नाव म्हणजे बाबूराव पेंटर. आता त्यांचाही खडतर प्रवास मोठ्या पडद्यावर उतरणार आहे. त्यांच्या आयुष्यावरील 'पेंटर' नावाच्या सिनेमाची घोषणा झाली. त्याचे पहिले पोस्टर समोर आले आहे. त्यात अगदी हुबेहूब बाबूराव पेंटर यांच्यासारखे दिसण्यासाठी अभिनेत्याने आपला लूक बदलला आहे. त्यावरून भलेभले त्या अभिनेत्याला ओळखू शकले नाहीत. हा अभिनेता आहे प्रसाद ओक. याचे दिग्दर्शन मदन माने करणार आहेत. चित्रपटाविषयी सविस्तर माहिती लवकरच देऊ, असे प्रसादने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे.

## निखिल द्विवेदींची 'नागिन' बनणार श्रद्धा



**मुंबई** : 'स्त्री-२'च्या यशानंतर श्रद्धाकडे कामाची रांग लागली आहे. त्यातही ती अतिशय काटेकोरपणे भूमिकांची निवड करते आहे. तिच्या 'स्त्री-२' पूर्वीच 'नागिन' चित्रपटाचे काम सुरू होते. आता या चित्रपटाची तयारी पूर्ण झाल्याचे निर्माता निखिल द्विवेदी यांनी सांगितले आहे. श्रद्धा कपूरने चित्रीकरणालाही सुरुवात केली आहे. निखिल द्विवेदींनी चित्रपटाच्या सेटवरील फोटो शेअर करीत चाहत्यांना सुखद धक्का दिला आहे. नागिन म्हणून श्रद्धाचा लूक कसा असेल, याविषयी प्रेक्षकांना आता उत्सूकता वाटते आहे.

## हिराणींच्या मुलाचे अभिनयात पदार्पण

**मुंबई** : थ्री इडियट्स, पीके, मुन्नाभाईसारख्या लोकप्रिय चित्रपटांचे दिग्दर्शक राजकुमार हिराणी यांचे ओटीटीवर पदार्पण होत आहे. 'प्रीतम पेड्रो' या सिरीजची ते निर्मिती करणार असून, यातून त्यांचा मुलगा वीर हिरानी अभिनयक्षेत्रात पदार्पण करणार आहे. यात विक्रांत मेस्सी खलनायकाची भूमिका साकारणार आहे. विक्रांतने त्याच्या अभिनय कौशल्याने चित्रपट आणि टीव्ही मालिकांमध्ये छाप सोडली आहे. 'प्रीतम पेड्रो' सीरिजमध्ये राजकुमार हिरानी यांचा मुलगा वीर हिरानी आणि अर्शद वारसी मुख्य भूमिकेत आहेत. वीर हा टेक्नोसॅव्ही पोलिस अधिकारी म्हणून विक्रांतच्या भूमिकेत दिसणार आहे, तर अर्शद वारसी पारंपरिक तपास पद्धतींवर अवलंबून राहणाऱ्या अनुभवी पोलिस अधिकाऱ्याची भूमिका साकारणार आहे.

## 'जेलर' बनून पुन्हा भेटीला येतोय् थलैवा



**मुंबई** : २०२३ मध्ये आलेला रजनीकांत यांचा 'जेलर' सिनेमा चांगलाच गाजला. आता याचा सिक्वल भेटीला येणार आहे. संक्रांतीच्या निमित्ताने नुकताच 'जेलर-२'चा प्रोमो रिलीज झाला. चार मिनिटांच्या प्रोमोत रजनीकांत यांचा स्वॅग आणि त्यांचा ॲक्शन अवतार पाहायला मिळतो. विशेष म्हणजे, या भागात थलैवा रजनीअण्णासोबत जॅकी श्रॉफ आणि दाक्षिणात्य सुपरस्टार मोहनलालही झळकणार आहे. याच्या प्रदर्शनाची तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. मात्र, रजनीकांत असल्याने सिनेमा जोरदारच असणार, या आशेने प्रेक्षकांना याची वाट आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## उमेदने महिलांच्या उत्पादनासाठी मार्केटिंगवर भर द्यावा : खा. प्रणिती शिंदे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

उमेदने महिलांच्या उत्पादनासाठी, त्यांनी तयार केलेल्या वस्तूंना मार्केट उपलब्ध होण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन खासदार प्रणिती शिंदे यांनी केले.ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद सोलापूर व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान सोलापूर यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मिनी सरस व रूक्मिणी महोत्सवचे उद्धाटन प्रसंगी त्या बोलत होत्या.

यावेळी आमदार सुभाष बापू देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे, आरोग्यअधिकारी डॉ. संतोष नवले, उत्तर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बाबासाहेब पाटील, उमेदचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, माविमचे सोमनाथ लामगुंडे इ उपस्थित होते. यावेळी पुढे बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, महिला या चूल व मूल या संकल्पनेतून बाहेर काढण्यासाठी उमेद अभियान यांचा मोठा सहभाग आहे.तसेच त्यांनी सोलापूरच्या उमेदच्या कामाचे कौतुक केले..यावेळी बोलताना आमदार सुभाष बापू देशमुख म्हणाले की, सोलापूर मध्ये उमेदच्या माध्यमातून महिलांनी तयार केलेल्या वस्तूंना बाजारपेठ मिळण्यासाठी सोलापूर बरोबरच पुणे, मुंबई येथेही प्रदर्शन भरविण्यात यावे त्यासाठी सर्व मदत करण्याची तयारी असल्याचे सांगितले.

> महिलांच्या उत्पादनासाठी मार्केट मिळविण्यासाठी लोकमंगल परिवाराच्या वतीने सर्व प्रकारचे सहकार्य करण्यासाठी तयार आहे.
> **- आ. सुभाषबापू देशमुख**

यावेळी प्रास्ताविक करताना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम म्हणाले की, उमेदच्या माध्यमातून महिलांना लखपती करण्यासाठी व त्यांचे उद्योग व्यवसाय उभारण्यासाठी त्यांना वैयक्तिक कर्ज देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रदर्शनात विविध प्रकारच्या नाविन्यपूर्ण वस्तूंचे ७५स्टॉल लावण्यात आले आहेत. सदर प्रदर्शनामध्ये पंचगव्य उत्पादने, लाकडी तेलघाण्यावरील तेल, लाकडी खेळणी, मसाले, मिलेट कुकीज, तृणधान्य चिवडा इआदी उत्पादनांचा समावेश आहे. सदर कार्यक्रमाच्या वेळी उमेद अभियान मधील काही यशस्वी महिलांच्या यशोगाथा पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदपाठक यांनी तर आभार प्रदर्शन प्रकल्प संचालक डॉ. सुधीर ठोंबरे यांनी केले. सदर महोत्सव यशस्वी करण्यासाठी जिल्हा अभियान व्यवस्थापक सचिन चवरे, लेखाधिकारी शुभांगी देशपांडे,जिल्हा व्यवस्थापक संतोष डोंबे, राहुल जाधव, दयानंद सरवळे, मीनाक्षी मडवळी, अनिता माने, अमोल गलांडे, शीतल म्हांता, सर्व तालुका अभियान व्यवस्थापक, तालुका व्यवस्थापक व प्रभाग समन्वयक परिश्रम घेत आहेत.



## प्रकाश गव्हाणे यांच्या 'ही जात माणसांची' चारोळी काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जानेवारी-**

मानवी जीवनातील वास्तव, जगण्याचे तत्वज्ञान आणि माणसांचे नाटकीपण यांचा सुरेख संगम कवी, लेखक प्रकाश गव्हाणे यांनी 'ही जात माणसांची' या चारोळी संग्रह पुस्तकात मार्मिकपणे रेखाटली आहे, असे प्रतिपादन साहित्यिक श्री. अंकुश गाजरे यांनी या काव्यसंग्रह प्रकाशन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून व्यक्त केले.

अध्यक्षस्थानी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा बार्शीचे अध्यक्ष पां. न. निपाणीकर होते. कवी प्रकाश गव्हाणे, रामचंद्र इकारे, अॅड. सतीश सातपुते, समीक्षक बी. आर. देशमुख, लेखक आबासाहेब घावटे, कवी दत्ता गोसावी, अशोक मोहिते उपस्थित होते.गाजरे म्हणाले की, कवी प्रकाश गव्हाणे हे मान्यवर कवी लेखक आहेत, त्यांचे लेखनात जीवनानुभव, तत्वप्रणाली, प्रत्तीभा संपनता आणि कल्पकता आहे. काव्यसंग्रह हा आचार-विचारांना दिशा देणारा नक्कीच ठरेल. प्रास्ताविक अंजली गव्हाणे यांनी केले.त्यानीं अभ्यासिकामार्फत दिल्या जाणाऱ्या मूलभूत सोईसुविधाचा आढावा घेतला, आतापर्यंत नऊशे विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध पदी नियुक्ती मिळाल्या आहेत हे आवर्जून सांगितले. ईश्वरी गव्हाणे हिने अभ्यासकीचे मूल्यमापन केले. या वर्षात विविध पदी नियुक्ती मिळालेल्या २९ जणांचा सत्कार करण्यात आला. रामचंद्र इकारे, अॅड. सतीश सातपुते, निपाणीकर यांची भाषणे झाली. यावेळी प्रकाशक राहुल भालके यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन किरण विभुते यांनी केले. आभार कवी प्रकाश गव्हाणे यांनी मानले. कार्यक्रमासाठी बालाजी गव्हाणे, अंजली गव्हाणे, रंजना गव्हाणे, गणेश गव्हाणे, जागृती गव्हाणे यांनी परिश्रम घेतले.

## सेवा भवन प्रकल्पातर्फे 'सेवा भवन रन' मॅरेथॉनचे आयोजन

**पुणे, दि. १६ जानेवारी-**

'सेवा भवन' या पुण्यातील रुग्णसेवा प्रकल्पातर्फे 'सेवा भवन रन' या मूत्रपिंडाच्या स्वास्थ्या विषयी जनजागृतीपर मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. रविवारी, ९ फेब्रुवारी रोजी सकाळी ५.३० वाजता कर्वेनगरमधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेपासून या मॅरेथॉनला प्रारंभ होईल. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समितीतर्फे सेवा भवन हा सेवा प्रकल्प चालवला जातो. यामध्ये १८ वर्षांवरील महिला आणि पुरुषांना सहभागी होता येईल. त्यासाठी ८२७५३९६३९७ या क्रमांकावर नोंदणी करता येईल. पाच किलोमीटर आणि दहा किलोमीटर असे दोन टप्पे आहेत. या शिवाय 'चॅरिटी रन' हा उपक्रमही केला जाणार आहे. 'सेवा भवन' या प्रकल्पात अल्प दरात डायलिसिसची सुविधा असून पुण्यात उपचारांसाठी येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची निवास, भोजन व्यवस्थाही अल्प शुल्कात केली जाते. निःशुल्क स्वास्थ सल्ला आणि समुपदेशन केंद्रही चालवले जाते. किडनीसंबंधीची जनजागृती आणि सेवा भवन प्रकल्पाची माहिती पोहोचवण्यासाठी ही मॅरेथॉन आयोजित केल्याची माहिती जनकल्याण समितीचे कार्यवाह प्रमोद गोर्हे आणि सेवा भवन प्रकल्पाचे कार्यवाह पलाश देवळणकर यांनी दिली आहे.

# जिल्ह्यातील एकाही 'लाडक्या बहिणी'चे नाही वगळले नाव!

**● जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांची माहिती**
**● जिल्ह्यातील १० लाखाच्यावर महिलांना मिळतो 'धन लाभ'**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

महाराष्ट्र सरकारने जुलै २०२४ पासून सुरू केलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजना महिलांमध्ये लोकप्रिय ठरली आहे. या योजनेमुळे राज्यातील २ कोटी ५२ लाख महिलांना लाभ मिळाला आहे. तर सोलापूर जिल्ह्यातील १० लाख २० हजाराच्या आसपास महिलांना या योजनेचा लाभ मिळत आहे.

या योजनेतून अनेकांची नावे वगळण्यात आल्याची अफवा सुरू होती मात्र आजतागायत जिल्ह्यातील एकाही लाडक्या बहिणीचे नाव पात्र यादीतून कमी केले नसल्याचा निर्वाळा जि. प. च्या महिला व बालकल्याण खात्याचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी प्रसाद मिरकले यांनी आज (दि. १६) दैनिक तरूण भारतशी संवाद साधताना दिला. सरकारने निवडणुकीनंतर डिसेंबर २०२४ मध्ये महिलांच्या खात्यात १५०० रुपये जमा केले. मात्र, जानेवारी महिना संपत आला तरी अद्याप हप्ता मिळाला नाही. त्यामुळे महिला चिंतेत आहेत. आतापर्यंत महिलांना ९००० रुपये मिळाले आहेत. आता २६ जानेवारीपर्यंत या महिलांना पैसे देण्याची सरकारकडून तयारी सुरू असल्याची माहिती महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिल्याने शहर-जिल्ह्यातील महिला वर्गात सध्यातरी चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. जानेवारी महिन्याचे १५ दिवस उलटले तरी या महिन्याच्या हप्त्याबद्दल कोणतीही माहिती समोर आलेली नव्हती. संक्रातीला पैसे खात्यावर पडतील, अशी महिला वर्गाला अपेक्षा होती. त्यामुळे जानेवारीचा हप्ता आम्हाला आता कधी मिळणार? असा सवाल अनेक महिलांनी विचारण्यास सुरूवात केली होती. इतकेच नाहीतर कोणाची नावे या लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहेत; याबाबतही शहर-जिल्ह्यातील महिलांमध्ये जोरदार चर्चा सुरू होती. मात्र आता जिल्हा प्रशासनाकडून जिल्ह्यातील कोणत्याही महिलांचे नाव कमी केले नसल्याची माहिती समोर आल्याने या महिलांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजना ही गेमचेंजर ठरली. यंदाच्या निवडणुकीत महायुती सरकारला लाडकी बहीण योजनेमुळे मोठे यश मिळाले. विधानसभा निवडणुकांचा निकाल लागल्यानंतर काही दिवसांपूर्वी लाडकी बहीण योजनेचे उर्वरित पैसे देण्यात आले. विधानसभा निवडणुकीनंतर पुन्हा सत्ता मिळाली तर लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढवून २१०० रुपये करू, असे आश्वासन महायुतीच्या नेत्यांनी दिले होते. मात्र अद्याप लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा वाढीव हफ्ता मिळालेला नाही. आता या लाडकी बहीण योजनेचा पुढील हफ्ता कधी मिळणार? आणि तो २१०० रूपयांनीच मिळणार का? याचीही उत्सुकता या महिला वर्गाला लागली आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत लाडकी बहीण योजनेचा हप्ता देण्याचा निर्णय लवकर झालेला नव्हता. त्यामुळे लाडक्या बहिणींना पुढील हफ्त्यासाठी वाट पाहावी लागणार असे वाटत होते. मात्र आता महिला व बालकल्याण खात्याच्या मंत्री तटकरे यांनी येत्या २६ जानेवारीपर्यंत लाडक्या बहिणींच्या खात्यावर पैसे वर्ग करणार असल्याचे सांगितल्याने महिला वर्गात चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.

> **आतापर्यंत किती महिलांना पैसे मिळाले?**
> मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यात जुलै ते डिसेंबर असे ६ महिन्यांचे पैसे जमा झाले आहे. यातील प्रत्येक महिन्याला १५०० असे मिळून एकत्रित ९ हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. राज्यभरातील सुमारे अडीच कोटी महिलांनी या योजेनचा लाभ घेतला आहे. तर जिल्ह्यातील १० लाख २० हजारापर्यंत महिलांना याचा लाभ मिळाला आहे. यातील काही महिलांना आधारलिंकिंग, ईकेवायसी अभावी पैसे मिळाले नाहीत. त्यांचेही खाते अपडेट होताच त्यांच्याही खात्यावरून पैसे काढता येत आहेत.

## स्वामी समर्थ कारखान्याच्या संचालक मंडळाविरूद्ध फसवणुकीचा गुन्हा

**साखर साठ्याची परस्पर विक्री; बँकेत पैसे न भरता अपहार केल्याचा ठपका**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी-**

तालुक्यातील दहिटणे येथील श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याचा फायदा व्हावा या हेतूने साखर साठ्याचा तारणमाल बँकेच्या पश्चात कट रचून गोडावूनमधुन काढून परस्पर विक्री केली. रक्कम ४६ कोटी ३७ लाख रुपये बँकेत न भरता त्या रक्कमेचा परस्पर अपहार करून बँकेचा विश्वासघात केला म्हणून कारखान्याचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक अशा २४ जणांविरूद्ध फसवणुकिचा गुन्हा दाखल झाला.

सप्टेंबर २०१४ ते मार्च २०१५ या कालावधीत श्री स्वामी समर्थ साखर कारखाना दहिटणे येथे ४६ कोटी ३७ लाख रूपयांचा अपहार झाल्याचा गुन्हा दाखल झाला. संशयित आरोपी सिद्रामप्पा मलकप्पा पाटील (पद चेअरमन रा. कुमठे सोलापुर), कै. काशिनाथ रामचंद्र भरमशेट्टी (व्हा. चेअरमन, रा. हन्नूर, ता. अक्कलकोट), यांच्यासह संचालक शिवशरण हणमंतप्पा बिराजदार (संचालक, रा. मैंदर्गी, ता. अक्कलकोट), सुरेश भिमशा गड्डी (रा. शेगाव), बसलिंगप्पा शिवशरण खेडगी (रा. अक्कलकोट), स्वामीराव रावसाहेब पाटील (रा. कुरनूर), महेश लक्ष्मीपुत्र पाटील (रा. दुधनी ता अक्कलकोट), शरणबसप्पा कल्याणप्पा बिराजदार (रा. शिरवळ), जयशेखर शिवबसप्पा पाटील (रा. सलगर), संजीव सिद्रामप्पा पाटील (रा. कुमठे), विवेकानंद बसप्पा उंबरजे (रा. करजगी), अनिता अप्पासाहेब पाटील (रा. चपळगांव), प्रकाश गुरण्णा खांडेकर (रा. बणजगोळ), हणमंतप्पा बसलिंगप्पा कात्राबाद (रा. उडगी), धोंडप्पा चंद्रमप्पा यमाजी (रा. वागदरी), भीमाशंकर मलप्पा धोत्री (रा. नागणसूर), शांतबाई धुळप्पा बाके (रा. हिळ्ळी), तुळसाबाई भीमाशंकर वाघमोडे (रा. गौंडगाव), यशवंत अंबादास धोंगडे (रा. अक्कलकोट), निजामोद्दीन करमोद्दीन बिराजदार (कल्लकर्जाळ), श्रीमंत शिवलिंगप्पा देसाई (रा. म्हैसलगे), पिरोजी पुंडलीक शिंगाडे (रा. सुलेरजवळगे), जलील बंदेनवाज बागवान (अक्कलकोट), गुन्हा दाखल झाला आहे. फिर्याद जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा अक्कलकोटचे बँक इन्स्पेक्टर लक्ष्मीपुत्र सिध्दणप्पा हौदे यांनी दिली. तपास सपोनि निलेश बागाव करीत आहेत.

> **बँकेच्या तारण मालाची केली विक्री**
> सप्टेंबर २०१४ ते मार्च २०१५ श्री स्वामी समर्थ साखर कारखान्याने ६१ कोटी रुपयांची त्यांच्याकडील उपलब्ध साखर साठ्यातून कर्ज मागणी करुन कर्ज मर्यादा मंजूर करुन घेतली. त्यानंतर नियमानुसार श्री स्वामी समर्थ सहकारी साखर कारखान्याने कारखान्याचा फायदा व्हावा या हेतूने साखर कारखान्यातील साखर साठ्याचा तारणमाल बँकेच्या पश्चात कट रचून गोडावूनमधून काढून परस्पर विक्री केली आणि आलेली रक्कम ४६ कोटी ३७ लाख रुपये बँकेत न भरता त्या रक्कमेचा परस्पर अपहार करून बँकेचा विश्वासघात केला आहे, म्हणून गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

## सोलापुरात भाजपाकडून ७५ हजार सदस्यता नोंदणी

**शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांची माहिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

भारतीय जनता पार्टी हे जगातील सर्वात मोठ्ठे राजकीय संघटन असून, संपूर्ण देशभर भाजपाचे सदस्यता नोंदणी अभियान चालू आहे. आत्तापर्यंत संपूर्ण देशात ९ कोटीच्याहीवर सदस्य जोडले गेले आहेत. तर सोलापूर शहरातील सदस्यता नोंदणी अभियान मोहिमेत येथील भाजपा आमदार, माजी नगरसेवक आणि भाजपा पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी एकत्रित येवून आजतागायत ७५ हजारापर्यंत सदस्यता नोंदणी केल्याची माहिती नगराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी दै. तरूण भारतशी संवाद साधताना आज (दि. १६) दिली.

भाजपातील हायटेक नेत्यांनी शहरातील प्रत्येक बुथवर २०० सदस्य नोंदणी करायचे उद्दिष्ट कार्यकर्त्यांसमोर ठेवले. तसेच १० जानेवारी रोजी घर चलो अभियान राबविण्यात आले. ८८०००२०२४ ह्या क्रमांकावर एक फोन करून सदस्य करून घेत असल्याचेही त्यांनी सांगितले. तर या सदस्यता नोंदणीनंतर बुथ अध्यक्ष, मंडलाध्यक्ष व इतर निवडी भारतीय जनता पार्टी करणार असल्याचेही यावेळी काळे यांनी नमूद केले. दरम्यान, सोलापूर शहराला दीड लाखाचे सदस्य नोंदणी टार्गेट असून, यातील ५० टक्के टार्गेट सध्या पूर्ण झाले आहे.

## लोकमंगल कृषी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबीर उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संस्था संचलित लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन रानमसले, ता. उत्तर सोलापूर येथे संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.



या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य सागर महाजन हे लाभले होते. याप्रसंगी रानमसले गावचे सरपंच मनोहर क्षिरसागर, उपसरपंच रमेश सुतार, मुख्याध्यापिका प्रतिभा पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे रोसयो स्वयंसेवक, रानमसले गावातील सर्व ग्रामस्थ, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी सरपंच क्षिरसागर यांनी विद्यार्थ्यांना एक सृजान व सुसंस्कृत नागरिक म्हणून स्वयंसेवकांनी गावातील विविध उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा व गावातील विकास करावा, असे मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य सागर महाजन यांनी यावर्षी शिबिरांतर्गत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम मौजे रानमसले येथे राबविण्यात येणार आहेत. तसेच सहभागी स्वयंसेवक अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने शिबिरातील विविध उपक्रम पार पाडतील, याची खात्री दिली. महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. आशिष सरकाळे यांनी उपस्थितांना रोसेयो शिबीरातील विविध उपक्रमांची माहिती दिली. या उपक्रमांत ग्रामस्वच्छता, वृक्षारोपण, बंधारा निर्मिती, शोषखड्डे निर्मिती, व्यसनमुक्ती जनजागृती, पर्यावरण जनजागृती, पथनाट्याच्या माध्यमातून बालविवाह प्रतिबंध जनजागृती, विविध शालेय उपक्रम, रक्तदान व रक्तक्षय तपासणी शिबीर यासोबतच समाज प्रबोधनपर व कृषी आधारित कृषी क्षेत्रातील तज्ञांची विविध मार्गदर्शनपर व्याख्याने तसेच गावातील महिलांसाठी विविध मनोरंजनपर उपक्रमांचा समावेश आहे, असे सांगितले. यानंतर स्वयंसेवक मंजुनाथ कुंभार व सोनाली उन्हाळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन मैथिली कोळी व नक्षत्रा कांबळे यांनी व आभारप्रदर्शन प्रज्ञा मंद्रुपकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या प्रा. सायली बडेकर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील सर्व शिक्षकवृंद तसेच रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

## बार्शीमध्ये सहा बांगलादेशी नागरिकांना अटक

**स्थानिक तीन नागरिकांवर कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १६ जानेवारी-**

बार्शी शहरातील पंकजनगर येथे बांगलादेशी नागरिक अनधिकृतरीत्या वास्तव्य करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर आज १६ जानेवारी रोजी पोलिसांनी मोठी कारवाई केली. या कारवाईत दहशतवाद विरोधी पथक, सोलापूर युनिट आणि एटीबीच्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

पंकजनगर येथील दोन मजली इमारतीत छापा टाकून सहा बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली. अटक झालेल्या व्यक्तींत चार महिला आणि दोन पुरुषांचा समावेश असून, त्यांच्याकडून कोणतेही वैध प्रवासी कागदपत्र जसे की पासपोर्ट आणि व्हिसा मिळाले नाहीत. अटक केलेले आरोपी- नजमा यासीन शेख उर्फ बिठी बेगम (वय ३३), रेहना बेगम समद सिकंदर उर्फ साथी रुबेल खान (वय ३३), शिखा शाकीब बुडीया (वय २२ वर्षे), शाकीब बादशाह बुडीया (वय वय २३), शोएब उर्फ शॉएब सलाम शेख (वय २४) व एक अल्पवयीन मुलगी असे सहा बांगलादेशी नागरिक ताब्यात घेतले असुन पोलिसांनी आरोपींच्या अंगझडतीतून मोबाइल फोन, सीमकार्ड, रोख रक्कम १ लाख ४१ हजार ६०० रुपये, बांगलादेशी मतदान कार्ड, जन्म दाखले आणि भारतीय बनावट आधार कार्ड जप्त केले आहेत.

> **स्थानिक नागरिकांचा सहभाग**
> तपासादरम्यान, आरोपींनी स्थानिक नागरिकांकडून बार्शीत वास्तव्य करण्यासाठी मदत मिळाल्याचे उघड केले. यामध्ये विशाल मंगडे, राणी (पूर्ण नाव उपलब्ध नाही) आणि किरण परांजपे या व्यक्तींचा समावेश आहे. सहा आरोपींविरुद्ध भारतीय पारपत्र अधिनियम, परकीय नागरिक आदेश, विदेशी व्यक्ती अधिनियम आणि भारतीय न्याय संहिता अंतर्गत विविध कलमांनुसार गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

## 'इमर्जन्सी' चित्रपटातून ऐतिहासिक मागोवा

**मुंबई, दि.१६ जानेवारी :**

'इमर्जन्सी' चित्रपटातून आणिबाणीच्या काळातील ऐतिहासिक मागोवा घेण्यात आला असून या कालावधीतील घटनाक्रम टिपण्यात आले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

इमर्जन्सी या चित्रपटाच्या विशेष शो चे आयोजन करण्यात आले.यावेळी चित्रपटाच्या नायिका कंगना राणावत, आमदार प्रवीण दरेकर, आमदार प्रसाद लाड, चित्रपटाची संपूर्ण टीम आणि प्रेक्षक उपस्थित होते. फडणवीस म्हणाले की,' आणीबाणीच्या कालावधीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान बाजूला ठेवण्यात आले. मात्र ही घटना देशाच्या प्रत्येक नागरिकांस माहिती होणे आवश्यक आहे. आणीबाणीच्या कालखंडात नागरिकांचे अधिकार काढून घेण्यात आले होते. लोकशाहीवरील या संकटाची माहिती देशातील नागरिकांना कळणे गरजेचे आहे, कंगना राणावत यांनी इंदिरा गांधी यांची भूमिका उत्तम रंगवली असल्याचेही मुख्यमंत्री यांनी सांगितले.

## नव्या लाडक्या बहिणीची नोंदणी प्रक्रिया बंद

### ऑनलाईन लिंक होईना ओपन; ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची यंत्रणाही बासनात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी-**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमध्ये नव्याने अर्ज दाखल करून घेण्याचे काम सद्या थांबविले आहे.ऑनलाइन अर्ज भरण्याची लिंक बंद आहे तर ऑफलाइन अर्जही स्वीकारत नाहीत.

मुदतीच्या शेवटी अनेक लाडक्या बहिणींनी ऑनलाइन अर्ज दाखल केले असून या अर्जाची मंजुरीचे कामही रखडलेले आहे. यामुळे लाडक्या बहिणी मात्र अंगणवाडी ताईकडे चकरा मारून थकल्या आहेत. त्यामुळे निवडणुकीपूर्वी लाडक्या वाटत असलेल्या बहिणी सरकारला आता सावत्र वाटत असल्याचे चित्र दिसत आहे. यामुळे भविष्यात लाडकी बहीण योजना सुरू राहणार की बंद होणार याविषयी प्रश्न निर्माण झाले आहेत.

सध्या अक्कलकोट तालुक्यात ८६,४६६ लाडक्या बहीण योजनेत पात्र असून त्या सर्वांना लाभ देण्यात येत असल्याची माहिती महिला बालविकास प्रकल्प अधिकारी भोसले यांनी दिली. लोकसभा निवडणुकीत सपाटून पराभव झाल्यानंतर महायुतीच्या सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी तीन महिने अगोदर महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करून या योजनेंतर्गत महिलांच्या बँक खात्यावर दरमहा १,५०० रुपये जमा करण्यास सुरूवात केली. या योजनेला महिला वर्गातून भरभरून प्रतिसाद मिळाला. सरकारनेही दिलेला शब्द पाळला. चालू महिन्याचेच नाही तर पुढील महिन्याचीही आगाऊ रक्कम लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात जमा करून विश्वास संपादन केला. महिलांनीही विधानसभा निवडणुकीत छप्पर फाडके मतांचे दान देऊन महायुतीला पुन्हा एकदा सत्ता मिळवून दिली. या यशात लाडक्या बहिणींचा मोठा वाटा असल्याने सरकारनेही या लाडक्या बहिणींना निवडणुकी नंतरही एका महिन्याचे १५०० रुपये जमा करून शब्द पाळला आहे. आता नव्या वर्षातील पहिल्या महिन्याचे पैसे संक्रांतीला बँक खात्यात जमा करणार असल्याचे सरकार सांगत होते. मात्र आजतागायत १५०० रुपये जमा झाले नाहीत.




> **लाडक्या बहिणी संभ्रमात**
> विधानसभा निवडणुकीत पुन्हा सत्ता काबीज करण्यासाठी महायुती सरकारने पात्र अपात्र यादी तयार न करता लाडकी बहीण योजना चालू केली. या लाडकी बहीण योजनामुळे महायुती सरकार पुन्हा सत्तेवर आले. मात्र आता या योजनेबाबत एक महत्त्वाची माहिती समोर आली आहे. लाडकी बहीण योजनेत निकषात न बसणाऱ्या अपात्र असलेल्या महिलांना योजनेतून नाव कमी करावे किंवा महिला व बालकल्याण विभागाच्या लेखाशिर्षावर पैसे भरावेत, अशी सूचना महिला व बालविकास विभागाचे सचिव अनुपकुमार यांनी केल्याने लाडक्या बहीणमध्ये घबराट निर्माण झाली आहे.

## मेगा सिटीमध्ये मुंबई सर्वात सुरक्षित शहर : फडणवीस

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१६ जानेवारी :**

देशातील मेगा सिटींमधील सर्वात सुरक्षित शहर मुंबई हे आहे. कधी कधी घटना घडतात. त्याला गांभीर्याने घेतलं पाहिजे. मात्र,त्यामुळे मुंबई असुरक्षित आहे, असे म्हणणे चुकीचे आहे.अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली.



अभिनेता सैफ अली खान यांच्यावरील हल्ल्याबाबत पोलिसांकडून योग्य पध्दतीने तपास सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सैफ याच्यावरील हल्ला झाल्यानंतर राज्यात कायदा आणि सुव्यवस्था उध्वस्त झाली आहे, अशी टीका विरोधी पक्षातील नेत्यांकडून होत आहे. सोशल मीडियावरून ही टीकेची झोड उठली असताना गृह खात्याची जबाबदारी सांभाळणाऱ्या मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्याला प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले,' सैफ अली खान यांच्यावर हल्ला झालाय. याप्रकरणी कारवाई होतं आहे. पोलिसांनी तुम्हाला याबाबत सगळी माहिती दिली आहे. कोणत्या मोटोने त्यांच्या घरात आरोपी घुसले होते? हे तुम्हाला कळलं असेल पोलीस वेळोवेळी माहिती देत आहेत. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आमचा पूर्ण प्रयत्न असतो हे खरे आहे की, कधी कधी घटना घडतात. त्याला गांभीर्याने घेतलं पाहिजे. मात्र,त्यामुळे मुंबई असुरक्षित आहे, असे म्हटले जाणे चुकीचे आहे. कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी आमचा पूर्ण प्रयत्न असतो आणि भविष्यात अधिक कायदा सुव्यवस्था कडक व्हावी यासाठी आम्ही प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

## अग्रलेख...

# सूर्य आणि जयद्रथ

केवळ महाराष्ट्राच्याच नव्हे, तर देशाच्याच एकूण राजकारणाची पातळी विरोधकांनी आपल्या स्वार्थी सत्तालालसेपोटी किती खालच्या स्तरावर नेऊन ठेवली आहे आणि त्याहूनही खालची पातळी शोधण्याचे कोठेही चालविली आहे हे गेल्या काही दिवसांतील विरोधकांच्या तंबूत सुरू असलेल्या मुक्ताफळांच्या मुक्त उधळणीवरून देशाला दिसू लागले आहे. भाजपाला सत्तेपासून दूर राखणे आणि काहीही करून सत्ता संपादन करणे एवढा एकमात्र संकुचित हेतू ठेवून एकत्र आलेल्या इंडिया आघाडीची गाजराची पुंगी तेव्हाही वाजली नव्हतीच, आता तर ती मोडून खाण्याची वेळ आल्यावर त्यासाठी देखील कोणाचीच तयारी नसल्याचे स्पष्ट झाले असून, इंडिया नावाने स्थापन केलेल्या आघाडीतील पक्ष ज्याप्रमाणे स्वतंत्र अस्तित्वाची चर्चा करू लागले आहेत, ते पाहता भविष्यात काँग्रेस एकाकी पडणार आणि काँग्रेसच्या कुबड्या घेऊन आपले अस्तित्व टिकविण्याची धडपड करणाऱ्या परावलंबी पक्षांचे कंबरडे मोडणार हे स्पष्ट होऊ लागले आहे. कोणे एके काळी, म्हणजे अगदी लोकसभा निवडणुकांच्या दरम्यान महाराष्ट्रातील काँग्रेसी परंपरेतील नेते शरद पवार यांना काँग्रेसच्या उज्ज्वल भवितव्याची स्वप्ने पडू लागली होती. निवडणुकांनंतर लहानमोठे पक्ष किंवा प्रादेशिक पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होतील किंवा काँग्रेसच्या आघाडीत सामील होतील असे भाकीत त्यांनी वर्तविले होते. पण अलिकडे पवारांच्या भाकितांचीच नव्हे तर एकूणच राजकीय मानसिकतेचीच चिकित्सा होऊ लागल्याने, त्या विधानाची तात्पुरती चर्चा झाल्यानंतर त्याकडे कोणी फारसे ढुंकूनही पाहिले नव्हते. आपल्या राजकारणाची सद्दी आता संपत चालली असून आपल्या पक्षालाच कोणाच्या तरी वळचणीचा आधार शोधावा लागेल हे पवार यांना स्पष्ट दिसू लागले असावे. अन्यथा, उठसूठ महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीची उदाहरणे देत सभ्यपणाचे धडे शिकविणाऱ्या पवार यांनी काही अनाठायी वक्तव्यासाठी जीभ टाळ्याला लावण्याचे भलते धाडस केले नसते. आपल्या वक्तव्याचा विपर्यास केला असे म्हणण्याची सोय अलिकडे राजकीय नेत्यांना राहिलेली नाही. पूर्वी जेव्हा प्रसार माध्यमांच्या हातात कॅमेरे वगैरे नव्हते आणि केवळ मुद्रित माध्यमांचाच प्रभाव होता, तेव्हा राजकीय नेते या युक्तिवादाचा बचावासाठी फायदा उठवत असत. आता कॅमेऱ्यासमोरील बोलण्याचे पुरावे कोठेही आणि केव्हाही उपलब्ध होत असल्याने, एकदा टाळ्याला लावलेल्या जिभा मागे वळविता येत नाहीत. पवार यांनाही कधीकाळी वक्तव्याचा विपर्यास केल्याचा बचाव करण्याची वेळ येत असे, पण आता ती संधी राहिलेली नसल्याने, सूर्य आणि जयद्रथ दाखविता येतात, हे माहीत असूनही पवार यांनी परवा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याविषयी अशोभनीय विधान करून पुन्हा एकदा आपली वैचारिक पातळी दाखवून दिली.

महाराष्ट्रातील भाजपाच्या महाविजय मेळाव्यात बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी शरद पवार आणि ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरे यांच्यावर खरपूस टीका करत त्यांच्या राजकारणाचा समाचार घेतला. शरद पवार यांनी १९७८ पासून दगाफटक्याची राजनीती केली, तर उद्धव ठाकरे यांनी पित्याच्या विचारास मूठमाती देत खोटारडेपणाने मुख्यमंत्रिपद पटकावले असा शाह यांनी केलेली टीका पवार यांना झोंबणे साहजिक होते, पण या आरोपातून स्वतःचा बचाव करण्यासाठी शाह यांच्यावरील कारवाईचा अनाठायी उल्लेख करून आता त्यांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीचा पंचनामा करण्याचे हत्यारच भाजपाच्या हाती दिले आहे. १९७८ पासूनच्या उल्लेखाने शाह यांचे संदर्भ तपासले, तर पवार यांच्या दगाफटक्याच्या राजनीतीच्या अनेक नोंदी महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चिल्या जातात. उद्धव ठाकरे यांनी भाजपासोबत युती करून विधानसभेच्या निवडणुकीत मिळविलेल्या जनाधाराचा गैरफायदा घेत जनतेने नाकारलेल्या पक्षांसोबत नंतर महाविकास आघाडीची मोट बांधली व मुख्यमंत्रिपद मिळविले हा ताजा इतिहास आहे. तो नाकारणे स्वतः ठाकरे यांच्यासाठी फारसे सोपे नाही. शरद पवार यांनी संपादन केलेल्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाचा इतिहासही ठाकरे यांच्या मुख्यमंत्रिपदाच्या कहाणीशी मिळताजुळता आहे. १९७७ मध्ये इंदिरा काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन शरद पवार यांनी रेड्डी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. १९७८ मधील विधानसभा निवडणुकीत इंदिरा काँग्रेस आणि रेड्डी काँग्रेस (काँग्रेस-यू) स्वतंत्रपणे लढल्या होत्या. त्या निवडणुकीत जनता पक्ष हा सर्वांत मोठा पक्ष ठरला, पण बहुमतासाठी त्यांना जागा कमी पडल्याने, इंदिरा काँग्रेस व रेड्डी काँग्रेसने एकत्र येऊन वसंतदादा पाटील यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन केले. पुढे अंतर्गत मतभेद वाढत गेले आणि अवघ्या सुमारे साडेचार महिन्यांत शरद पवार यांनी ४० आमदारांसह बंडखोरी करून सरकार पाडले व पुलोदची स्थापना करून जनता पक्षासोबत सरकार स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. शरद पवार हे महाराष्ट्राचे पहिले सर्वांत तरुण मुख्यमंत्री बनले, पण वसंतदादांच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे राजकारण अशीच त्यांच्या या राजकारणाची नोंद महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात झालेली आहे. त्यांचे हे सरकार अल्पजीवीच ठरले आणि पवार यांच्यावर दीर्घकाळ सत्तेबाहेर राहण्याची वेळ आल्याने त्यांनी पुन्हा काँग्रेसच्या वळचणीस जाण्याच्या हालचाली सुरू केल्या. पुढील इतिहासातही पवार यांच्या राजकारणावर सातत्याने अनाकलनीयतेचेच शिक्के मारले जात होते, हे महाराष्ट्राने अनुभवले आहे. बहुधा त्यामुळेच, चार वेळा मुख्यमंत्रिपद मिळवूनही स्वबळावर सरकार स्थापन करणे दूरच, पण एकदाही त्यांचे सरकार पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही. इतरांना बेसावध ठेवून सत्तेचे राजकारण करणारा बेभरवशी नेता अशी त्यांची प्रतिमा आजही महाराष्ट्रात कायमच असल्याने शाह यांनी पवार यांच्यावर केलेल्या दगाफटक्याच्या राजकारणामुळे महाराष्ट्रात फारसे वादळ माजले नाही.

मुळात, अमित शाह यांच्यावरील तडीपारीच्या आदेशामागील वास्तव एव्हाना पुरेसे स्पष्ट झाले असून, तरीही पवार यांच्यासारख्या नेत्याने त्याचा उल्लेख करण्यामागे स्वतःच्या बचावाबरोबरच जनतेची नव्याने दिशाभूल करण्याच्या प्रयत्नांव्यतिरिक्त अन्य काही हेतू असेल असे दिसत नाही. अमित शाह यांना ज्या प्रकरणात आदेश बजावण्यात आला होता, ते प्रकरण एका देशद्रोही कुख्यात स्मगलरच्या एन्काऊंटर प्रकरणातील होते आणि त्या कारवाईच्या विरोधात एकवटलेल्यांच्या फळीतही, भाजपाविरोधाचाच विखार होता. अन्यथा, भाजपाला विरोध करताना आपण एका देशद्रोह्याचे समर्थन करत असून त्याच्यावरील कारवाईस विरोध करत आहोत, याचे भान विरोधकांनी राखले असते. २०१९ मधील महाविकास आघाडीची स्थापना, उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाचे गाजर दाखवून भाजपासोबतच्या युतीमधून बाहेर काढणे व जनतेने नाकारलेल्या पक्षांची मोट बांधून सरकार स्थापन करणे हा दगाफटक्याच्या राजकारणाचाच नमुना मानला जातो. महाराष्ट्रातील पवार यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदापासून २०१९ मधील महाविकास आघाडीच्या स्थापनेपर्यंतच्या राजकीय कारवायांचा इतिहास अशाच राजकारणाने रंगलेला दिसतो. १९९३ मधील बॉम्बस्फोटांनंतर स्फोटांच्या संख्येत अकारण वाढ करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न असो किंवा कुख्यात स्मगलर दाऊदचे साथीदार असल्याचा आरोप असलेल्यांना सोबत घेऊन प्रवास करणे असो, पवार यांच्या त्या त्या वेळच्या प्रत्येक राजकरणाभोवती संशयाचे वादळ घोंघावत राहिले होते. भारतात शरण येऊन स्वाधीन करण्याची तयारी दाऊद इब्राहिमने दाखविली होती, पण पवार यांनी त्यास नकार दिला, असा एक गौप्यस्फोट कायदेतज्ज्ञ राम जेठमलानी यांनी केला होता. ज्याच्या कारवायांनी उभा देश कित्येक वर्षे त्रस्त राहिला, असा खतरनाक दहशतवादी स्वाधीन होण्यास तयार असतानाही पवार यांनी त्याच्या शरणागतीस नकार देऊन त्याचे समर्थनही केले होते, हे देशाने पाहिले आहे. त्यामुळे अमित शाह यांनी पवार यांच्यावर केलेल्या दगाफटक्याच्या राजकारणाचा आरोप महाराष्ट्रास तरी नवा नाही. आता शाह यांनी केलेल्या आरोपातून आपला बचाव करण्यासाठी पवार यांनी शाह यांच्यावर केलेल्या आरोपामुळे होणाऱ्या प्रतिहल्ल्यांतून दगाबाजीच्या राजकारणाचे दाखले समोर येऊ लागतील, तेव्हा पवार यांची पाठराखण करण्यासाठी पुढे येणाऱ्या पाठीराख्यांच्या इतिहासाचीही उजळणी होऊन महाराष्ट्राचे नवे मनोरंजन सुरू होईल यात शंका नाही. ▮

## दखल

**प्रणय पराते**

# राम मंदिर : राष्ट्रजीवनाला कलाटणी देणारा विषय

अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठेला तिथीनुसार नुकतेच एक वर्ष पूर्ण झाले. त्या पृष्ठभूमीवर मंदिर आंदोलनाचा थोडक्यात आढावा घेणे औचित्यपूर्ण ठरेल. अयोध्येतील श्रीराम जन्मभूमीवर मंदिर उभे करण्याचे आंदोलन दीर्घ काळ चालले. या काळात अनेक वेळा काही बुद्धिभ्रम करणारी मंडळी किंवा या विषयाचा गाभा आणि तीव्रता याचा गंधही नसलेली मंडळी अगदी सहजपणे, 'इतकी मंदिरे असताना आणि त्यांचीच व्यवस्था आपल्याला ठेवता येत नसताना आणखी एका मंदिराची काय गरज?' 'देशात बेरोजगारी, भाकरी असे जीवन-मरणाचे प्रश्न असताना मंदिरासाठी इतका आटापिटा करण्याची काय गरज?' 'केवळ राजकारणासाठी हा विषय पेटवला जात आहे.' अशा प्रकारची सवंग विधाने करत होती. मात्र, याच आंदोलनाच्या काळात घडलेले देशातील सामाजिक, वैचारिक, सांस्कृतिक परिवर्तन पाहिले की लक्षात येते, श्रीराम जन्मभूमी आंदोलनाने देशाच्या स्वभावात, मान्यतांमध्ये आमूलाग्र परिवर्तन केले आहे. इंग्रजांकडून स्वराज्य मिळाल्यानंतर डोळे झाकून केवळ पाश्चात्त्यांची नक्कल करणारा देश आता आपल्या स्वत:च्या तंत्राने विचार करू लागला आहे. नव्हे, त्याच्या पुढे जाऊन जगाला मार्गदर्शन करण्याची आपली क्षमता जगाला दाखवून देण्याच्या स्थितीत देश येऊन पोहोचला आहे. देशाला कलाटणी देणारा विषय म्हणून व्यापक दृष्टिकोनातून या विषयाकडे पाहिले पाहिजे. 'करवट बदल रहा है देखो भारत का इतिहास' असे एक गीत आहे. भारताच्या इतिहासाने कसे वळण घेतले, याचा अनुभव श्रीराम जन्मभूमी आंदोलन ज्यांनी जवळून पाहिले आहे, त्यांना नक्कीच आला आहे.

यातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा आहे तो राष्ट्रवादाचा. राष्ट्र ही संकल्पना केवळ भूभागातील सीमांनी किंवा त्या भूभागावर कोण राज्य किंवा शासन करत आहे, यावर अवलंबून नसते. एका जनसमूहाला भावनिकरीत्या आणि जीवनरचनेच्या आधारावर एकत्र बांधून ठेवणारी शक्ती म्हणजे राष्ट्र असते. थोडक्यात समान जीवनमूल्ये आणि समान जीवनश्रद्धा यामधून समूहाच्या मनात एकतेची, एकत्र बांधिलकीची भावना तयार होते ती राष्ट्र असते. 'होय, मी केशव बळीराम हेडगेवार म्हणतो की, हे हिंदुराष्ट्र आहे' असे डॉ. हेडगेवार म्हणाले होते. मात्र, तेव्हापासून संघ स्वयंसेवक किंवा अन्य कोणीही असा दावा केला की, टीका करणारे, भ्रम निर्माण करणारे लगेच 'मग या देशातील अहिंदूंचे काय? लाखो मुस्लिम, ख्रिश्चन यांना देशाबाहेर हाकलून लावणार काय?' असे प्रश्न विचारत होते. मुळात हिंदू हे कोण्या एका प्रार्थना पद्धतीचे नाव नाही. मात्र, खुबीने त्याची तुलना मुस्लिम, ख्रिश्चन या प्रार्थना पद्धती निदर्शक समुदाय वाचक नावाशी केली जात होती. प्रार्थना पद्धतीशी हिंदुत्व किंवा हिंदू राष्ट्र ही संकल्पना निगडित नाही हे समाजाला, जगाला पटवून देण्यासाठी एका मंदिराचे आंदोलन उपयोगी ठरले, हे या विषयातील एक मर्म आहे. याचे कारण, जी राष्ट्रभावना या देशातील जनतेच्या मनात प्राचीन काळापासून रुजली आहे ती 'श्रीराम' या व्यक्तिमत्त्वाशी, नावाशी जोडलेली आहे. एकही शब्द न समजणाऱ्या विविध भाषा या देशात बोलल्या जातात. खाण्यापिण्याच्या, परिधान करण्याच्या कितीतरी भिन्न पद्धती देशभर आहेत. मात्र या सर्व भागात देशात श्रीराम, श्रीकृष्ण, शिव, गंगामाता, गोमाता, ओम अशा प्रतीकांबद्दल समान श्रद्धाभाव आहे. आदर्श जीवन पद्धतीत तर जी समानता आहे ती रामचरित्राशी जोडली आहे. आदर्श मुलगा कसा असावा तर वडिलांचे वचन पूर्ण करण्यासाठी सिंहासनाच्या पायऱ्या चढत असताना त्या उतरून वनवासाला जाणारा इतका आज्ञाधारक असावा, भा□□ऊ कसा असावा तर मोठा भाऊ वनवासाला गेला असताना त्याच्या पादुका सिंहासनावर ठेवून निरपेक्ष भावनेने राज्य सांभाळणारा असा भरतासारखा असावा. हे सगळे केवळ एका आदर्श गोष्टीतील बोध किंवा मुद्दे नाहीत तर भारतीय समाजजीवनात सहजपणे स्वीकारलेल्या मान्यता आहेत. त्यामुळे श्रीराम जन्मभूमीचा विषय विविध भाषा, प्रांत या सर्व भेदांना ओलांडून सर्वसामान्यांच्या मनाला स्पर्शून गेला. राम जन्मभूमीवर मंदिर उभे करण्यासाठी संपूर्ण देशभरातून लोक अयोध्येच्या दिशेने अनेक संकटांवर मात करत निघालेले जगाने पाहिले. प्रत्येकाला कल्पना नसलेली मनाच्या कोपऱ्यात, हृदयाच्या स्पंदनात दडलेली ही जीवनरचनेची समानता जी राष्ट्र या भावनेचा पाया आहे ती राम जन्मभूमी मंदिर आंदोलनाने सहजपणे प्रकट झाली. आपला राष्ट्रवाद कोणता, येथील जनमानसात कोणता समान भाव वसलेला आहे याचा शब्दात नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभव या आंदोलनात आला. श्रीराम शिलापूजन, श्रीराम ज्योतयात्रा, कारसेवा अशा अनेक अभियानात सर्वसामान्य माणसाला रामसेवेत काही करण्याची संधी होती. सगळा देश सर्व भेद अगदी सहजपणे विसरून मनात, समाजात वसलेल्या राम नावाच्या व्यक्ती नव्हे, प्रवृत्तीसाठी काम करायला उभा राहिला. त्याचा राष्ट्रवाद जागा झाला. आत्मस्वरूपाची जाणीव झाली, हे या आंदोलनाचे यश आहे. या आंदोलनामागचा हेतू एका पूजा पद्धतीतील एक देवाचे मंदिर उभे करणे हा नाही, हे जसे जसे स्पष्ट होत जाईल तसे तसे मुस्लिम, ख्रिश्चन या पूजा पद्धतीतील अनुयायीसुद्धा या विषयात मोकळेपणाने समर्थन देत उभे राहतील हे भविष्यात दिसेलच.

या देशातील विविधतेतही सखोल सांस्कृतिक एकता दडलेली आहे, असे वाक्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले होते. मात्र राम जन्मभूमी मंदिराचे आंदोलन सुरू झाले तेव्हा देशातील परिस्थिती याच्या अगदी विरुद्ध होती. जातीतील तेढ, मठ-मंदिरातील श्रेष्ठत्वाचे दावे, वाद, संकुचित अस्मितांचे संघर्ष पाहिले की सखोल सांस्कृतिक एकतेची कल्पना विरुद्ध टोकाची वाटत होती. मठ, धर्माचार्य, पंथ यांच्यातील वाद, अहंकार शिखरावर पोहोचलेले पाहिले की, यांच्यातल्या एकतेची कल्पना ही काल्पनिक वाटत होती. मात्र, श्रीराम जन्मभूमी आंदोलनात कानाकोपऱ्यातील मठ, आश्रम, महाराज, धर्माचार्य हे आपापले अहंकार, मोठेपणाच्या कल्पना बाजूला ठेवून जेव्हा 'जय श्रीराम' अशी एकच घोषणा देत उतरले तेव्हा त्यांचा अनुयायीवर्गही हे आपलेच काम आहे, असे मनाशी ठरवून नि:संकोचपणे झोकून देत उतरला तेव्हा बाबासाहेब आंबेडकरानी वर्णन केलेल्या सखोल सांस्कृतिक एकतेचे प्रकटीकरण झाले, असे वाटले. ही देशाच्या समाजजीवनाला कलाटणी देणारी प्रक्रिया होती ती या आंदोलनाने साध्य झाली.

समाजात चुकीच्या मान्यता प्रस्थापित करत त्या आधारे आपले राजकीय स्वार्थ साधून घेण्याची एक पद्धत या देशात स्वराज्यानंतर धुरिणांनी रूढ केली होती. उदाहरण म्हणून सर्वधर्मसमभाव हा विषय घेता येईल. समभाव किंवा धर्मनिरपेक्षता यातील निरपेक्षता या शब्दांचा जो अर्थ आहे, त्याच्या नेमके उलट वागणे म्हणजे धर्मनिरपेक्षता किंवा सर्वधर्मसमभाव अशी मान्यता तयार करण्यात आली होती. तोंडाने सर्वधर्मसमभाव म्हणायचे; प्रत्यक्षात शहाबानो यांना पोटगी देण्याची वेळ आली की शरियतला मान्य नाही, असे म्हणत घटनादुरुस्ती करून न्यायालयाने दिलेला निकाल बदलावा लागेल इतका भेदभाव प्रकट करायचा. प्रशासन धर्मनिरपेक्ष असे तत्त्व तोंडाने सांगायचे, मात्र नागरी कायदा सर्वांना सारखा करा म्हटले की, कल्पनेतही ते शक्य नाही, असे भाव प्रकट करायचे. या विषयाला पंथाचा, पंथ अस्मितेचा रंग देत सवंग आणि मतांचा ग□ठा काबीज करण्याचे डावपेच खेळायचे. श्रीराम जन्मभूमी मंदिर आंदोलन आणि शहाबानो प्रकरण हे एकाच काळात आलेले दोन विषय आणि त्यावेळी राजकारण्यांचा व्यवहार यातून जनतेसमोर सगळी ढोंगबाजी उघड झाली. देशात राजकीय परिवर्तन घडण्याची प्रक्रिया श्रीराम जन्मभूमी आंदोलनामुळे गतिमान झाली, यात काही दुमत असण्याचे कारण नाही. ▮

९८२३१९०१७४

## वेध

**प्रफुल्ल क. व्यास**

# साहेब व्हीसीत आहेत जनतेच्या कामाचे काय?

आपण कोरोनात महामारी बघितली. त्या काळातील स्थित्यंतरे भविष्यातही अनुभवावी लागणार आहेत. कोरोनातील कमी लोकांमध्ये लग्न वगैरे चांगल्या गोष्टी भविष्यातही सुरू राहायला हव्या, असे त्यावेळी वाटत होते. पण, तसे होऊच शकले नाही. फक्त लग्न कार्याचा विचार केला तर कोरोना काळापेक्षा जास्त सुसाट खर्च आताच्या काळात होऊ लागला आहे. त्यावेळी सरकारनेच विवाह कार्यावर लगाम कसली होती. आता रेल्वेचे थांबे आणि केंद्र सरकारच्या रेल्वेतील सुविधा सोडल्या तर सर्व काही रुळावर आलेले आहे. कोरोनाने घरेची घरे उद्ध्वस्त केली. त्या काळाची आठवणीही नकोशी होते. वैद्यकीय क्षेत्र आणि पोलिसांनी जीवाच्या पलीकडे कामे केली. केंद्र सरकारच्या निर्देशावर सरकारी यंत्रणेनेही त्या काळाला साजेसे असेच काम केले. महाराष्ट्राचे तत्कालीन विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस राज्य पिंजून काढत होते आणि मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे आभासी होते. त्या काळाने दोन गोष्टी प्रामुख्याने दिल्या. त्या कोणासाठी चांगल्या तर कोणासाठी वाईटही असू शकतात. त्यातील एक म्हणजे खाजगी कंपन्यांमध्ये 'वर्क फ्रॉम होम' आणि दुसरी म्हणजे शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी 'व्हिडीओ कॉन्फरन्स!' कोरोना काळात ज्यांना साधारणत: आयटी क्षेत्राशी संबंधित असलेल्या नोकऱ्या लागल्या, त्यातील अनेक कर्मचाऱ्यांनी स्वत:चे कार्यालयही बघितले नाही. आपल्याला ज्यांनी कामावर ठेवले, आपल्याला प्रतिष्ठा मिळवून दिली, जे आपल्याला वेतन देते त्या कार्यालयाची पायरीच आपल्याला माहिती नसणे, ही बाब चांगली की वाईट, हे कोंबडी आधी की अंडे या प्रश्नासारखे होईल. वर्क फ्रॉम होम काही लोकांसाठी प्रतिष्ठेचे झाले. खाजगी कंपन्यांची वेतन दिले की काम संपले, डोकेदुखी कमी झालेली आहे. भारतातून विदेशात गेलेले अनेक जण कोरोनाच्या महामारीत मायदेशात परत आले आणि वर्क फ्रॉम होम घेऊन घरबसल्या काम करीत आहेत. वर्क फ्रॉम होम हा संबंध थेट खाजगी कंपनी आणि त्यांच्या कर्मचाऱ्यांसोबत असल्याने त्याचा सामान्य नागरिकांवर तसा परिणाम होत नाही. परंतु, दुसरा जो शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी असलेला व्हिडीओ कॉन्फरन्स हा विषय डोकेदुखी ठरतो आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना उघडपणे बोलता येत नाही. परंतु, सामान्य नागरिकांच्या कामावर त्याचा परिणाम होताना दिसून येतो. आठवड्यातील तीन दिवस दोन ते चार तास अधिकारी व्हिडीओ कॉन्फरन्समध्ये अडकून असतात. गावखेड्यातून शासकीय कार्यालयात भेटायला आलेल्याला बहुतांश वेळा 'साहेब' व्हीसीत आहेत, असाच निरोप दिला जातो. कोरोना काळात दिवसातून चार ते पाच तास व्हीसी. त्यानंतर व्हीसीत मुंबई, दिल्लीतील अधिकाऱ्यांनी दिलेल्या सूचना आपल्या खालच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत पोहोचविणे आणि त्याची अंमलबजावणी करून त्याचे उत्तर देण्यात अधिकाऱ्यांचा वेळ निघून जात होता. आजही वेगवेगळ्या विभागांच्या दिवसातून सरासरी दोन तास व्हीसी झाल्याशिवाय राहत नाही. पूर्वी एका मीटिंगसाठी नागपूर-मुंबईला अधिकाऱ्यांना जावे लागत होते. आता व्हीसीच्या माध्यमातून वेळ आणि पैसा दोन्ही वाचत असले, तरी साहेब कार्यालयात राहून गरजूंना भेटू शकत नाहीत, हेही वास्तव आहे. 'व्हीसी' या शब्द जन्माला येण्यापूर्वी बाहेर बैठकीला जाणारे जिल्हाधिकारी वा तत्सम अधिकारी 'चार्ज' देऊन जात होते. आता चार्जही दिला जात नाही आणि व्हीसीच्या जोखडात अडकल्याने कामंही निघत नाहीत. व्हिडीओ कॉन्फरन्स आधुनिक युगातील एक महत्त्वाचं संवाद साधन असले, तरी त्याच्या काही मर्यादा आहेत. यात सर्वांत महत्त्वाचे म्हणजे माणसं भेटणे हा सामाजिक विषयच बंद झाला. प्रत्यक्ष बैठकीत होणारा संवाद कमी झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यापासून प्रत्येक दिवसाला नवीन काही तरी चांगले होताना प्रत्यक्ष दिसून येत आहे. दोन दिवसांपूर्वी त्यांनी मंत्र्यांच्या बंगल्यावर होणाऱ्या अवाजवी खर्चावर लगाम लावण्याचा निर्देश दिला. त्यापूर्वी अधिकाऱ्यांना विकासाचा १०० दिवसांचा प्लॅन करायला लावला. मंत्र्यांना तीन दिवस मंत्रालयात राहण्याच्या सूचना केल्या. नव्या सरकारमध्ये खाजगी सचिव किंवा विशेष कार्यकारी अधिकारी म्हणून खाजगी व्यक्तीच्या नियुक्तीला मनाई करण्यात आली आहे. राज्यातील महानगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न झाल्याने लोकप्रतिनिधीच नाहीत. राज्य सरकार राज्याच्या विकासासाठी १०० दिवसांचा आराखडा तयार करीत असताना अधिकारी-कर्मचारी व्हीसीत अडकून राहतील तर १०० दिवसांच्या कामांचे काय होईल? आधीच सरकारी अधिकारी, कर्मचाऱ्यांना कामाचा उत्साह! उशिरा येणे आणि वेळेच्या पूर्वी कार्यालय सोडण्याची हातोटी असल्याने सामान्य नागरिकांना अजूनही शासकीय कामांविषयी विश्वास नाही. तो मिळविण्यासाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांवर सरकारचा वचकही आवश्यक आहे. ▮

९८८१९०३७६५

## प्रासंगिक

**मोरेश्वर बडगे**

# एक कराड अडकला, इतर 'कराडां'चे काय?

महाराष्ट्राचे राजकारण एकंदरीत कोणत्या दिशेने चालले आहे, याची साक्ष देणाऱ्या घटना अलिकडे वाढल्या आहेत. आपण महाराष्ट्रात आहोत की बिहारमध्ये असा प्रश्न पडावा, अशा या घटना आहेत. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबरला हत्या झाली. त्यावरून गेले महिनाभर राजकारण तापले आहे. एका लोकप्रिय सरपंचाची अतिशय निर्घृणपणे हत्या होते आणि ज्या निर्ढावलेपणाने यातील आरोपी पोलिसांना सापडत नाहीत, त्यांचे आश्रयदाते मोकाट हिंडतात. शेवटी यातला सूत्रधारच 'शरण' येऊन पोलिसांचे टेन्शन दूर करतो, हा प्रकार महाराष्ट्राची मान खाली घालवणारा आहे. प्रश्न मृत सरपंचाच्या कुटुंबीयांना न्याय मिळतो की हा तर आहेच; पण स्कॉटलंड यार्ड पोलिसांच्या तोडीच्या मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र पोलिसांच्या इज्जतीचाही आहे. या हत्या प्रकरणात सुरुवातीला तिघे पकडले गेले. मात्र इतर पाच जण हाती यायला महिना उजाडावा लागला. या हत्याकांडाचा सूत्रधार म्हणून ज्याच्याकडे पाहिले जाते, तो संशयित आरोपी वाल्मीक कराडची हिंमत पाहा. तो आधी व्हिडीओ टाकतो आणि स्कॉर्पियो कारमधून पोलिसांना शरण येतो. एक आरोपी अजून मिळायचा आहे. देशमुखांचा भाऊ पाण्याच्या टाकीवर चढला तेव्हा खळबळ उडाली आणि हालचालींना वेग आला. दुसऱ्या दिवशी वाल्मीक कराड याच्या समर्थकांनीही आंदोलन केले. परळी बंद पडली. एका आरोपीच्या समर्थनासाठी शहर बंद पडण्याची ही पहिली घटना असावी. गृहमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांनी या हत्येतले गांभीर्य ओळखले. त्यांनी सीआयडीकडे तपास दिला. त्यामुळे महिनाभराने का होईना, पोलिसांचा तपास बराच सरकला.

बीड हा तसा मागास जिल्हा. मात्र औष्णिक वीज प्रकल्प आणि पवनचक्की प्रकल्पातून येथे गुंडगिरी आली. औष्णिक प्रकल्पातून निघणाऱ्या राखेसाठी माफिया जन्माला आले तर पवनचक्की मालकाला खंडणीखोर सतावू लागले. अवादा या पवनचक्की कंपनीच्या मालकाकडे मागितलेल्या दोन कोटी रुपयांच्या खंडणीच्या आड आल्याने संतोष देशमुख यांची हत्या झाली, असा एसआयटी म्हणजे विशेष तपास पथकाला संशय आहे. वाल्मीक कराडवर सुरुवातीला खंडणी मागितल्याचा गुन्हा होता. मात्र आता त्याला मोक्का लावला असून एसआयटीने त्याची सात दिवसांची पोलिस कोठडी घेतली आहे. आणखी एक आरोपी विष्णू चाटे याच्या फोनवरून कराडच्या कंपनीच्या अधिकाऱ्याकडे खंडणी मागितली, पण केवळ फोनवरून बोलणे झाले. त्यावरून खुनाशी संबंध जोडून मोक्का लावला का? असा प्रश्न कोर्टाने तपास अधिकाऱ्यांना केला. सीआयडी भक्कम तयारी करून कोर्टाकडे गेली आहे. त्यामुळे संतोष देशमुखच्या कुटुंबीयांना न्याय मिळेल,



अशी उमेद जागी झाली आहे. कोर्टाचा मामला असल्याने त्यात वेळ जाणार, पण थोडी कळ सोसावी लागेल. दोषींना सोडणार नाही असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरुवातीलाच सांगितले आहे. एवढेच नव्हे, तर बीड आणि परभणी प्रकरणाच्या चौकशीसाठी त्यांनी जाहीर केल्याप्रमाणे निवृत्त न्यायाधीशांची समितीचीही स्थापन करण्यात आली आहे. हल्ली 'मीडिया ट्रायल'चे खूळ आले आहे. माध्यमे दररोज बातम्या पुरवून न्यायाधीश बनू पाहत आहेत.

या वाल्मीक कराडचेच उदाहरण घ्या. एकेकाळी वाल्मीक भाजपाचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्याकडे घरगडी होता. पुढे त्याने धनंजय मुंडेंशी जुळवून घेतले. पाहता पाहता त्याने स्वत:चे साम्राज्य निर्माण केले. 'वाल्मीक कराडशिवाय धनुभाऊचे पान हालत नाही' असे एकदा पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या. तो जणू प्रती पालकमंत्री होता. त्याच्यावर वेगवेगळ्या प्रकारचे १४ गुन्हे आहेत. तरीही तो सरकारच्या 'लाडकी बहीण' योजना समितीवर होता. यावरून या कराडची किती मस्ती चालायची त्याची कल्पना येईल. आताही त्याच्यावर खंडणीचा गुन्हा आहे. त्याच्यावर खुनाचा गुन्हा लावा म्हणून जिल्ह्यात अनेक सर्वपक्षीय मोर्चे निघाले. आता कुठे खुनाच्या गुन्ह्यात रचलेल्या कटात तो सहभागी असल्याचे पुरावे मिळाल्याचे सीआयडी म्हणते. त्याला मकोका लागला तो यामुळे. मकोका कायदा अतिशय कडक आहे. त्यात आरोपीला जामीन मिळणे अवघड जाते. त्यामुळे आता कराडला सीआयडीपुढे पोपटासारखे बोलावे लागेल. कराडला पकडूनही बीडकरांचे समाधान झालेले नाही. त्यांचा संशय राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर आहे. मुंडेच कराडला चालवत होते, असे त्यांचे म्हणणे आहे. अजून तरी कोण्या आरोपीने मुंडे यांचे नाव घेतलेले नाही. मुंडेच नव्हे तर त्यांच्या राष्ट्रवादीचे सुप्रीमो अजितदादा पवार हेदेखील तोच प्रश्न करायचे. नाव नसताना संशय का? असा अजितदादांचा प्रश्न असायचा. पण आता पाणी नाकातोंडात जाऊ पाहते आहे. बीडमध्ये जे काही घडले आहे, घडते आहे आणि घडणार आहे त्या सगळ्यांचा केंद्रबिंदू धनंजय मुंडे आहेत, अशी एकूण जनभावना आहे. मुंडे यांच्या पाठिंब्याशिवाय कराड एवढी मस्ती करू शकत नाही, असे चौकाचौकात उघड बोलले जात आहे. वाल्मीक कराड ही साऱ्याच राजकीय पक्षाच्या नेत्यांसाठी 'दुभती गाय' होती. त्यामुळे इतकी वर्षे त्याची ठाकूरकी चालली. त्या संतोष देशमुखांचा काय गुन्हा होता? निर्घृणपणे त्याला मारले. मारेकऱ्यांची हिंमत एवढी की, हत्येच्या घटनेचा व्हिडीओ केला. वाल्मीक कराडचे धंदे धनंजय मुंडे यांना माहीत नसतील, असे होऊ शकत नाही. 'कराड माझ्या जवळचा आहे' ही गोष्ट मुंडे यांनी नाकारली नाही. प्रकरण वाढणार नाही, अशी त्यांची कल्पना असावी. पण आग लागली आहे. पुढे चौकशीत निर्दोष ठरले तर मुंडे यांना पुन्हा सरकारमध्ये येता येईल. या मामल्यात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हेही उघडे पडले आहेत. आपल्या एका सहकाऱ्याचा साथीदार खुनाच्या आरोपाखाली पकडला जात असेल तर त्याच्या मंत्रिपदाचा राजीनामा घेतला पाहिजे, असे अजितदादांना अजूनही वाटत नाही, हे धक्कादायक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच आता तिसरा डोळा उघडण्याची वेळ आली आहे. राजकारणात चारित्र्य, नीतिमत्ता टिकली नाही तर मग जंगलराज दूर नाही. ते दिवस रोखायचे असतील तर देवेंद्र फडणवीस यांना कठोर व्हावे लागेल. कराड व्यक्ती नाही, प्रवृत्ती आहे. प्रत्येक जिल्ह्यात एक कराड आहे. फडणवीसांनी तो शोधून राजकारण शुद्ध करावे ही जनसामान्यांची अपेक्षा आहे. ▮

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.) ९८५०३०४१२३

### सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य

राज्य सरकारमध्ये नोकरी करणारा माणूस वयाच्या ५८ व्या वर्षी निवृत्त होतो, तर केंद्र सरकारमध्ये नोकरी करणारा माणूस वयाच्या ६० व्या वर्षी निवृत्त होतो. शासकीय नोकरीत ही वयोमर्यादा निश्चित केलेली आहे. तथापि व्यापारी, खेळाडू व राजकारणातील मंडळींना मात्र निवृत्तीचे वय ठरलेले नसते. व्यापारी लोक साधारणतः त्यांचा मुलगा त्यांचा व्यापार सांभाळण्यास सक्षम झाल्यानंतर व स्वत:चे शरीर थकल्यानंतर निवृत्ती घेतात. खेळाडू त्यांची कामगिरी कमी झाल्यानंतर निवृत्तीचा विचार करतात. पण राजकारणातील लोकांना निवृत्तीची कुठलीही वयोमर्यादा नाही व त्यामुळे हे लोक स्वतःहून निवृत्त व्हायला तयार नसतात, असे दिसते.

क्रिकेट खेळाडूच्या बाबतीत दिग्गज खेळाडू सुनील गावस्कर यांनी केव्हा निवृत्त व्हायचे याबाबत योग्य मत दिले आहे. ते म्हणतात, खेळाडू जेव्हा आपल्या कामगिरीच्या उच्च स्तरावर असतो, तेव्हा त्याने निवृत्त व्हावे, म्हणजे तो लोकांच्या चांगला लक्षात राहतो. कामगिरी कमी झाल्यानंतरही खेळायला मिळत आहे म्हणून खेळणे हे लोकांना आवडत नाही व त्या खेळाडूबद्दल लोकांमध्ये वाईट मत तयार होते. याबाबतीत योग्य वेळी निवृत्ती घेणाऱ्या खेळाडूंचे उदाहरण सांगायचे झाल्यास सुनील गावस्कर, सचिन तेंडुलकर, कपिल देव ही मंडळी योग्य वेळी निवृत्त झालेली दिसते. या क्षेत्रात नुकताच निवृत्त झालेला स्पिनर आश्विन हा काहीसा अनपेक्षितपणे निवृत्त झालेला दिसतो. निवृत्तीनंतरचे आयुष्य म्हणजे खऱ्या अर्थाने पती-पत्नीला एकमेकांना वेळ देता येतो. सबब, ज्यांना ज्यांना निवृत्तीची वयोमर्यादा नाही, त्यांनी आपल्यासाठी कोणती तरी वेळ योग्य आहे याचा विचार करून स्वतः निवृत्त व्हावे व आयुष्य आनंदात जगावे.

**शशिकांत दलाल**/९८२२३६५१९०

••••

### हिंगणघाट येथील रेल्वे समस्या

हिंगणघाट येथील रेल्वे समस्या नवीन नाहीत. मी पुन्हा महत्त्वाच्या ४-५ समस्या मांडत आहे. बलारशाहवरून मुंबई, पुणे येथे जाण्यासाठी आठवड्यात फक्त एकच दिवस गाडी आहे. तसेच या भागातील हजारो भाविक शेगाव येथे दर्शनास जात असता. येताना ११२२ भुसावळ-वर्धा पॅसेंजरने वर्धा येथे रात्री ९ वाजता आल्यास बल्लारशाहकडे जाण्यास गाडी नाही. रात्रभर वर्धा स्टेशनवर राहावे लागते. सकाळी ६.३० वाजताच मेमु आहे. या समस्या दूर करणे आवश्यक आहे. तसेच २२१५१-२२१५२ पुणे-काझीपेठ-पुणे ही गाडी रोज सुरू करावी किंवा सध्या तरी आठवड्यातून ३ दिवस तरी करावी. २२१०९-२२११० बल्लारशाह-लोकमान्य टिळक-बल्लारशाह ही गाडी रोज किंवा कमीत कमी ३ दिवस तरी करावी. तसेच या मार्गावर शेगाव, मनमाड येथे थांबे नाहीत, ते देण्यात यावे. हेही शक्य नसेल तर २२१०९-२२११० ही गाडी ४ दिवस मुंबई व ३ दिवस कल्याण मार्गे पुणे अशी करण्यात यावी. ज्यामुळे सातही दिवस कमीत कमी कल्याण येथे जाता येईल व ४ दिवस (काझीपेठ) धरून पुणे येथे जाता येईल. ११२१-११२२ भुसावळ-वर्धा पॅसेंजर बल्लारशाहपर्यंत वाढविण्यात यावी. बल्लारशाह-नागपूर-बल्लारशाह मेमू सुरू करण्यात यावी. धनबाद -कोल्हापूर, हिस्सार, बिकानेर, तसेच दानापूर या गाड्यांचे थांबे येथे देण्यात यावेत. प्रवाशांच्या मागणीकडे रेल्वे प्रशासन लक्ष देईल, अशी अपेक्षा आहे.

**चंद्रशेखर विष्णुपंत खापरे**/९४२३४२०१७१

## वाचक पत्रे

••••

### अतिक्रमणधारकांची बिलकूल हयगय नको

कोर्टाच्या आदेशाने का न होवो पण सध्या नागपुरात ठिकठिकाणी अतिक्रमण हटाव मोहीम जोरदार सुरू आहे. रस्ते मोठे झाले रे झाले की हे हातठेले, चिल्लर दुकाने फूटपाथवरच आपले ठाण मांडून बसतात. मोठ्या दुकानासमोरच बसतात. ना टॅक्स, ना विद्युत बिल यांना भरावे लागते. परंतु सरकारी रस्ता मात्र अडवून बसण्याचे देशप्रेम यांच्यात नक्कीच असते. एक माणूस आपले चार-पाच ठेले लावून बसतो. महिला ग्राहकांशी तर मुजोरी करतो. यात गरीब जागच्या जागी राहून संधिसाधू लोक आपला फायदा करून घेत आहे. कल्याणेश्वर मंदिर, केळीबाग रोड, बर्डी मेन रोड, कमाल टॉकीज चौक असे अनेक रस्ते आज यांनीच फुलून गेले आहे. आता तर ते मोर्चा काढून फूटपाथची अर्धी जागा हक्काने मागत आहेत. त्यांच्या मागणीचा सरकारने बिलकूल विचार करू नये आणि या कार्यात जो कोणी नेता, नगरसेवक, आमदार सहभागी होईल त्याला जनतेने चांगलाच धडा शिकवावा. या लोकांना एक वेगळा हॉकर्स झोन तयार करून द्यावा जो रस्त्याच्या मध्ये येणार नाही, रहदारीस अडथळा होणार नाही असा. शिवाय यांना अधिकृत ओळखपत्रे देऊन यांच्यापासून महानगर पालिकेने शुल्कही आकारावे. या अतिक्रमणकारी लोकांमध्ये किती नागपूरचे स्थायी आहेत व किती बाहेरून आले आहेत याचीही चौकशी करायला हरकत नाही. एकदा का यांची बाजू सावरली की हे सबंध नागपूर गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही. ▮

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त वृत्त

### सोलापुरात सर्व शाखीय ब्राह्मण वधू-वर परिचय मेळावा

**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

अनुरूप वधु वर सुचक केंद्र सोलापूर वतीने दि. १९ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता शिवस्मारक सभागृह, एस. टी. स्टँड जवळ, सोलापूर येथे भव्य राज्यस्तरीय सर्व शाखीय ब्राह्मण प्रथम वधु-वर, घटस्फोटीत, विधवा, विदुर, पुनर्विवाह इच्छुक वधू-वरांचा भव्य मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. मेळाव्यात राघवेंद्र आद्य गुरुजी वधू वर व पालकांना मार्गदर्शन करणार आहेत.

अनुरूप वधु वर सुचक केंद्राचा हा ४८ वा मेळावा असून मेळाव्यासाठी नांव नोंदविलेल्या सर्व वधू-वरांची रंगीत फोटोसह पुस्तिका घरपोच देण्यात येणार आहे. सर्व वधू-वर इच्छुकांनी पालकांसह कार्यक्रमास उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या संचालिका प्रेरणाताई रानडे यांनी केले असून अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक.९८८११३३१२२ संपर्क साधावा. किंवा अनुरूप वधु-वर सुचक केंद्राच्या ए.डी. जोशी पेट्रोलपंप, जुळेसोलापूर, येथील कार्यालयात संपर्क साधावा.

मेळाव्याला वधू-वराने एक फोटो व बायोडाटासह उपस्थित राहावे. ब्राह्मण वधु वर मेळाव्यासाठी पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, कोकण, कर्नाटक, तेलंगणा ,येथील वधू-वरांची नोंदणी झालेली आहे.

## निधन वार्ता

### सूर्यकांत कापसे



**वैराग, दि. १६ जानेवारी -**

बार्शी तालुक्यातील जवळगाव येथील सूर्यकांत हरिदास कापसे (वय ५८ वर्ष ) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले ते तुळशीदास जाधव प्रशाला वैराग येथे शिक्षक म्हणून कार्यरत होते . त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, एक मुलगी, सून, वडील, दोन भाऊ, पुतणे असा परिवार आहे.


### महावीर कोळेकर



**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

धनगर समाजाचे नेते व महाशक्ती सामाजिक संशोधन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महावीर भागवत कोळेकर, वय ६४ वर्षे यांचे गुरुवार, १६ जानेवारी रोजी अकस्मात निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ, बहिणी असा मोठा परीवार आहे. पुणेनाका स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

### ऋतुराज खाडिलकर



**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

न. पु. खाडिलकर आणि सन्सचे ऋतुराज श्रीराम खाडीलकर (वय २६, रा. दक्षिण कसबा सोलापूर) यांचे गुरुवारी प्रदीर्घ आजारानंतर दुःखद निधन झाले. लक्ष्मीकांत गवई यांचे ते जावई होते.

### मिंचव्वा खाडे



**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

मिंचव्वा तोटाप्पा खाडे (वय ७६, रा. होटगी स्टेशन) यांचे अल्प आजारांमुळे गुरुवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. रेल्वे विभागातील रेल्वे ड्रायव्हर महेंद्र खाडे यांच्या त्या मातोश्री होत.

### अनिस शेख



**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

नॅशनल उर्दू प्राथमिक शाळेचे निवृत मुख्यध्यापक अनिस जाफरसाब शेख राहणार वामन नगर डीमार्ट जवळ ५९ व्या वर्षी हृदय विकाराने निधन झाले त्यांच्या पाश्चात पत्नी, मोठा भाऊ, एक मुलगा व मुलगी आहेत. मोदी कब्रस्तान येथे नमाज जनाजा अदा करून तेथेच दफन करण्यात आले. मुंबई येथील रेल्वेचे कर्मचारी सईद शेख यांचे ते लहान भाऊ होते.

### कलावती ठेंगले



**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

हिपळे येथील कलावती अप्पाराव ठेंगले (वय-१०३) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे त्यांच्या पश्चात सहा मुले, दोन मुली,२० नातवंडे असा मोठा परिवार आहे. हिपळे गावचे माजी सरपंच मारुती ठेंगले यांच्या मातोश्री तर ठेंगले डेव्हलपर्सचे मालक विष्णू ठेंगले व महेश ठेंगले यांच्या त्या आजी होत.

### पार्वती गुंडे



**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

कै. पार्वती मलकारी गुंडे यांचे दि. १६ जानेवारी रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६५ होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सूना, नातवंड असा परिवार आहे.

### गजराबाई कुमठाळे



**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

कै. गजराबई सिद्धाराम कुमठाळे यांचे दि.१६ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ६ भावंडे, तीन मुली व नातवंडे असा परिवार आहे.

# गड्डा यात्रेसह विविध पेठांमध्ये मिळकतकर थकबाकीदारांच्या नावांचे फलक लावणार

## प्रत्येक पेठेत, मध्यवर्ती ठिकाणी लागणार दोन डिजिटल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

मिळकत कर थकबाकी वसुलीसाठी आता महापालिका प्रशासनाने गड्डा यात्रेसह शहरातील विविध पेठांमध्ये मिळकतकर थकबाकीदारांच्या नावाची यादी असलेले डिजिटल फलक लावण्याचे नियोजन केले आहे. शुक्रवारपासून शहरातील विविध ठिकाणी हे फलक लावण्यात येणार आहेत, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली. सोलापूर शहरात मिळकतकर थकबाकी वसुलीची मोहीम जोरदारपणे सुरू आहे. थकबाकी पोटी नळ कनेक्शन तोडणे यासह अन्य कारवाई केली जात आहे. त्याचबरोबर आता महापालिका प्रशासनाकडून मिळकतकर थकबाकीदारांच्या नावांची यादी डिजिटल द्वारे प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

सोलापूर शहरातील विविध ५४ पेठांमध्ये असे डिजिटल फलक लावण्यात येणार आहेत. प्रत्येक पेठेत दोन मध्यवर्ती ठिकाणी डिजिटल द्वारे थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. प्रत्येक फलकावर २० थकबाकीदारांची यादी राहणार आहे. सोलापूर शहरातील श्री सिद्धेश्वर यात्रा (गड्डा यात्रा) परिसरातही मिळकतकर थकबाकीदारांच्या नावांची यादीचे फलक लावण्यात येणार आहेत. शुक्रवार दि. १७ जानेवारीपासून गड्डा यात्रेसह शहरातील सर्व पेठनिहाय हे डिजिटल फलक लावले जाणार आहेत.

सोलापूर शहरातील मिळकतदारांनी कटू कारवाई टाळण्यासाठी मिळकतकराची थकबाकी भरून महापालिकेला सहकार्य करावे अन्यथा महापालिका प्रशासनाकडून नळ कनेक्शन तोडण्याबरोबरच इतर कारवाई हाती घेण्यात येईल, असे आवाहन महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी केले आहे.

## वसतिगृहासाठी मानधनावर पहारेकरी पदांची भरती

**सोलापूर दि.१६ जानेवारी-**

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलींचे व मुलांच्या वसतिगृह सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रिक मानधनावर पहारेकरी ०२ (प्रत्येकी एक पद) पदे भरावयाचे आहे. जिल्हयातील पात्र माजी सैनिकांनी सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह गुरुवार, दि. २३ जानेवारी २०२५ पुर्वी जिल्हा सैनिक कार्यालयात सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे. पदासाठी पहारेकरी पदाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येईल. मानधन रुपये २० हजार ८८६ रू. प्रतिमहा असेल. तसेच हे पद निवासी आहे. पहारेकरी पदासाठी नियुक्त झालेल्या उमेदवाराने रात्रीचा पहारा देणे व मुक्कामी रहाणे आवश्यक आहे. पहारेकरी पद हे माजी सैनिक, युध्द विधवा व माजी सैनिक विधवा पत्नी यांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह कार्यालयात सादर करावे. पहारेकरी पदाकरीता दि. २३ जानेवारी २०२५ रोजी मुलाखत घेण्यात येईल. तरी उमेदवारांनी स्वत:ची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. माजी सैनिक, युध्द विधवा व माजी सैनिक विधवा पत्नी उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी सोलापूर जिल्ह्यातील पात्र व गरजू माजी सैनिक, युध्द विधवा व माजी सैनिक पत्नी यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तुंगार यांनी केले आहे.



## श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृतचे स्वामी समर्थ मंदिरात प्रकाशन

**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

जेष्ठ साहित्यिक स्व. डॉ.लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी लिहिलेल्यि श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत या ग्रंथाचे प्रकाशन मसाप जुळे सोलापूर शाखेचे अध्यक्ष पद्माकर कुलकर्णी यांच्या हस्ते झाला. विजापूर रोडवरील सुंदरमनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुवारी सायंकाळी हा कार्यक्रम झाला.

बोल्ली यांच्या पत्नी, जेष्ठ नाट्य कलावंत शोभा बोल्ली, कन्या ममता बोल्ली, ज्येष्ठ पत्रकार प्रशांत जोशी, स्वामी समर्थ देवस्थानचे अध्यक्ष रमेश मेंढापुरकर, सचिव संजोग सुरतगावकर, कोषाध्यक्ष रविशंकर हत्याळीकर, माजी अध्यक्ष शिवकूमार कोळकूरे, माजी सचिव योगीनाथ वनारोटे, विश्वस्त श्रीशैल लिगाडे यावेळी उपस्थित होते. यावेळी बोलताना पद्माकर कुलकर्णी यांनी बोल्ली यांच्या साहित्य सेवेची प्रशंसा केली. शोभा बोल्ली यांनी मराठी तसेच तेलुगू साहित्यात लक्ष्मीनारायण बोल्ली यांनी दिलेल्या योगदानाची माहिती दिली. श्रीपादराजं शरणं प्रपद्ये या तेलुगू ग्रंथाचा श्रीपाद श्रीवल्लभ चरितामृत या नावाने मराठी अनुवाद केला. डॉ. विजय कानेटकर यांनी या ग्रंथ निर्मितीसाठी मदत केल्याचा उल्लेख केला. प्रकाशन सोहळ्यानंतर १२५ ग्रंथ देवस्थानला भेट स्वरुपात देण्यात आले.

## मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबीयांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने लाल बावटा बांधकाम कामगार युनियनने पुढाकार घेऊन मोफत रक्त तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सर्व नोंदीत लाभार्थी बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबीयांनी लाभ घेतल्याची माहिती युनियनचे कॉ.अमित मंचले यांनी दिली.



लाल बावटा बांधकाम कामगार युनियन सिटू, सोलापूर व महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दि.१५ जानेवारी रोजी मोफत तपासणी ते उपचार व रक्त तपासणी शिबिर मसिहा चौक, मोदी येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरामध्ये २२४ बांधकाम कामगारांनी त्यांच्या परिवारासह लाभ घेतला. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ नेते माजी आमदार कॉ.नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कॉ. एम एच शेख, प्रा. अब्राहम कुमार, कॉ. शंकर म्हेत्रे, ॲड. अनिल वासम आदींची उपस्थिती होती. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी अजय भंडारे, सिमोन पोगुल गौतम जगले, रवि भंडारे, मसिहा तरूण मंडळाचे सर्व सदस्य व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



## सेंद्रिय शेतीकडे वाटचाल करावी : भूषण मगर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र मोहोळ यांच्यावतीने सोलापूर जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये दुसऱ्या सूत्रातील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये माळशिरस तालुक्यातील मगर निमगाव या गावांमध्ये झालेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात सेंद्रिय कृषी भूषण विजेते तात्यासाहेब मगर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती करताना कोणत्या गोष्टींची काळजी घेतली पाहिजे तसेच विविध सेंद्रिय निविष्ठा निर्माण करण्याचे प्रात्यक्षिक जसे की गोकृपा अमृत पंचगव्य तयार करणे इत्यादी बाबतचे प्रात्यक्षिक करून दाखवले.

अतिशय कमी खर्चामध्ये घरातीलच निविष्ठा वापरून जसे की ताक, गुळ देशी गाईचे शेण गोमूत्र यांचा वापर करून एक चांगल्या गुणवत्तेचे सेंद्रिय निविष्ठा निर्माण करून त्याचा वापर जर आपण पिकांमध्ये केला तर निश्चितच उत्पन्न वाढते आणि अतिशय कमी खर्चामध्ये आपण शेती करून देतो असे तळमळीने श्री तात्यासाहेब मगर शेतकऱ्यांना सांगत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. तानाजी वाळकुंडे उपस्थित होते. या मिशनचे नोडल अधिकारी काजल म्हात्रे मृद शास्त्रज्ञ या काम पाहतात. तांत्रिक सतरा नंतर श्री तात्यासाहेब मगर यांच्या गहू प्लॉटची पाहणी केली असता उशिरा पेरणी झालेला गहू सुद्धा खूप चांगल्या प्रकारे वाढ झालेली आहे त्यावरती मावा ही कीड आली होती परंतु गोकृपाअमृतची फवारणी केल्यामुळे ७० ते ८० टक्के पर्यंत या किडीचा प्रादुर्भाव थांबला आहे, असे उपस्थित शेतकऱ्यांना सांगितले.

तसेच जर या किडीची आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यानंतर एकूण उत्पादनामध्ये ३० ते ३५ टक्के पर्यंत घट येऊ शकते. ही घट रोखण्यासाठी कोणतेही रासायनिक केमिकल न वापरता फक्त गोकृपाअमृत या सेंद्रिय निविष्ठाचा वापर करून सुद्धा मावा किडीचा प्रादुर्भाव रोखता येऊ शकतो हे तात्यासाहेबांनी उपस्थित शेतकऱ्यांना पटवून दिले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रेश्मा शिरसागर तसेच सावंत यांचे देखील सहकार्य लाभले.



## सहिने प्रशालेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

श्री सरस्वती मंदिर संस्था संचालित स.हि.ने. प्रशालेचे वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन उत्साहात साजरा झाला. समारंभाच्या प्रमुख अतिथी म्हणून अयोध्येतील श्रीरामजन्मभूमी सल्लागार समितीचे सदस्य राजगोपाल मुरलीधर मिनियार होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष ॲड. रघुनाथ दामले होते. यावेळी उपाध्यक्ष दत्ताजी कुलकर्णी, कार्यवाह प्रीती चिलजवार, खजिनदार सुधीर देव, संस्थेचे विश्वस्त किशोर चंडक, सदस्य प्रमोद कामतकर, शिरीष कुलकर्णी, रेवती कुलकर्णी, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर उपस्थित होते. व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी प्रास्ताविक केले. दिलीप राठोड यांनी प्रमुख अतिथींचा परिचय करून दिला. विद्या माने यांनी आभार मानले. सूत्रसंचालन पर्यवेक्षक मुकुंद गिरी यांनी केले. विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

महावितरण

**ई-निविदा सूचना**

महावितरण बार्शी संवसु विभागा अंतर्गत चालू आर्थिक वर्षाकरिता वितरण रोहित्रांची व एचव्हीडीएस रोहित्रांची, रोहित्र व तेल, उच्च/लघुदाब वाहिनीचे साहित्य, सिमेंट पोल इत्यादी दुरुस्ती एजन्सी ते फिल्टर युनिट बार्शी/उपविभाग किंवा बार्शी विभागांतर्गत राज्यात कोठेही वाहतूक करणे, चढ/उतार करणे आदि कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागिविण्यात येत आहेत. निविदा क्रमांक ईई/बीआरएस/**T- 06/24-25** (निविदेची रक्कम २० लाख) आणि निविदा भरण्याची सुरुवात दि. **१७.०१.२०२५** सकाळी १०:०० व अंतिम तारीख **२३.०१.२०२५,** १४:०० वाजेपर्यंत आहे. निविदा महावितरणच्या तपशील व डाऊनलोड करण्यासाठी कृपया https://etender. mahadiscom.in /eatapp. संकेतस्थळाला भेट द्या कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणे / नाकारणे व रद्द करणे यासाठी सर्व हक्क अधोरेखित आहेत. कृपया नोंद घ्या.

**कार्यकारी अभियंता,**
**महावितरण, बार्शी विभाग**

**PRO/BMTZ/174/2024-25**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे खांडवी ता. बार्शी तसेच आसपासचे परिसरातील लोकांना या जहिर नोटीसीने कळवण्यांत येते की, डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे खांडवी येथील जमीन ग. नं ५२२/३ क्षेत्र ० हे ८८ आर+ पो.ख. ०.०३ आर एकूण हे ९१ आर आकार रु २.५८ पैसे येणेप्रमाणे संपुर्ण गटाची जमीन आतील दगड माती वगैरे आतील तदंगभुत वस्तुसह.

वर नमुद केलेली मिळकत हि शिवाजी किसन माळी, रा खांडवी, ता. बार्शी ह.मु. सौंदणे ता. मोहोळ जि. सोलापूर यांचे मालकी कब्जे वहिवाटीची न.श. व ७/१२ हक्कपत्रकी नोंद असलेली मिळकत आहे. सदर मिळकत हे वयोवृध्द झालेने त्यांना मेहनत मशागत करता येत नाही त्यामुळे त्यांना सदर करण्यास स्वारस्य राहिलेले नाही त्यामुळे सदरची जमीन विक्री काढलेली आहे. त्याची माहिती आमचे खरेदीदार अशिला शहाजी शाहू बरडे, रा खांडवी यास झालेवर त्यांनी मिळकत खरेदी करण्याचे ठरवुन सदर मिळकतीची बाजारभावाने किंमत ठरवुन व ती मान्य व कबुल करुन सदर मिळकत आमचे अशिलास कायम खुष खरेदी देण्याचा ठराव केलेला आहे. सदर मिळकत हि सिलींग कायदयाअंतर्गत मिळालेली असल्याने ती नवीन शर्तीची आहे त्यामुळे त्यानी सक्षम अधिकारीची विक्री बाबत परवानगी अर्जाचे प्रकरण चौकशी काम चालू आहे.

याउपरही या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वर नमुद मिळकतीसंबंधाने कोणाचेही कसलेही कोणीही गहाण, दान, साठेखत, खरेदीखत, बैंक लोन, खाजगी सावकारी, नोटरी वा तत्सम स्वरुपाचा कोणतेही व्यवहार वा दस्त असलेस संबंधीतानी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा (१५) दिवसात आमचे खालील पत्यावर कागदोपत्री पुराव्यासह येवुन आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आलेस सदर मिळकत हि खरेदीयोग्य व बोजारहीत अहे असे समजुन आमचे अशिल पुढील ठरलेप्रमाणे खरेदीचा व्यवहार पुरा करतील, मुदतीनंतर कोणाचीही तक्रार आमचे अशिलाचे खरेदी हक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसवणुक होवु नये म्हणुन ही खेरदीपुर्व जाहीर नोटीस प्रसिध्दी केली असे तारीख १६/०१/२०२५.

**सही/-**
**श्री. एन.आर. सुतार ॲडव्होकेट,**
**अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय,**
**बार्शी, ता. बार्शी मो. नं ९८२२७१६७१९**
**(अशिलातर्फे ॲडव्होकेट)**

**जाहीर प्रसिध्दीकरण** सिव्हील एम.ए. नं. ०१ /२०२५

**अक्कलकोट येथील मे. सिव्हील जज्ज सो. ज्यु. डी. यांचे कोर्टात**

**१) श्रीमती शिवमंगल बसवण्णप्पा बिराजदार**
**२) जयमाला बसवण्णप्पा बिराजदार**
रा. मधला मारूती मंदिराजवळ, अक्कलकोट
ता. अक्कलकोट, जि. सोलापूर — **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही** — **सामनेवाला**

ज्या अर्थी वरील अर्जदारानी या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज नं. ०१/२०२५ हा बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट कलम २ प्रमाणे वरसा प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केला असून अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील बसवण्णप्पा भिमाशंकर बिराजदार हे दि. ०९/०३/२०१५ रोजी मयत झाले आहेत. कै. बसवण्णप्पा भिमाशंकर बिराजदार यांचे नांवे अक्कलकोट येथे सि. स. नं. १३२० ही मिळकत असून बसवण्णप्पा भिमाशंकर बिराजदार यांचे पश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारस असल्याबाबत वारसा दाखला मिळणेकामी अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळविण्यात येते की, उक्त अर्जाबाबत अथवा यातील अर्जदार हे कै. बसवण्णप्पा भिमाशंकर बिराजदार यांचे वारस असलेबाबत कोणाचे काही म्हणणे अगर हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांत अथवा दिनांक २१ /०२/२०२५ रोजी या न्यायालयात हजर राहून आपली हरकत नोंदवावी, अन्यथा कोणाची हरकत नाही, असे समजून उक्त अर्जदाराच्या अर्जावर पुढील आदेश करण्यात येईल व त्याप्रमाणे अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश मे. कोर्टातर्फे देण्यात येईल. आज रोजी मे. कोर्टाच्या हुकमाप्रमाणे हे जाहीर प्रसिध्दीकरण केले. ता. १५/०१/२०२५

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, अक्कलकोट**

**जाहीर नोटीस** जन्म-मृत्यु प्रकरण अर्ज क्र. ३६७/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात**

**१. मंजुश्री कल्लाप्पा कोटगुंड** — **अर्जदार**
रा. कुंभार बोळ बार्शी ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील पी.पी. वाघमारे)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** — **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, स्वतः अर्जदार, रा. कुंभार बोळ, बार्शी ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक २६ मे १९८६ रोजी जन्म झालेला असून त्यांची जन्म नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३(३) अन्वये जन्म नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी स्वतः अर्जदार यांचा दिनांक २६ मे १९८६ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्यातच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ७ जानेवरी २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

शिक्का

**सही/-**
**कार्यकारी दंडाधिकारी,**
**बार्शी**

**CHANGE IN NAME**

I hereby declare that my old name **BASAMMA SANGAPPA NAVALAGUND** has been changed to new name **SUJATA CHANDRAKANT KALLURKAR**
135-A Konark nagar, Jule Solapur
**(Affi. no.- 83/12)**
**Date - 13/03/2012**

**सोलापूर जनता सहकारी बँक लि.**
SJSB Multi-State Scheduled Coop Bank
मल्टी स्टेट शेड्युल्ड को.ऑप बँक
'गगनभरारी' शिवस्मारक संकुल, गोल्डफिंच पेठ, सोलापूर - ४१३००७
फोन क्र.: 0217- 274 1101 ते 05 ई-मेल : info@sjsbbank.com

**जाहीर नोटीस**

आमच्या बँकेच्या रेल्वेलाईन्स शाखेकडील पिग्मी एजंट यांनी दिलेला राजीनामा मंजूर करण्यात आला आहे. तेंव्हा यापुढे कोणीही त्यांच्याशी बँकेच्या संबधात कोणताही आर्थिक व्यवहार करू नये, तसेच या दरम्यान कोणताही खाजगी व्यवहार केल्यास त्यास बँक जबाबदार असणार नाही याची नोंद घ्यावी.

| अ. क्र. | पिग्मी एजंट नाव | शाखा | राजीनामा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | श्री. रोहित प्रकाश जाधव | रेल्वे लाईन्स | २६/१२/२०२४ |

**सही/-**
**वरिष्ठ अधिकारी**
**बचत गट व पिग्मी विभाग**

**बैंक ऑफ महाराष्ट्र/ Bank of Maharashtra**
**प्रधान कार्यालय/ Head Office**
**लोकमंगल, 1501, शिवाजीनगर, पुणे-5 / Lokmangal, 150,.Shivajinagar, Pune-5**
**आंचलिक कार्यालय, सोलापुर / Zonal office, Solapur**
आंचलिक कार्यालय, अगरवाल पैलेस, पहिला मजला, डी मार्ट – भारती विद्यापीठ रोड, जुले सोलापूर, सोलापुर - 413004
फोन /Phone - (0217) 2733870 / 71 ई-मेल /E-mail: legal sol@mahabank.co.in

**नियम - 8 (1)**
**ताबा सूचना**

तर, अधोस्वाक्षरी केलेले हे बँक ऑफ महाराष्ट्रचे आर्थिक सुरक्षा आणि पुनर्रचना अंतर्गत अधिकृत अधिकारी आहेत. मालमत्ता आणि सुरक्षा व्याजाची अंमलबजावणी कायदा, 2002 आणि कलमाच्या उप-कलम (12) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम, 2002 च्या नियम 3 सह 13 वाचले, 06/05/2024 रोजी डिमांड नोटिस जारी केल्या आणि खालील गोष्टींना आवाहन केले नोटीस मिळाल्यापासून 60 दिवसांच्या आत संपूर्ण थकबाकीची परतफेड करण्याचा उल्लेख कर्जदार आणि जामीनदारांनी केला आहे.

कर्जदाराची रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यास, याद्वारे कर्जदार, जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला नोटीस दिली जाते की खाली स्वाक्षरीने त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेची प्रत्यक्ष ताबा मालमत्ता घेतली आहे. कायद्याच्या कलम 13 च्या उप कलम (4) अंतर्गत सुरक्षा व्याज अंमलबजावणी नियम, 2002 च्या नियम 8 सह वाचले.

विशेषत: कर्जदाराला आणि सामान्यत: जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्ता आणि त्यांच्याशी कोणताही व्यवहार करू नये. येथे नमूद केलेल्या रकमेसाठी मालमत्ता बँक ऑफ महाराष्ट्रच्या शुल्काच्या अधीन असतील.

कर्जदाराचे लक्ष सुरक्षित मालमत्ता कायद्याच्या कलम 13 च्या उप-कलम (8) च्या तरतुदींकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात, पूर्तता करण्यासाठी आमंत्रित केले आहे. .

| अ.क्र. | शाखा, कर्जदार आणि जामीनदार यांचे नाव | गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा तपशील | डिमांड नोटिसची तारीख आणि एकूण थकबाकी |
|---|---|---|---|
| 1 | **शाखा - फलटण गली**<br>**कर्जदार - 1. मे. तिरुपती बालाजी कोटेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड संचालक श्री. पद्माकर माधवराव पाटील आणि मिस. प्रितुषा शांतकिरण चिक्कली जामीनदार- श्री. पद्माकर माधवराव पाटील आणि मिस. प्रितुषा शांतकिरण चिक्कली** | **गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन**<br>प्लॉट नं- C-211 चिंचोली MIDC सोलापूर 3925 चौरस मीटरचे मोजमाप आणि प्रस्तावित तेथे बांधकाम (शेड/इमारत). 1800 चौ. Mtr. M/s च्या नावाने तिरुपती बालाजी कोटेक्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड<br>**खालीलप्रमाणे सीमा:-**<br>उत्तरेकडे : धारफळ-अकोलेकाटी 30 मीटर रोड, पूर्वेकडे : प्लॉट क्र. - 210, पश्चिमेकडे : प्लॉट नं.सी-212, दक्षिणेकडे : प्लॉट क्र. सी-199, सी-200 आणि C-201<br>a) वनस्पतींवरील हायपोथेकेशन आणि यंत्रसामग्री बँक फायनान्समधून खरेदी केली<br>b) संपूर्ण स्थिर मालमत्तेचे हायपोथेकेशन (वर्तमान आणि भविष्यकाळ) | **मागणी सूचना:**<br>दि. 06/05/2024<br>रु. 7,40,02,197/-<br>अधिक लागू न केलेले व्याज w.e.f 06/05/2024 च्या प्राप्तीपर्यंत कर्ज<br>**प्रत्यक्ष ताबा**<br>तारीख: १०/०१/२०२५ |

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - १०/०१/२०२५**

**सही/-**
**मुख्य व्यवस्थापक आणि**
**प्राधिकृत अधिकारी, सोलापूर झोन.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# पी. व्ही. सिंधू, किरण जॉर्ज उपांत्यपूर्व फेरीत

## इंडिया ओपन सुपर ७५० बॅडमिंटन

◆ **नवी दिल्ली, १६ जानेवारी**

दोन वेळा ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूने गुरुवारी इंडिया ओपन सुपर ७५० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला तर किरण जॉर्जने पुरुष एकेरीत उत्कृष्ट कामगिरी करून आशा जिवंत ठेवल्या.

सिंधूने ४६ व्या क्रमांकावर असलेल्या जपानच्या मनामी सुईझूचा २१-१५, २१-१३ असा पराभव केला. माजी विश्वविजेत्या सिंधूचा सामना आता पॅरिस ऑलिम्पिक कांस्यपदक विजेत्या ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंगशी होईल.

पुरुष गटात किरण जॉर्जने शानदार पुनरागमन केले आणि प्री-क्वार्टर फायनलमध्ये ॲलेक्स लॅनियरचा २२-२०, २१-१३ असा पराभव करत सहा गेम पॉइंट्स वाचवले. पुढच्या फेरीत किरणचा सामना चिनी खेळाडू हाँग यांग वेंगशी होईल.

सामन्यात किरण १-६ ने पिछाडीवर होता. पण फ्रेंच खेळाडूने केलेल्या अनेक चुकांमुळे किरणला पुनरागमन करता आले.







ॲलेक्सच्या शानदार फटक्यानंतरही, किरणने आपला खेळ कायम ठेवला आणि ब्रेकपर्यंत तीन गुणांची आघाडी घेतली.

१४-२० ने पिछाडीवर राहिल्यानंतर किरणने सहा गेम पॉईंट वाचवले आणि नंतर सुरुवातीचा गेम जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये किरणने संघर्षानंतर १४-११ अशी आघाडी घेतली.

ॲलेक्सचे स्मॅश बाहेर गेले तर किरणने प्रत्येक संधीचा पुरेपूर फायदा घेतला. किरणने १९-१३ अशी आघाडी घेतली आणि प्रतिस्पर्ध्याच्या काही नेट चुकांमुळे त्याने सामना जिंकला.

सामन्यानंतर किरण म्हणाला, मी एका वेळी एका पॉइँटवर लक्ष केंद्रित करत होतो. मी फक्त संयम ठेवला. आता लक्ष पुढील सामन्यावर आहे.

महिला एकेरीत, सिंधूने चांगली सुरुवात केली आणि ब्रेकपर्यंत ती ११-६ अशी आघाडीवर होती. सुईझूने थोड्या वेळासाठी अंतर ११-१३ आणि १३-१४ असे कमी केले असले तरी, सिंधूने नेहमीच तिची आघाडी कायम ठेवली.

दुसऱ्या गेममध्ये सिंधूने ५-० अशी आघाडी घेतली आणि ब्रेकपर्यंत ती ११-२ अशी आघाडीवर होती. यानंतर, सिंधूच्या दबावाला सुईझूकडे कोणतेही उत्तर नव्हते. ◀(वृत्तसंस्था)

# सर्वोत्तम महिला खेळाडू पुरस्काराच्या शर्यतीत मनू भाकर, स्मृती मंधाना

◆ **नवी दिल्ली, १६ जानेवारी**

पॅरिस ऑलिम्पिक २०२४ ची दुहेरी पदक विजेती नेमबाज मनू भाकर आणि भारताची स्टार महिला फलंदाज स्मृती मंधना यांना गुरुवारी बीबीसीच्या २०२४ च्या महिला खेळाडू पुरस्कारासाठी नामांकन देण्यात आले.



पॅरिसमध्ये महिलांच्या १० मीटर एअर पिस्तूलमध्ये कांस्यपदक जिंकून मनू ऑलिम्पिक पदक जिंकणारी पहिली भारतीय महिला नेमबाज ठरली. त्यानंतर तिने सरबजोत सिंगसोबत मिश्र १० मीटर एअर पिस्तूल सांघिक स्पर्धेत कांस्यपदक जिंकले आणि स्वातंत्र्यानंतर एकाच ऑलिम्पिकमध्ये दोन पदके जिंकणारी ती पहिली भारतीय ठरली. २०२४ मध्ये स्मृतीच्या बॅटनेही खूप धावा केल्या आणि गेल्या वर्षी ती सर्व फॉरमॅटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या खेळाडूंमध्ये होती.

सलग दोन पॅरालिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकणारी पहिली भारतीय नेमबाज अवनी लेखरा, स्टार गोल्फपटू अदिती अशोक आणि स्टार कुस्तीपटू विनेश फोगट यांच्यासोबत मनू आणि स्मृती यांना या पुरस्कारांसाठी स्पर्धा होईल.

अवनीने २०२० च्या टोकियो पॅरालिम्पिक आणि २०२४ च्या पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये १० मीटर रायफल एसएच१ स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले आहे, तसेच टोकियो पॅरालिम्पिकमध्ये ५० मीटर रायफल ३ पोझिशन्स एसएच१ मध्ये कांस्यपदक जिंकले आहे.



विनेशने पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५० किलो वजन गटात अंतिम फेरी गाठली होती परंतु १०० ग्रॅम जास्त वजनामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले. पॅरिस पॅरालिम्पिकमध्ये २०० मीटर टी१२ स्पर्धेत कांस्यपदक विजेती सिमरन शर्मा म्हणाली की, अवनीच्या नामांकनामुळे पॅरा स्पोर्ट्सला चालना मिळेल. अर्जुन पुरस्कारासाठी निवड झालेली आणखी एक पॅरा ॲथलिट प्रीती पाल म्हणाली, सर्व खेळाडू या पुरस्कारास पात्र आहेत. हा पुरस्कार जो कोणी जिंकेल, तो महिला खेळाडूंना प्रोत्साहन देईल.

या पुरस्कारांसाठी नामांकित खेळाडूंसाठी मतदान ३१ जानेवारीपर्यंत बीबीसीच्या भारतीय भाषेतील वेबसाइट्स आणि बीबीसी न्यूज स्पोर्ट वेबसाइटद्वारे करता येईल. विजेत्या खेळाडूची घोषणा १७ फेब्रुवारी रोजी केली जाईल. ◀(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### कांस्य पदकाने आनंदी पण समाधानी नाही : सिमरन

**नवी दिल्ली** : पॅरालिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकल्याबद्दल आनंद व्यक्त करतानाच मी समाधानी नाही आणि सुवर्णपदक जिंकूनच समाधान मिळेल, असे पॅरिस पॅरालिम्पिक २०२४ मधील कांस्यपदक विजेती धावपटू सिमरन शर्माने गुरुवारी सांगितले.



पॅरिसमध्ये झालेल्या २०० मीटर टी १२ स्पर्धेत सिमरनने कांस्यपदक जिंकले, ही स्पर्धा दृष्टिहीन खेळाडूंसाठी आहे. अर्जुन पुरस्कारासाठी निवड झालेल्या सिमरनने कोणत्याही व्यक्तीच्या जीवनात पुरस्कार आणि प्रोत्साहनाचे महत्त्व यावर भर दिला. सिमरनने येथे एका कार्यक्रमादरम्यान सांगितले की, केवळ खेळाडूंनाच नव्हे तर कोणत्याही क्षेत्रातील कोणत्याही मुलाला प्रोत्साहन देणे खूप महत्त्वाचे आहे. जर तुमचे मूल काही चांगले करत असेल तर त्याला बक्षीस द्या, यामुळे त्याला भविष्यात चांगले काम करण्यास प्रेरणा मिळेल. म्हणून कोणालाही बक्षीस मिळणे महत्त्वाचे आहे. ती म्हणाली, जेव्हा मी कांस्यपदक जिंकले तेव्हा मला वाटले की मी आनंदी आहे पण समाधानी नाही. भारतासाठी पदक जिंकल्याबद्दल मला आनंद आहे पण जेव्हा तिरंगा मध्यभागी असेल आणि राष्ट्रगीत वाजेल तेव्हा समाधान मिळेल. आता खेळाडूंना खूप प्रोत्साहन मिळत आहे, ज्यामुळे त्यांचे मनोबल वाढत आहे, असे सिमरनने सांगितले. ■

### भाव्याचे विजेतेपद कायम, शार्दुल ठरला विजेता

**नवी दिल्ली** : स्थानिक स्पर्धक भाव्या त्रिपाठीने गुरुवारी येथे झालेल्या राष्ट्रीय नेमबाजी अजिंक्यपद स्पर्धेत तिचे महिला विजेतेपद कायम राखले तर उत्तर प्रदेशच्या शार्दुल विहानने पुरुषांच्या स्पर्धेत विजेतेपद पटकावले. भाव्याने उत्तर प्रदेशच्या साबिरा हॅरिसविरुद्ध १८-शॉट शूट-ऑफमध्ये ९-८ असा विजय मिळवला. ५०-शॉटच्या अंतिम फेरीत दोन्ही नेमबाजांनी ४१ हिट्ससह बरोबरी साधली. डॉ. सिंग शूटिंग रेंज येथे झालेल्या अंतिम सामन्यात शार्दुलने हरयाणाच्या लक्ष्य शेओरनचा ४५ गुणांसह पराभव करून त्याचे पहिले पुरुष ट्रॅप राष्ट्रीय विजेतेपद जिंकले. पात्रता फेरीत अव्वल स्थानावर असलेला शेओरन त्याच्यापेक्षा तीन गुणांनी मागे होता. ऑलिम्पियन पृथ्वीराज तोंडाईमनने ३४ गुणांसह कांस्यपदक जिंकले. शार्दुलने आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक विजेत्या दोन्ही खेळाडूंमध्ये आत्मविश्वासाने करत वैयक्तिक नेमबाजी आणि डबल-नेमबाजी राष्ट्रीय जेतेपदे जिंकली. त्याने गेल्या वर्षी ज्युनियर पुरुषांचे नेमबाजी जेतेपद आणि आठ वर्षांपूर्वी वयाच्या १४ व्या वर्षी पुरुष आणि ज्युनियर पुरुषांचे डबल नेमबाजी जेतेपद जिंकले होते. शार्दुलने एक सुवर्ण, एक रौप्य आणि दोन सांघिक कांस्यपदके जिंकली तर भाव्याने दोन सुवर्ण (ज्युनियर महिला संघासह) आणि एक सांघिक कांस्यपदक जिंकले.

### भारत ब्रिटनमध्ये चार दिवसांचे तीन सामने खेळणार

**नवी दिल्ली** : न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या दारुण पराभवामुळे निराश झालेल्या भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) इंग्लंडविरुद्धच्या कसोटी सामन्यांपूर्वी ब्रिटनमध्ये चार दिवसांचे तीन सामने आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे जेणेकरून खेळाडूंना लाल चेंडूची सवय होऊ शकेल. इंग्लंड लायन्स विरुद्धच्या सामन्यांच्या तारखा आणि ठिकाणे अद्याप निश्चित झालेली नाहीत परंतु २५ मे रोजी इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) च्या अंतिम सामन्यानंतर ते युकेमध्ये होतील. कसोटी दौऱ्याची सुरुवात २० जूनपासून लीड्समध्ये होणाऱ्या पहिल्या कसोटीने होईल. इंग्लंडविरुद्ध भारताच्या संधी लक्षात घेता ही सराव मालिका आवश्यक असल्याचे बोर्डाचे मत आहे. कारण संघाला घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध ०-३ ऑस्ट्रेलियाविरुद्ध १-३ असा पराभव पत्करावा लागला होता. बॉर्डर-गावस्कर चषकापूर्वी आमचा ऑस्ट्रेलियाचा असाच 'अ' दौरा होता, असे बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले. या सामन्यांमुळे खेळाडूंना इंग्लंडच्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास मदत होईल आणि काही काळानंतर त्यांना लाल चेंडू क्रिकेट खेळण्याची संधी देखील मिळेल.

### न्यायमूर्ती अरुण मिश्रा बीसीसीआयच्या लोकपालपदी

**नवी दिल्ली** : सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त न्या. अरुण मिश्रा यांची भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे (बीसीसीआय) लोकपाल म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. मिश्रा हे बीसीसीआयचे नीतिमत्ता अधिकारी म्हणूनही काम पाहतील. त्यांनी ७ जुलै २०१४ ते २ सप्टेंबर २०२० पर्यंत सर्वोच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून काम पाहिले. त्यानंतर २ जून २०२१ रोजी त्यांची राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली होती. ३ सप्टेंबर १९५५ रोजी ग्वाल्हेर येथे जन्मलेल्या मिश्रा यांनी मध्य प्रदेश, राजस्थान आणि कलकत्ता उच्च न्यायालयांचे न्यायाधीश म्हणून सुमारे ९७,००० खटल्यांमध्ये निकाल दिले. २५ ऑक्टोबर १९९९ रोजी त्यांची मध्यप्रदेश हायकोर्टाचे न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली आणि नंतर २६ नोव्हेंबर २०१० रोजी राजस्थान हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. १४ डिसेंबर २०१२ रोजी त्यांची कलकत्ता हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली. ■

# केवळ 'त्या' खेळांच्या स्पर्धांचा राष्ट्रीय खेळांमध्ये समावेश व्हावा

## आयओए अध्यक्ष पी. टी. उषा यांचा प्रस्ताव

◆ **नवी दिल्ली, १६ जानेवारी**

भविष्यातील राष्ट्रीय खेळांमध्ये ऑलिम्पिक, राष्ट्रकुल आणि आशियाई खेळांमध्ये समाविष्ट असलेल्या खेळांचाच समावेश करावा, असा प्रस्ताव भारतीय ऑलिम्पिक असोसिएशन (आयओए) च्या अध्यक्षा पी. टी. उषा यांनी गुरुवारी मांडला.

त्या म्हणाल्या की, आयओएच्या पुढील सर्वसाधारण सभेत हा प्रस्ताव पुढे नेण्याचा त्यांचा मानस आहे. त्यांनी त्यांच्या प्रस्तावात असेही म्हटले आहे की ज्या खेळांची प्रशासकीय संस्था राष्ट्रीय खेळ सुरू होण्याच्या एक वर्ष आधी राष्ट्रीय महासंघ म्हणून आयओएकडे 'चांगल्या स्थितीत' आहे, त्यांनाच या कार्यक्रमात समाविष्ट केले पाहिजे.

याचा अर्थ असा होऊ शकतो की ज्या राष्ट्रीय क्रीडा महासंघाचा (एनएसएफ)राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदक यादीत समावेश करायचा आहे त्याला आयओएद्वारे मान्यता दिली पाहिजे आणि त्याच्या निवडणुका देखील घेतल्या पाहिजेत. याशिवाय त्याच्या प्रकरणात कोणताही कायदेशीर वाद नसावा आणि संलग्नता शुल्क जमा करावे लागेल.

अलिकडील खेळांचे एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे स्थानिक प्रेक्षकांना आकर्षित करणे आणि प्रादेशिक क्रीडा संस्कृतीला प्रोत्साहन देणे या उद्देशाने स्थानिक प्रादेशिक खेळांचा प्रदर्शनीय खेळ म्हणून समावेश करणे, असे उषा यांनी एका अधिकृत प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

तथापि, मागील खेळांदरम्यान खेळ तांत्रिक सुकाणू समितीने पदक कार्यक्रमात अनेक प्रादेशिक खेळांचा समावेश केला होता, असे त्या म्हणाल्या. आयओए या खेळांचे महत्त्व ओळखते परंतु प्रदर्शनीय आणि पदक स्पर्धांमध्ये स्पष्ट फरक राखण्याची गरज यावर भर देते. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमधील पदक विजेत्यांना राज्य आणि केंद्र सरकारच्या नोकऱ्यांमध्ये मूळ वेतन आणि बक्षीस रकमेत वाढ यासारखे फायदे मिळण्यास पात्र आहेत, ज्यामुळे पदक स्पर्धा प्रमुख आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये मान्यताप्राप्त खेळांशी जुळतात, असेही निवेदनात म्हटले आहे. ◀(वृत्तसंस्था)

# भारतीय महिला शतकी गुणांच्या हॅट्ट्रिकसह गटात अव्वल

## मलेशियावर ८० गुणांचा शानदार विजय

### खो-खो विश्वचषक २०२५

◆ **नवी दिल्ली, १६ जानेवारी**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या खो-खो विश्वचषक २०२५ मध्ये भारतीय महिला संघांने शतकी गुणांच्या हॅट्ट्रिकसह अ गटात अव्वल स्थान मिळवताना प्रत्येक सामन्यात गुणांची लयलूट केली. आजच्या मलेशिया विरुद्ध झालेल्या सामन्यात भारताच्या संघाने पहिल्या डावात ६ तर दुसऱ्या डावात ४ ड्रीम रन मिळवत संघाला संरक्षणात सुद्धा मजबूत स्थिती मिळवून दिली.

बचावपटू भिलार ओपिनाबेन आणि मोनिकाने त्यांच्या अप्रतिम ड्रीम रनने सामन्याची सुरुवात केली. मध्यंतराला भारताने ४४-०६ अशी ३८ गुणांची आघाडी घेत आपण पुन्हा एकदा गुणांची लयलूट करू असा जणू इशाराच दिला. गेल्या दोन सामन्यात भारताने १७५ व १०० गुण मिळवत एक आगळा वेगळा विश्वविक्रम केला होता. आज सुद्धा भारताने गुणांची शंभरी गाठत विजयासह शतकी गुणांची हॅट्ट्रिक केली. भारताने हा सामना १००-२० असा ८० गुणांनी जिंकला. या सामन्यात भारतीय संघाने सामन्याची सुरुवात बचावातील मजबूत कामगिरीसह केली. बचावपटू भिलार ओपिनाबेन आणि मोनिकाच्या ड्रीम रनने सामन्याचा स्वरूप पालटवले. पहिल्या टर्नमध्ये ५ मिनिटे ५० सेकंद बचाव केल्यानंतर सामन्याचा पहिला डाव ६-६ अशा बरोबरीत संपला. त्यानंतर प्रियांका, नीतू आणि मीनू यांनी पहिल्या डावाच्या शेवटी शानदार कामगिरी करत संघाचा आत्मविश्वास वाढवला.




भारत आणि मलेशिया यांच्या सामन्यातील अटीतटीचा क्षण

दुसऱ्या टर्नमध्ये खेळाच्या फक्त २७ व्या सेकंदाला मलेशियाच्या पहिल्या गटातील खेळाडूंना बाद करण्यात आले. यामुळे भारतीय संघाला मोठा आघाडी घेण्यासाठी संधी मिळाली. मोनिका आणि वझीर निर्मला भाटी यांनी आक्रमणात संघाला प्रचंड बळ दिले.

तिसऱ्या टर्नमध्ये सुभाश्री सिंगने भारतासाठी आणखी एक ड्रीम रन मिळवला. चौथा डावही भारतीय संघासाठी आक्रमण करताना तितकाच प्रभावी ठरला. सामन्यात पूर्ण वर्चस्व भारतीय संघाने ८० गुणांच्या फरकाने मलेशियाला पराभूत केले.

**दक्षिण कोरिया, अमेरिका बरोबरी**

शेवटच्या साखळी सामन्यात पुरुष गटातील चुरशीच्या लढतीत दक्षिण कोरिया विरुद्ध अमेरिका हा सामना ६२-६२ असा बरोबरीत झाला. परंतु गटात बांगलादेश व श्रीलंकाने उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश मिळवला आहे. आणखी एका चुरशीच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने मलेशियावर ३५-३४ अशी एका गुणाने मात केली. परंतु ड गटातही इंग्लंड व केनियाने उपांत्यपूर्व फेरी गाठली आहे. ◀(तभा वृत्तसेवा)

# परवाज टॅलेंट सर्चमध्ये पानगल प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

सालाबाद प्रमाणे परवाज फाउंडेशनच्या वतीने घेण्यात येणारा आंतरशालेय टॅलेंट सर्च शैक्षणिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात सामान्य ज्ञान, निबंध, हस्ताक्षर, वक्तृत्व, इंग्रजी व्याकरण, बुद्धिमत्ता, वादविवाद इत्यादी स्पर्धा घेण्यात आले होते.

स्पर्धेत एम.ए.पानगल अँगल उर्दू हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. ज्युनियर व सीनियर गटात पानगल प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या कौशल्य दाखवत विजेते पद पटकविले. त्यात म. इब्राहिम हसेवाले ने फने मुसविरी स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक, अदिबा जमादार ने इंग्रजी निबंध स्पर्धेमध्ये दुसरे क्रमांक,म.तारीख शेखने वाद विवादस्पर्धेमध्ये दुसरे क्रमांक, सय्यद जियाउद्दीन काझीने वक्तृत्व स्पर्धेत तिसरे क्रमांक, तर हायका बागवान ने उर्दू निबंध स्पर्धेमध्ये तिसरे क्रमांक पटकाविले.विजयी विद्यार्थ्यांना प्रशालेचे शिक्षक हाजरा माशाळवाले, वसीम नल्लनमंदू, फरहत शेख, अ.रऊफ पटेल, उजमा ऊस्ताद, खलील पेरमपल्ली, इलियास सौदागर, अकबर पठाण, जाकीर शहापुरे, इस्तियाक तारानाईक, फरजाना नदाफ, उमेदजमा पठाण, शबाना शहाभाई, लबना शहापुरे,नाजमीन पटेल, शिरीन खान,शबनम शेख, समीना सय्यद व जवेरीया दिवाण आदींचे मार्गदर्शन लाभले. प्रशालेच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. हारून रशीद बागबान, उपमुख्याध्यापिका डॉ. सुरैया परविन जहागीरदार,निकहत नल्लामंदू म.अली शेख सर्व शिक्षक, कर्मचारी पालक आदीने विजयी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



# संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या प्रथमेशची विद्यापीठ क्रिकेट संघात निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

कोटा राजस्थान येथे झालेल्या आंतर विद्यापीठ स्पर्धेत संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या प्रथमेश वाघमारेने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून प्रतिनिधित्व केले.



महाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेतील कामगिरीवर त्याची निवड झाली. प्रथमेश हा तृतीय वर्ष बीकॉम मध्ये शिकत असून तो पुणे येथील इंटर क्लब स्पर्धेतून फलंदाजीचे प्रदर्शन करीत उत्तम कामगिरी केली आहे.

त्यास शारीरिक शिक्षण संचालक प्रा. शरण वांगी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ.आनंद चव्हाण, श्री विभुते सर, संतोष खेडे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे संस्थेचे सचिवा ज्योतीताई काडादी, अध्यक्ष धर्मराज काडादी, प्राचार्य डॉ. एस. डी. गोठे यांनी अभिनंदन केले.

# खो-खोतील 'पोल डाइव्ह किंग' म्हणून ओळख वाढवायचीय

## अनिकेत पोटेचे ध्येय

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**नवी दिल्ली, दि.१६ जानेवारी-**

मी लहानपणापासून 'पोल डाइव्ह' म्हणजे पोलवर गडी टिपण्याचे तंत्र विकसित करतो. काहीजण म्हणायचे, काय पोल डाइव्ह, पोल डाइव्ह करतो, परंतु 'पोल डाइव्ह' ही माझी ओळख आहे. आज मला खो-खो क्षेत्रात 'पोल डाइव्ह किंग' म्हणून ओळखतात. मला ती ओळख वाढवायची आहे आणि त्यात नाव कमवायचे आहे, हे मुंबई उपनगरच्या अनिकेत भगवान पोटे याचे ध्येय आहे.

नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या पहिल्या विश्वचषक खो-खो स्पर्धेत भारताकडून प्रतिनिधित्व करीत असलेल्या अनिकेतने पेरू विरुद्धच्या सामन्यात सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा मान मिळवला. यावेळी तो बोलत होता. खो-खोकडे कसे वळाला हे सांगताना अनिकेत म्हणतो, मी शाळेत क्रीडा महोत्सवामध्ये सर्व खेळांमध्ये अव्वल खेळाडू होतो. आमच्या शाळेतील जोशी सर यांनी मला खो-खो खेळण्यास सांगितले. सुरुवातीला खेळात जास्त रस नव्हता. परंतु तेव्हा मंगेश गराटे हे दोन-तीन वेळा मला घरी येऊन सरावासाठी घेऊन जायचे. त्यामुळे यात रमलो. कामगिरी कशी-कशी बहरत गेली यावर बोलताना अनिकेत म्हणाला, २००८ मध्ये मी पहिली १४ वर्षाखालील राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा खेळलो. त्यानंतर मी २० राष्ट्रीय स्पर्धेत प्रतिनिधित्व केले. २०१६ मध्ये झालेल्या पहिल्या साउथ एशियन चॅम्पियनशिपमध्ये 'स्टार ऑफ द टुर्नामेंट' हा पुरस्कार मिळाला. २०१८ मध्ये भारत-इंग्लंड टूर केली. २०२३मध्ये ४थी एशियन चॅम्पियनशिप खेळलो. २०१५-१६ मध्ये महाराष्ट्र शासनाचा जिल्हा क्रीडा पुस्कार व २०१७-१८मध्ये शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराचा मानकरी ठरलो. राष्ट्रीय स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट आक्रमकाचा ३ व २ वेळा सरंक्षकाचा पुरस्कार मिळाला. २०२२च्या अल्टिमेट खो-खो लीगमध्ये तिसरा क्रमांक मिळाला. या कामगिरीवर मला महाराष्ट्र शासनाने वर्ग २ ची स्पोर्ट्स एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून थेट नियुक्ती दिली आहे.



डॉ. नरेंद्र कुंदर हे त्याचे मार्गदर्शक आहेत. त्याचबरोबर शेखर पाटील, आकाश पाटील, सुहास जोशी, मंगेश गराटे, विशाल चव्हाण, अनिल पिसाळ, सचिन साळुंके, चेतन गवस, दिपेश मोरे, प्रशांत पवार ह्या मला घडवण्याचा सहभाग आहे.

### टीव्हीमध्ये पाहण्याचे वडिलांचे स्वप्न पूर्ण

अल्टिमेट लीगचा पहिला सामना पहायला माझा परिवार आलेला होता. त्याच पहिल्या सामन्यामध्ये मला 'अल्टिमेट खो-खो ऑफ द मॅच' आणि 'मॅन ऑफ द मॅच' असे दोन पुरस्कार मिळाले. अल्टिमेट लीगनंतर आता सुरु असलेल्या वर्ल्ड कपमध्येही सर्वोत्कृष्ट खेळाडूचा पुरस्कार मिळाला. हे दोन्ही क्षण माझ्यासाठी अविस्मरणीय व आनंदाचे. कारण नॅशनल टेलीव्हीजनवर खो-खोचे सामने होण्याची पहिलीच वेळ होती आणि हेच माझ्या वडिलांचं स्वप्न होते की त्यांना मला नॅशनल टेलीव्हीजनवर खेळताना लाईव्ह पहायचं होतं. माझे वडील कॅन्सरग्रस्त होते. त्यातून ते दगावले. ते जरी आता माझ्या सोबत नसले तरी ते मला खेळताना पाहून खूश होत असतील आणि त्यांचा आशीर्वाद माझ्यासोबत कायम आहे. त्यामुळे टीव्ही मध्ये पाहण्याचे माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण झाल्याचा मला आनंद आहे.

### आतापर्यंतची कामगिरी

- राज्य :१६ (९ सुवर्ण,१ रौप्य, ६ कांस्य)
- राष्ट्रीय १६ (८ सुवर्ण,६ रौप्य)
- अखिल भारतीय विद्यापीठ : ४ (२ सुवर्ण,१ रौप्य,१ कांस्य).

# भारताची पुरुषांमध्ये श्रीलंकेशी तर महिलांमध्ये बांगलादेशाशी उपांत्यपूर्व लढत

- भारतीय पुरुष संघ सलग चार विजयांसह गटात अव्वल
- भारतीय पुरुषांचा भूतानवर दणदणीत विजय
- सुयश गरगटे मानकरी

**नवी दिल्ली, १६ जानेवारी -**

इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियममध्ये सुरू असलेल्या खो-खो विश्वचषक २०२५ मध्ये भारताच्या पुरुष संघाने सुध्दा महिलांपाठोपाठ दणदणीत विजय साजरा केला. या सामन्यात भारताने भूतानवर ७१-३४ (मध्यंतर ३२-१८) असा ३७ गुणांनी धमाकेदार विजयाची नोंद केली व उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळवले आहे. सुयश गरगटेला या सामन्यात सामन्याचा मानकरी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले.

**पहिल्या डावात दमदार सुरुवात**

सामन्याच्या पहिल्या टर्नमध्ये भारतीय संघाने आक्रमक सुरुवात करत ३२ गुणांची आघाडी घेतली. भारतीय खेळाडूंनी दाखवलेल्या स्काय डायव्हिंग कौशल्याने संपूर्ण प्रेक्षकांची मने जिंकली. चपळाई आणि संघटन कौशल्याचा उत्तम नमुना पाहायला मिळाला.

**दुसऱ्या डावात बचावात अफलातून कामगिरी**

दुसऱ्या डावात भारताने आपले अफलातून संरक्षण कौशल्य दाखवत भूतानच्या आक्रमणाला दाद दिली नाही. भूतानने वेगवान खेळ करण्याचा प्रयत्न केला, मात्र भारतीय संघाच्या रणनीतीमुळे त्यांना फक्त १८ गुण मिळवता आले.



**तिसऱ्या डावात पुनश्च आक्रमणाची जादू**

तिसऱ्या टर्नमध्ये भारताने आक्रमणात पुन्हा जोरदार प्रदर्शन केले. निखिलने अप्रतिम स्काय डायव्हिंग कौशल्य दाखवून संघासाठी ३६ गुण मिळवले. भारतीय संघाने उत्कृष्ट समन्वय साधत २८ गुणांची लयलूट केली.

**भूतानची निराशाजनक कामगिरी**

अंतिम टर्नमध्ये भूतानला त्यांच्या वेळेच्या निम्म्या कालावधीत फक्त ९ गुण मिळवता आले. भारतीय बचावाने त्यांना पुन्हा संधी दिली नाही, आणि सामना ३७ गुणांच्या फरकाने जिंकत भारताने विजयश्री खेचून आणली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दै. 'तरुण भारत'चे नंदकिशोर वलटे यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार प्रदान

**करमाळा, दि. १६ जानेवारी-**

जेऊर (ता. करमाळा) येथील प्रवाशी संघटनेच्या वतीने दै. तरुण भारतचे करमाळ्याचे प्रतिनिधी नंदकिशोर वलटे यांना पुरस्कार देण्यात आला. तालुक्यातील पत्रकारांचा मेडल व ट्रॉपी देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जेष्ठ समाजसेवक डॉ. सुभाष सुराणा, माजी सभापती अतुल पाटील, यशकल्याणी संस्थेचे अध्यक्ष गणेश करे-पाटील, उपसरपंच नागेश झांजुर्णे, ग्रामपंचायत सदस्य संदिप कोठारी, सोलापूर प्रवासी संघटनेचे अध्यक्ष संजय पाटील, अप्पासाहेब लबडे, दादासाहेब लबडे, जेष्ठ व्यापारी राजकुमार राठोड आदी उपस्थित होते. हा सन्मान सोहळा जेऊर येथील दहिगावं रोडवर असलेल्या इरा पब्लिक स्कूलमध्ये संपन्न झाला. नासीर कबीर, अशपाक सय्यद, शितलकुमार मोटे, विशाल घोलप, अशोक मुरूमकर, विशाल परदेशी, गजेंद्र पोळ, सुनिल भोसले, सचिन बिचितकर, जयंत दळवी, सिध्दार्थ वाघमारे, सुयोग झोळ, हर्षवर्धन गाडे, धर्मराज दळवे, प्रफुल्ल दामोदरे, दै. तरुण भारतचे करमाळा प्रतिनिधी नंदकिशोर वलटे आदी पत्रकारांचा सन्मान करण्यात आला. यावेळी प्रवासी संघटनेचे अध्यक्ष सुहास सूर्यवंशी, इरा पब्लिक स्कूलचे अध्यक्ष सुनिल अवसरे, माजी ग्रामपंचायत सदस्य मुबारक शेख, भूषण लुंकड, सुनील माने, बाबुराव अवसरे, महेश रणदिवे, प्रमोद जानकर, पोपट माने, सलीम पठाण, अल्लाउद्दीन मुलाणी, तात्यासाहेब कळसाईत, गणेश अमृळे, हनुमंत कांडेकर, श्रीकृष्ण कांबळे, संजय क्षीरसागर, सोमनाथ काशिद, मनोज गोरे, कुलदीप जाधव, विशाल काळे, महादेव गुंड, उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन जेऊर संघटनेचे अध्यक्ष सुहास सूर्यवंशी यांनी मानले.



### शिवसेना कामगार आघाडीतर्फे पत्रकार जगताप, समर्थ बिराजदार यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी -**

येथील पत्रकार राजेश जगताप यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा शिवसेना शहर महिला आघाडी व अक्कलकोट तालुका कामगार सेना यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. माहिती अधिकार शहराध्यक्ष समर्थ बिराजदार यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास शिवसेना शहर महिला आघाडी शहर अध्यक्ष वैशाली हावनूर, कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे कामगार सेना शहर उपाध्यक्ष आकाश बबलाद शहर महिला आघाडी शहर उपप्रमुख वर्षा मेत्रे, सुरेश पवार उपस्थित होते.



### छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा उत्साहात

**टेंभुर्णी, दि.१६ जानेवारी-**

हिंदवी स्वराज्याचे द्वितीय छत्रपती शिवपुत्र संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. सांगोलाचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख व संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रविण गायकवाड यांच्या हस्ते राज्याभिषेक करण्यात आला. या सोहळ्यासाठी पुरंदर हवेलीचे आमदार विजय शिवतारे, माढाचे आमदार अभिजीत पाटील व वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिवपुत्र शंभुराजे राज्याभिषेक ट्रस्ट पुणे यांच्या वतीने हा सोहळा आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी दत्तात्रय भोसले यांना कृषी, शिरीष देशमुख यांना उद्योजकता, सोशल हंड्रेड फाउंडेशन यांना सामाजिक व शिवछत्रपती कला क्रीडा मंडळ काडलास (ता. सांगोला) यांना क्रीडा क्षेत्रातील शंभुगौरव पुरस्काराने, तर ॲड. सचिन वाघ व ढवळस (ता. माढा) येथील आदर्श मुख्याध्यापक शिवाजी काळे यांना शंभुगौरव विशेष सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वीरा मल्टिस्पोर्ट्स अकॅडमी यांच्या वतीने मर्दानी खेळ व साहसी प्रात्यक्षिके यांचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी शेकडो शिवशंभुप्रेमींनी पुरंदर किल्ल्यावर उपस्थिती लावली.



### ग्रीन फिंगर्स महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाला सुरुवात

**अकलूज, दि. १६ जानेवारी-**

ग्रीन फिंगर्स कॉलेज ऑफ कॉम्प्युटर अँड टेक्नॉलॉजी अकलूजमध्ये प्राचार्य डॉ. सुभाष शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रम ग्रंथालय विभाग समितीमार्फत राबविण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ करणे ,विविध साहित्य प्रकाराची ओळख करून देणे व महाविद्यालयांमध्ये वाचण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे हा प्रमुख उद्देश ठेवून महाविद्यालयामध्ये या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमामध्ये बीसीए व बीएससी कॉम्प्युटर सायन्स मधील विद्यार्थ्यांनी उत्साह पूर्ण सहभाग नोंदवून महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये व परिसरात वाचन केले. या उपक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर सुभाष शिंदे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वाचनाचे अनेक फायदे समजून सांगितले .विद्यार्थ्यांबरोबरच इतर व्यक्तींना देखील वाचनाची गोडी असावी, यामुळे भाषा कौशल्य आणि शब्दसंग्रह वाढतो कल्पनाशक्ती एकाग्रता तर्कशक्ती विकसित होते व अनेक प्रकारचे साहित्य आपल्याला माहिती होते. या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापकांनी देखील सहभाग नोंदवला.

# पंढरपुरात बिजाहोम कार्यक्रम भक्तिभावात; शोभायात्रेने वेधले लक्ष

## ९० दशनाम गोसावी समाज बांधवांवर धर्मसंस्कार



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जानेवारी-**

पंढरपूर येथे दशनाम गोसावी समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर पालक परिचय मेळावा व बिजाहोम कार्यक्रम संपन्न झाला. शनिवारी ११ जानेवारी रोजी शहरातील टिळक स्मारक मैदान येथून शोभायात्रेला सुरुवात झाली. डोक्यावर कलश घेतलेल्या महिला भगिनी हातामध्ये ध्वज पताका घेतलेले पुरुष बांधव जोगदंड मठातील वारकरी वेशातील टाळकरी झेंडेकरी सर्वात पाठीमागे रथामध्ये बसलेले चिंचपूरढगे येथील गोसावी समाजाचे गुरुवर्य तपोनिधी महंत नरेंद्र गिरीजी स्वामी, शांतिगिरी महाराज, महंत समाधान गिरी महाराज होते.

ही शोभायात्रा पंढरपुरातील मुख्य शिवाजी चौकातून, प्रदक्षणा मार्ग पूर्ण करून सायंकाळी आठ वाजता केबीपी चौकातील गणेश नाथ मंगल कार्यालय येथे सांगता झाली. त्यानंतर गणेशनाथ मंगल कार्यालयात नऊ वाजता बिजाहोम गोसावी धर्मसंस्कार शिबिरास मंत्रघोषाने सुरुवात झाली. दुसऱ्या दिवशी पहाटे पाच वाजता आरतीने या बिजाहोम ाचीससांगता झाली. यामध्ये जवळपास ९० समाज बांधवांनी धर्मसंस्कार करून घेतले. स्वागत अध्यक्ष हभप शंकर महाराज गोसावी, कार्याध्यक्ष संतोष गिरी, खजिनदार लक्ष्मण पुरी, सहखजिनदार अर्जुन पुरी यांनी केले. वधू-वर पालक परिचय मेळाव्याचे अखिल भारतीय गोसावी महासभा दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष महंत श्री सच्चिदानंद गिरी स्वामी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. गणेशनाथ संस्थांचे अध्यक्ष अरविंदनाथ गोस्वामी राष्ट्रीय, उपाध्यक्ष डी. के. गोसावी, राज्याध्यक्ष पंडित गोसावी, कार्याध्यक्ष धन्यकुमार पुरी, संजय गोसावी उपस्थित होते. श्री शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार मिळवणारी अंकिता गोसावी, पीएसआय राजेश प्रभाकर गोसावी, एमपीएससीमधून जलसंधारण अधिकारीपदी निवड झालेले सौरभ गोसावी, वेंकटेश गिरी गोसावी, त्याचबरोबर मंत्रालय कक्षअधिकारीपदी निवड झालेली सुजाता बिबीशन भारती, जलसंधारण विभागात उपकार्यकारी अधिकारीपदी निवड झालेले विनाल राजेंद्र गोसावी, सरळ सेवेमधून न्यायालय परीक्षा उत्तीर्ण झालेली सायली गोसावी, राष्ट्रीय बेस्ट टीचर अवॉर्ड मिळवणाऱ्या स्नेहलता गिरी यांनाही सन्मानित करण्यात आले. लातूरचे फॉरेस्ट ऑफिसर शिवाजी गिरी यांनी मनोगत व्यक्त केले. यासाठी रामेश्वर भारती, सचिन गिरी, गजानन गोसावी, सुधाकर गोसावी, महेश गोसावी, विजय भास्कर पुरी, अनिल बनगोसावी, संजय गोसावी अमित गोसावी उद्धव बंन गोसावी नवनाथ गोसावी वाखरी सेवागिरी गोसावी, संभाजी गिरी, संजय पुरी, शांताराम पुरी, विनायक बन, रतन गिरगोसावी, राजकुमार गोसावी, निनाद गिरगोसावी, सतीश बलभीम गोसावी, हेमंत गोसावी, प्रसाद पुरी, दीपक गोसावी, आशुतोष गोसावी, विक्रम बन, अंकुश गोसावी, नवनाथ गिरी, नाना गोसावी, नंदकुमार गोसावी, भीमराव गोसावी, भगवान गोसावी, वस्ताद सुनील गोसावी, राजू गोसावी, कैलास गोसावी, शिल्पा गोसावी, रजनी गोसावी, सुनीता गोसावी, नेहा गोसावी, मंगलपुरी, सुरेखा गोसावी, कविता गोसावी, ललिता बन, राजश्री बुवा, माया गोसावी, पूनम भारती, स्नेहल गोसावी, शैला गिरी, नंदा बन ,शकुंतला पुरी, रंजना पुरी, माया बन, वनिता गिरी, आरती गिरी, शिवानी गोसावी, श्रद्धा गोसावी, मनीषा पुरी, पद्मिनी बन, लक्ष्मी बन, वनमाला बन, शुभांगी गिरी, अंजना भारती, अनुपमा गोसावी, चंद्रकला गोसावी, रेणुका गोसावी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सतीश बुवा आणि रमेश गिरी यांनी केले. अविनाश गोसावी यांनी आभार मानले.

### २८८ मुले, ९२ मुलींचा सहभाग

वीर माता वृंदाताई गोसावी, स्नेहलता गोसावी, सायली गोसावी यांनी मनोगत व्यक्त केली. वधू-वर पालक परिचय मेळाव्यात २४८ मुलांनी आणि ९२ मुलींनी स्टेजवरती येऊन आपला परिचय करून दिला.

### दहा गुंठे जागा देण्याचे जाहीर

वीर पिता मुन्नागिरी गोसावी यांनी गोसावी समाजासाठी बहुउद्देश सभागृह, कार्यालय किंवा सांस्कृतिक हॉल, समाजाच्या विविध कार्यासाठी स्वतः ची दहा गुंठे जागा देण्याचे जाहीर केले. रुद्रांश वधू-वर स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

# श्री मार्तुलिंग गणपती यात्रा उत्साहात साजरी

## लाखोंच्या संख्येने भाविकांनी लावली यात्रेला हजेरी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ जानेवारी-**

सिध्दापूर येथील श्री मार्तृलिंग गणपती तथा बाळगणपती एक दिवशीय यात्रेला एक लाख भाविकांनी हजेरी लावली. सकाळी ७ वा. श्रींच्या मूर्तीची पूजा श्री दामाजी संस्थेचे अध्यक्ष विष्णूपंत आवताडे, युवक नेते प्रणव परिचारक, पोलिस निरिक्षक महेश ढवाण, श्रध्दा महेश ढवाण यांच्या उपस्थितीत पार पडली.



महाराष्ट्र, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असल्याने यात्रेसाठी भाविकांनी प्रचंड गर्दी केली होती. यात्रेसाठी एक पोलिस निरीक्षक, चार पोलिस उपनिरिक्षक व ४० पोलिस अंमलदार नेमण्यात आले होते. मकर संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी यात्रेला प्रारंभ होतो. यात्रेदरम्यान, मेवा मिठाई, नारळ, पुष्पहार, रसपानगृहे, बोरे व्यवसायिकांनी आपली दुकाने थाटली होती. बाळगणपती अपत्यहिन जोडप्यांना नवसाला पावत असल्यामुळे दर्शनासाठी या जोडप्यांनी गर्दी केली होती. यावेळी श्री मार्तृलिंग ट्रस्टचे अध्यक्ष भीमगोंडा पाटील, उपाध्यक्ष कलाप्पा पाटील, बापुराया चौगुले, सावकार, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक गंगाधर काकणगी, सरपंच महादेव कोळी, उपसरपंच सचिन चौगुले, लक्ष्मी सुवर्णरत्न परिवाराचे संस्थापक महादेव बिराजदार, आप्पासाहेब चौगुले, संत दामाजी कारखान्याचे माजी संचालक जालिंदर व्हनुटगी, तंटामुक्ती अध्यक्ष संतोष मनगोंड,दिगंबर यादव, सुरेश पवार, गजानन चौगुले, राजकुमार तळ्ळे, सुधाकर पाटील, विजयकुमार पाटील, सागर खबाले, प्रकाश तळ्ळे,मल्लिकार्जून चौगुले, महादेव कोळी, मदाणी हुगार, घाळय्या स्वामी, पोलिस हवालदार हरिदास चौधरी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी उद्योजक व्हावे : सिद्धाराम मसुती

## कल्याणशेट्टी महाविद्यालयात राष्ट्रीय स्टार्टअप दिनानिमित्त उद्योजकता कार्यशाळा




**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी-**

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थी ज्ञानसंपन्न होतो, नोकरी रोजगाराची संधी प्राप्त होत नाही म्हणून निराश होतो अशा स्थितीत जीवन सुखकारक होण्यासाठी विद्यार्थ्यांनी उद्योजक व्हावे असे प्रतिपादन प्रसिद्ध उद्योजक सिद्धाराम मसुती यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल व रासे यो विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या उद्योजकता कार्यशाळेचा शुभारंभ करताना ते बोलत होते अध्यक्षस्थानी मलकप्पा भरमशेट्टी होते. व्यासपीठावर डॉ बाळासाहेब पाटील, प्रा राजशेखर पवार, प्राध्यापिका हर्षदा गायकवाड उपस्थित होते. पुढे ते म्हणाले की, रोजगाराच्या संधी पेक्षा उद्योजक म्हणून समाजात नावलौकिक प्राप्त होतो. उद्योगासाठी बँकेकडून मुबलक कर्ज मिळते, अत्यंत कष्ट व मेहनत घेऊन उद्योग व्यवसाय केल्यास व्याजासहित कर्ज फेडणे शक्य होते. आपला चरितार्थ देखील चांगल्या पद्धतीने चालतो.

मलकप्पा भरमशेट्टी म्हणाले की सध्या लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगाराची संधी उपलब्ध होत नाही. उद्योजकता हा त्यावर एकमेव उपाय आहे. विद्यार्थ्यांनी लघु उद्योगातून पदार्पण करून त्याचे मोठ्या उद्योगात रूपांतर करावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा राजशेखर पवार यांनी केले सूत्रसंचलन प्रा. हर्षदा गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. गणाचारी यांनी मानले कार्यशाळेस प्रा मनीषा शिंदे, प्रा विद्या बिराजदार, प्रा. विद्याश्री वाले यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

# मंगळवेढा आगारात इंधन बचत मासिक कार्यक्रमाचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ जानेवारी-**




इंधन बचतीचे महत्व व त्यासंबंधी व्यापक जन-जागृती करण्यासाठी इंधन बचत मासिक कार्यक्रम घेण्यात येत आहे. सर्व इंधन वापरकर्त्यांमध्ये पेट्रोलिअम उत्पादनासंबंधी व्यापक जनजागृती करणे, इंधनावरील अनावश्यक खर्च टाळणे, परदेशी चलनाचा विनियोग कमी करणे व वातावरणाचे संरक्षण करणे हे इंधन बचत कार्यक्रम साजरा करण्याचे मुख्य उद्दीष्ट आहे. सदरचा इंधन बचत मासिक कार्यक्रम सन २०२५ राबविण्याकरिता मंगळवेढा आगारात सदर मोहिमेचे उद्घाटन विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांच्या हस्ते करण्यात आले.

अध्यक्षस्थानी आगार व्यवस्थापक संजय भोसले होते. यावेळी विभागीय अभियंता तुषार चौधरी, भांडारपाल ज्योती बंडगर हे देखील उपस्थित होते. यावेळी सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक विठ्ठल भोसले यांनी इंधन बचत अभियान कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर विभाग नियंत्रक गोंजारी यांनी आगारातील चालक, वाहक व यांत्रिक कर्मचाऱ्यांना इंधन बचतीच्या अनुषंगाने मौलिक मार्गदर्शन केले. चालक, वाहक तसेच यांत्रिक कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाज करीत असताना इंधन बचतीसाठी प्रयत्न करुन इंधनाची बचत करणे गरजेचे असल्याचे सांगितले. सध्या चालू असलेल्या राष्ट्रीय रस्ते सुरक्षितता मोहिमेच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर असताना सुरक्षितपणे वाहने चालवावीत असे मार्गदर्शन केले. चालकांनी व्यसनापासून दूर राहून आपले कर्तव्य पार पाडावे अशा सूचना केल्या. तसेच उत्पन्नावर आधारित प्रोत्साहन भत्ता मिळविण्याकरता उत्पन्नात वाढ करून सर्व चालक वाहकांनी प्रयत्न करावेत अशा सूचना केल्या. आगाराच्या खर्चात काटकसर करुन आगार नफ्यात आणण्याकरिता सामुहिक योगदान देण्यात यावे असे आवाहन केले. केपीटीएल वाढीसाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करून केपीटीएल मध्ये वाढ करावी असे आवाहन केले. यावेळी सहाय्यक वाहतूक अधीक्षक शरद वाघमारे, वाहतूक निरीक्षक योगेश गवळी, आगार लेखाकार योगेश कांबळे तसेच चालक, वाहक, यांत्रिक तसेच प्रशासकिय कर्मचारी बहुसंख्येने उपस्थित होते.



# मुंबईकरांचे अन्नछत्र भक्तीस्थळ : आ. आहिर

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासात शाश्वत विधीसोबत तंत्रज्ञानाचे मिश्रण पाहायला मिळते, आम्हा मुंबईकरांचे अन्नछत्र हे भक्तीस्थळ असल्याचे मनोगत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे नेते आ. सचिनभाऊ अहिर यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांनी त्यांचा सत्कार केला, या वेळी ते बोलत होते. यावेळी उद्योगपती करण आसरानी सेनेचे जिल्हाप्रमुख अमर पाटील, शरद कोळी, संतोष पाटील, सुनिल कटारे, प्रकाश पारवे, आनंद बुक्कानुरे, लिंगराज व्हनमाने, धर्मराज बगले, पुरोहित अप्पू पुजारी, प्रवीण घाडगे, गोटू माने, संजय गोंडाळ, निखील पाटील, भरत राजेगावकर, राहूल इंडे, सतीश महिंद्रकर उपस्थित होते.

# कासेगावातील स्टेडियम जागेच्या व्यवहाराला अखेर परवानगी

## प्रांताधिकारी सचिन इथापे यांची माहिती; राजकीय दबावापोटी क्रीडांगणाचे आरक्षण उठवल्याची चर्चा जोरात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १६ जानेवारी-**

पंढरपूर विकासप्राधिकरण हद्दीतील कासेगाव (ता.पंढरपूर) येथील गट नंबर १४ मध्ये स्टेडियम साठी आरक्षित असलेली शेतजमीन विक्री करण्यास नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभागाच्या आदेशाच्या अनुषंगाने परवानगी देण्यात आल्याची माहिती येथील प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी दिली. तर दुसरीकडे राजकीय दबावापोटी क्रीडांगणाचे आरक्षण उठविल्याची चर्चा होत आहे.


पंढरपूर प्राधिकरणाने शहराच्या आसपास असणाऱ्या १० किमी अंतरावरील ४१ गावांमध्ये अनेक प्रकारचे आरक्षणे टाकलेली आहेत. त्याप्रमाणे पंढरपूर विकास प्राधिकरण अधिसूचित क्षेत्राची विकास योजना १ जुलै २०२२ रोजी भागशः मंजूर झालेली असून, वगळलेल्या भागांची विकास योजना मंजुरीसाठी शासन स्तरावर आहे. कासेगावातील गट नं.१४ मध्ये या क्षेत्रात वगळलेल्या भागाचे विकास योजनेमधील स्टेडियम हे आरक्षण प्रस्तावित आहे. ती जमीन भाजपचे नेते भास्कर लक्ष्मण कसगावडे (रा. बोहाळी, ता. पंढरपूर) यांना विक्री करायची आहे. त्याकरिता सक्षम प्राधिकारी यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक असल्याने परवानगीबाबत या कार्यालयास अर्ज केलेला आहे.

### २६ डिसेंबर रोजी पहिले फेरफार करण्यात आले रद्द

पंढरपूर तालुक्यातील कासेगाव येथील जागेवर क्रीडा संकुलचे आरक्षण असताना ही या जागेची खरेदी-विक्री भास्कर लक्ष्मण कसगावडे, (रा. बोहाळी, ता.पंढरपूर), बिंदू मुकुंद गावंडे (रा.पिकोने, आवरे, जि. रायगड), दत्तात्रेय दादा खिलारे (रा.कासेगाव, ता.पंढरपूर), मंजुळा राजू पवार (रा. कडबे गल्ली, पंढरपूर) व कर्मयोगी एस. आर. परिचारक मल्टिस्टेट को- ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, पंढरपूर यांनी केली होती.

### रिपाइं नेत्यांनी केली होती तक्रार

या केलेल्या खरेदी खताबाबतची धरण्यात आलेली फेरफार नोंदीबाबत रिपाइंचे नेते दीपक चंदनशिवे (रा. तिसंगी, ता. पंढरपूर) यांनी तक्रार केली होती. यानंतर कासेगाव येथील गट नंबर १४/१/अ/२/अ या जमिनीपैकी ०० हे १० आर क्षेत्राबाबतची नोंदणीकृत खरेदीखताबाबतची धरणेत आलेली फेरफार क्र. ३१०२६ ही नोंद रद्द करण्याचा आदेश २६ डिसेंबर २०२४ रोजी कासेगाव मंडलाधिकारी पंकज राठोड यांनी काढला आहे.



पंढरपूर विकास प्राधिकारण हद्दीतील आरक्षणाने बाधित मिळकतींचे स्थूल जमिनीचे खरेदी-विक्री व्यवहार करता येतील.

तथापि, या क्षेत्रात कोणताही विकास करता येणार नाही, असा आदेश नगररचना विभागाचे सहायक संचालक कल्याण जाधव यांनी दिला आहे. त्याच आदेशाच्या अनुषंगाने प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी ही त्या जमिनीच्या खरेदी-विक्रीला परवानगी दिली आहे. दुसरीकडे मात्र भास्कर कसगावडे हे भाजपाचे तालुक्यातील पदाधिकारी आहेत त्यांनी आपले राजकीय कसब वापरून हे आरक्षण रद्द केल्याची चर्चा पंढरपूर शहर व तालुक्यातील सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### कुरुल येथे राजमाता जिजाऊ साहेबांच्या चरणी खा. प्रणिती शिंदे नतमस्तक

**सोलापूर, दि. १६ जानेवारी -**

मोहोळ तालुक्यातील कुरूल येथील मावळा प्रतिष्ठान च्या वतीने आयोजित राजमाता जिजाऊ जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमास खासदार प्रणिती शिंदे उपस्थित राहुन राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून नतमस्तक झाल्या. यावेळी खा. शिंदे म्हणाल्या, शिवरायांनी १८ पगड जातींना एकत्र घेऊन हिंदवी स्वराज्य निर्माण केले. आदर्श माता, कुशल राज्यकर्त्या स्वराज्य जननी जिजाऊ माँसाहेब यांना जयंतीनिमित्त अभिवादन, त्यांचाच आदर्श घेऊन आज महिला प्रत्येक क्षेत्रात पुढे जात आहेत. अश्याच कर्तृत्ववान भगिनींचा सत्कार करण्यात आला. सर्वांचे स्वागत रामभाऊ लांडे यांनी केले. तसेच यावेळी खासदार प्रणिती शिंदे यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थिनींचा व सोलापूर जिल्हा प्रशासन अधिकारी पदावर नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास तालुका अध्यक्ष सुलेमान तांबोळी, जिल्हा उपाध्यक्ष राजेश पवार, रामभाऊ लांडे-पाटील, डॉ. स्मिता पाटील, शिवाजी जाधव, दीपक जाधव, दीपक पाटील, बाळासाहेब लांडे, तात्यासाहेब बाबर, मेजर निकम उपस्थित होते.

### संत तुकाराम नगरातून १५ लाखांची स्कॉर्पिओ चोरीस

**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

शहरातील विजापूर रोडवरील संत तुकाराम नगरातून चोरट्याने १५ लाख रुपये किंमतीची स्कॉर्पिओ चारचाकी गाडी चोरून नेली. याबाबत आण्णाराव श्रीमंत म्हेत्रे (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जानेवारी रोजी रात्री आण्णाराव म्हेत्रे यांनी त्यांची एमएच १३ डीवाय ५७१९ क्रमांकाची स्कॉर्पिओ चारचाकी गाडी घरासमोर मोकळ्या जागेत पार्क केली होती. त्यावेळी पहाटेच्या सुमारास कोणीतरी चोरट्याने म्हेत्रे यांची १५ लाख रुपये किंमतीची चारचाकी गाडी चोरून नेली. याबाबत विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक गायकवाड पुढील तपास करीत आहेत.

### दोन नंबर झोपडपट्टीत ३८ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

शहरातील दोन नंबर झोपडपट्टीमधील बॉम्बे टेलरजवळील बंद घर फोडून चोरट्याने ३६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत सुनंदा हणमंतु पुजारी (वय ५०) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जानेवारी रोजी रात्री सुनंदा पुजारी व त्याच्या भाडेकरूच्या घराचे कुलूप चोरट्याने तोडून सोन्याचे गंठण, सोन्याची बोरमाळ, रोख रक्कम, होम थिएटर असा ३६ हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कुंभार पुढील तपास करीत आहेत.

### हरिभाई देवकरण प्रशालेजवळून २० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

शहरातील हरिभाई देवकरण प्रशालेजवळवून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली. याबाबत नागेश दत्तात्रय माने (वय २७, रा. इंजिनियरींग कॉलेजजवळ, आबाई निवास, राजश्री शाहू नगर, नळदुर्ग रोड, तुळजापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जानेवारी रोजी रात्री नागेश माने याने त्यांची एमएच २५ डब्ल्यू ९२४१ क्रमांकाची दुचाकी ही हरिभाई देवकरण प्रशालेच्या पाठीमागील बाजूच्या रोडलगत हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार सरतापे पुढील तपास करीत आहेत.

### विषारी कलर पिऊन तरूणाचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

एमआयडीसीमधील बोळकोटे नगरात राहणाऱ्या तरूणाने विषारी पिवळा कलर पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. नागराज गुडपाटी (वय ३९) असे आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्याचे नाव आहे. १६ जानेवारी रोजी सकाळी ११ च्या सुमारास राहत्या घरी अज्ञात कारणावरून नागराज यांनी सडा मारण्याचा विषारी पिवळा कलर प्राशन केला. त्यामुळे त्यांना त्रास होऊ लागल्याने आई लक्ष्मी गुडपाटील यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मल्लिकार्जुन नगरात तरूणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

शहरातील एमआयडीसीमधील मल्लिकार्जुन नगरात तरूणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. संतोष राम नंदी (वय ३८, रा. १४५, न्यू मल्लिकार्जुन नगर, एमआयडीसी, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्याचे नाव आहे. १६ जानेवारी रोजी सकाळी साडेदहाच्या पूर्वी राहत्या घरी संतोष नंदी यांनी ओढणी व टॉवेल एकत्र करून घराच्या छताच्या पत्र्याच्या अँगलला गळफास घेतला. ही बाब नातेवाईकांच्या निदर्शनास आल्यानंतर नातेवाईकांनी पोलिस हवालदार एस एन गायकवाड यांच्या मदतीने खाली उतरवून बेशुध्दावस्थेत संतोष यास शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. प्रतिक माने यांनी संतोष यास मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# निवृत्ती वेतन योजना पालिकेत लागू

## आतापर्यंत कर्मचाऱ्यांची रक्कम जमा करणारी सोलापूर महापालिका ठरली पहिली

### १ हजार २८९ कर्मचाऱ्यांना दिला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेतील वर्ग २ ते ४ मधील सुमारे १ हजार २८९ कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) अखेर महापालिकेत १०० टक्के लागू करण्यात आली आहे. सर्व एनपीएस लागू झाल्या पासून आजतगायत कर्मचाऱ्यांची रक्कम एनपीएस योजनेमध्ये जमा करणारी सोलापूर महानगरपालिका ही पहिली महापालिका ठरलेली आहे, अशी माहिती महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी दिली.



शासकीय सेवेत सन २००५ नंतर रूजू झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू नाही. त्या बदल्यात केंद्र शासनाने राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) अंमलात आणली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या योजनेची अपेक्षित पद्धतीने अंमलबजावणी सोलापूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांबाबत करण्यात आलेली नव्हती. परंतु आता मात्र या योजनेचा लाभ सोलापूर महानगरपालिकेकडील सर्व पात्र कर्मचाऱ्यांना मिळावा यासाठी विशेष मोहिमेद्वारे प्रयत्न करून एनपीएस योजनेची अंमलबजावणी विहित पद्धतीने करून सुमारे १ हजार २८९ कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ देण्यात आलेला आहे. सोलापूर महानगरपालिकेतील वर्ग २ ते ४ मधील सुमारे १ हजार २८९ कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना (एनपीएस) अखेर महापालिकेत १०० टक्के लागू करण्यात आली. या पेन्शन योजनेत कर्मचाऱ्यांचा हिस्सा म्हणून १० टक्के अंशदान कपात केले जात असून, महापालिकेकडून मनपाचा १४ टक्के हिस्सा टाकला जात आहे. पण मागील १८ वर्षापासून एनपीएस योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांचे रक्कम कपात किती झाली याचा हिशोब नव्हता, तो हिशोब करून तसेच महापालिकेच्या हिस्सा याची तजवीज करून तसेच या दोन्ही रक्कमेवरील व्याजाची तजवीज करून ती रक्कम सन २००८-०९ पासूनची आजतगायतची रक्कम या योजनेतील कर्मचाऱ्यांची मागील सर्व थकीत हप्ते महानगरपालिकेकडून सर्व कर्मचाऱ्यांचे पीआरएएन (PRN )क्रमांक काढून कर्मचाऱ्यांच्या एनपीएस (NPS) खात्यावर जमा करण्यात आलेली आहे. यासाठी कर्मचाऱ्यांचा वेतनातील कपात हिस्सा व महानगरपालिका हिस्सा व दोन्ही रक्कमेवरील व्याज असे मिळवून सुमारे ५० कोटी रुपये इतकी रक्कम एनपीएस योजनेत जमा करण्यात आलेली आहे. तसेच या कर्मचाऱ्यांच्या नावे नवीन पीआरएएन (PRN) कार्ड उपलब्ध करून देण्यात आलेले असून, त्यामध्ये एनपीएस योजनेची संपूर्ण माहिती त्यांना मिळणार आहे. कर्मचाऱ्यांसाठीची ही अत्यंत महत्वाची योजना विहित पद्धतीने अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांच्या नियंत्रणाखाली या विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. तसेच सर्व एनपीएस लागू झाल्या पासून आजतगायत कर्मचाऱ्यांची रक्कम एनपीएस योजनेमध्ये जमा करणारी सोलापूर महानगरपालिका ही पहिली महापालिका ठरलेली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

**दरमहा ८४ लाख इतकी रक्कम एनपीएस योजनेसाठी जमा**

यापुढील वेतनातून कर्मचारी हिस्सा व महानगरपालिका हिस्सा नियमितपणे कपात करून दरमहा सुमारे ८४ लाख इतकी रक्कम एनपीएस योजनेसाठी जमा करण्यात येत आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीनंतर पेन्शन स्वरूपात चांगली रक्कम मिळणार आहे. तसेच त्यांना त्यांच्या एनपीएस योजनेतील रक्कमेवर चांगले व्याजदर प्राप्त होणार आहेत,असेही महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. रत्नराज जवळगेकर यांनी स्पष्ट केले आहे.

# पोलिसांनी आरोपीस दिली क्लीनचिट

## न्यायालयाने केले आरोपी, मात्र खटल्याअंती निर्दोष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

यशवंत रामचंद्र वाघमारे (वय ५७, रा. तरटगाव, ता. मोहोळ) यास बहिणीने केलेली केस काढून घे म्हणून मारहाण करून त्याचे राहते घर पेटवून दिल्या प्रकरणी विलास दशरथ पाटील (वय ५०), अनिल दशरथ पाटील (वय ४७), दशरथ तात्या पाटील (वय ८०), दिनेश राजाराम पाटील (वय ३०), मारुती पांडुरंग वाघमारे (वय ६५, सर्व रा. तरटगाव) यांच्यावर भरलेल्या खटल्याची सुनावणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सलमान आझमी यांच्यासमोर होऊन गुन्हा शाबीत न झाल्यामुळे सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. रामचंद्र याची बहीण कृष्णाबाई महादेव कोळी हिने सन २००६ मध्ये यातील आरोपी विलास पाटील व इतरां विरुद्ध केस दाखल केली होती. ती केस मोहोळ न्यायालयात चौकशीस आली होती. दि. १८ नोव्हेंबर २०१२ रोजी रात्री १० च्या सुमारास रामचंद्र हा त्याच्या घरासमोर बसला असता वरील आरोपी हे त्यांच्या घरासमोर आले व त्यांनी हातातील पेट्रोल, काडीपेटी, लोखंडी पहार अशा हत्यारांनी रामचंद्राला तुझ्या बहिणीने केलेली केस मोहोळ कोर्टातून काढून घेण्याबाबत बहिणीला सांग म्हणून शिवीगाळ करून लाथा बुक्क्याने मारहाण करून त्यांचे राहते घर पेट्रोल ओतून पेटवून दिले. याबाबतची फिर्याद रामचंद्र वाघमारे यांने काम ती पोलीस ठाण्यात दिली होती. पोलिस हे सदर गुन्ह्याचा तपास करीत असताना यातील आरोपी विलास दशरथ पाटील हा घटनेच्या वेळी तेथे उपस्थित नव्हता असा पुरावा मिळाल्यामुळे पोलिसांनी त्यास गुन्ह्यातून वगळले होते. मात्र न्यायालयाने त्यास आरोपी करून त्याच्याविरुद्ध खटला चालू केला. सदर खटल्यात सरकार पक्षातर्फे सहा साक्षीदार तपासण्यात आले. खटल्याच्या सुनावणीच्या वेळेस आरोपींच्या वकिलांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता केली. यात सरकार पक्षातर्फे ॲड. आनंद कुर्डूकर, ॲड. नरखेडकर यांनी तर आरोपीतर्फे ॲड. मिलिंद थोबडे, ॲड. विनोद सूर्यवंशी, ॲड. दत्ता गुंड, ॲड. रविंद्र पाटील यांनी काम पाहिले.

# छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा

## ८२ जणांनी रक्तदान करून जपली सामाजिक बांधिलकी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३४४ व्या राज्याभिषेक सोहळा निमित्त गुरुवार दि. १६ जानेवारी रोजी सकाळी शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक सोहळा समितीच्यावतीने राज्याभिषेक सोहळा उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी राज्याभिषेक सोहळा समितीच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ८२ रक्तदात्यांनी रक्तदान करीत सामाजिक बांधिलकी जपली.

जुना पूना नाका परिसरातील धर्मवीर संभाजी महाराज पुतळा चौकात जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांच्या हस्ते संभाजी महाराजांच्या पुतळ्यास राज्याभिषेक करण्यात आला. यावेळी ॲड. बाबासाहेब जाधव, श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, सदस्य राजन जाधव, श्रीकांत घाडगे, श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा सुशोभिकरण समितीचे अध्यक्ष अमोल शिंदे आदी उपस्थित होते. छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ सकाळी ध्वजवंदन करून जिजाऊ वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली त्यानंतर छत्रपती संभाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळ्या निमित्त विविध सन्माननीय अतिथी यांच्या सत्कार करण्यात आला तसेच आनंदोत्सव म्हणून समितीचे वतीने मिठाईवाटप करण्यात आले. सकाळी नऊ ते दुपारी चार वाजेपर्यंत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिरात ८२ जणांनी रक्तदान केले रक्तदात्यांना छत्रपती यांची मूर्ती भेट देण्यात आली.

यावेळी राज्याभिषेक समितीचे शिरीष जगदाळे, अमोल जाधव, बाळासाहेब गायकवाड, गोवर्धन गुंड, प्रकाश ननवरे, श्याम कदम, संभाजीराजे भोसले, अजय सोमदळे, शत्रूध्न माने, श्रेयस माने, शेखर जगदाळे, सचिन चव्हाण, संतोष आतकरे, सोमनाथ राऊत, मोनाली धुमाळ, मनीषा कोळी, उज्ज्वला साळुंखे, लता ढेरे, माधुरी चव्हाण यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयात १ हजार ५२८ बदल अहवाल निर्णित

### धर्मादाय उपायुक्त प्रविण कुंभोजकर यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

सार्वजनिक न्यास नोंदणी कर्यालयातर्फे सन २०२४ मध्ये विविध लोकाभिमुख योजना राबविण्यात आल्या आहेत. यामध्ये १ हजार ५२८ बदल अहवाल निर्णित करण्यात आले. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचे निर्देशानुसार घेण्यात आलेल्या तीन विशेष मोहिमे अंतर्गत १ हजार ८२ बदल अहवाल निर्णित करण्यात आले असल्याची माहिती धर्मादाय उपायुक्त प्रविण कुंभोजकर यांनी दिली.

निर्णित केलेल्या बदल अर्जाचे आदेश डिजीटल स्वाक्षरीने धर्मादाय संकेतस्थळावर अपलोड करण्यात आले. जेणेकरुन नागरीकांना निर्णित केलेल्या बदल अर्जाचे आदेश कुठेही वाचणे सहज शक्य झाले आहे. तसेच ६९३ संस्था तथा न्यास ऑनलाईन प्रणालीतून नोंदणी करण्यात आले. संस्था तथा न्यास नोंदणीचे ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात आले आहेत.

विविध स्वरुपाच्या प्राप्त तक्रारींचे न्यास नोंदणी निरीक्षक यांचेमार्फत चौकशी करुन ३३० प्रकरणे निर्गमीत झाली. प्रामुख्याने संस्था आणि न्यास नोंदणीचे सर्व कामकाज ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात आले आहे. तसेच गणेश उत्सव, नवरात्र उत्सव आणि इतर उत्सवाकरिता तात्पुरत्या परवानग्या देणेची प्रक्रिया देखील सोलापूर येथे प्रथम संपूर्णतः ऑनलाईन पध्दतीने करण्यात आली आहे. या अंतर्गत एकूण ९०९ तात्पुरत्या परवानग्या देण्यात आल्या. यासाठी अर्ज ऑनलाईन भरण्याची सोय असल्याने व तात्पुरत्या परवानग्या अर्जदारांच्या ई-मेल वर प्राप्त होत असल्याने अर्जदारांना न्यास नोंदणी कार्यालयात एकदाही येणेची गरज भासली नाही.

तसेच शासनाचे विधी आणि न्यास विभागाच्या धोरणानुसार लवकरच सर्व अभिलेख संगणीकीय करण्याचे कामकाज सुरु होणार असून त्यासाठीची प्राथमिक तयारी न्यास नोंदणी कार्यालयात युध्द पातळीवर सुरू आहे. विधी व न्याय मंत्री यांचे निर्देशानुसार न्यास नोंदणी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली धर्मादाय इस्पितळामार्फत गतवर्षी एकूण १८२ मोफत आरोग्य शिबिरांच्या यशस्वी आयोजन करण्यात आले. ज्यामध्ये सुमारे ८ हजार २१९ रुग्णांनी लाभ घेतला. त्याचप्रमाणे कारागृहात दोन आरोग्य शिबीरांची आयोजन करण्यात आले होते.

या शिबीरात सुमारे ७२८ कैदयांना आरोग्य शिबीराचा लाभ मिळाला. सार्वजनिक विभागाचे काम जास्तीत जास्त लोकाभिमुख पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत. या धोरणास धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती व धर्मादाय सह आयुक्त, पुणे विभाग, पुणे श्रीमती रजनी क्षीरसारगर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य लाभत असल्याचे धर्मादाय उपायुक्त कुंभोजकर यांनी सांगितले.




# २४९ बदली, रोजंदारी कामगारांना कायम करण्याचा दुरुस्ती प्रस्ताव शासनाकडे सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

सोलापूर महानगरपालिकेतील बदली व रोजंदारी कर्मचाऱ्यांना सोलापूर महानगरपालिकेच्या सेवेत कायम करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडे दुरुस्ती प्रस्ताव सोलापूर महानगरपालिकेने पाठविला आहे.

हा दुरुस्ती प्रस्ताव पाठविल्याबद्दल सर्व बदली व रोजंदारी कामगारांच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली - उगले आणि उपायुक्त आशिष लोकरे यांचा सत्कार केला. दुरुस्ती प्रस्ताव पाठवल्याबद्दल त्यांचे आभार मानले. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून सोलापूर महानगरपालिका बदली व रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करणार आहेत, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांनी दिली.

यावेळी गौतम नागटिळक, अमर सोनकांबळे बाळू शिंदे ,नितीन शिरसाट,सिद्धार्थ दुपारगुडे, राजाराम लोखंडे, अजित वाघमोडे, नागनाथ आखाडे अनिल तोरणे, शाहीर कांबळे ,बी.टी. जाधव ,अनिल खराटे आदींसह कर्मचारी उपस्थित होते.

# राज्य शासनाप्रमाणे महापालिका कर्मचाऱ्यांनाही महागाई भत्ता लागू करा

### महापालिका कामगार संघटना कृती समितीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**


राज्य शासनाप्रमाणे महापालिका कर्मचाऱ्यांनाही महागाई भत्ता लागू करावा आणि मागील थकीत महागाई भत्त्याचे फरक सेवानिवृत्तांसह सर्व सेवकांना देण्यात यावा यासह विविध मागण्यांचे निवेदन महापालिका कामगार संघटना कृती समितीने आयुक्त शीतल तेली-उगले यांना देण्यात आले.

कृती समितीचे अध्यक्ष कामगार नेते अशोक जानराव यांच्या नेतृत्वाखाली आयुक्तांना हे निवेदन देण्यात आले. या निवेदनात विविध पाच मागण्यांचा समावेश आहे. येत्या प्रजासत्ताक दिनी महापालिका आयुक्तांनी विविध मागण्यांच्या पूर्ततेसाठी कामगार हिताची घोषणा करावी, असे निवेदनात म्हटले आहे. राज्य शासनाने जाहिर केलेला महागाई भत्ता लागू करून मागील थकीत महागाई भत्त्याचे फरक सेवानिवृत्तांस सर्व सेवकांना द्यावे. बालवाडी शिक्षिका सेविकेंच्या मानधनात वाढ करून मासिक १५ हजार करावे.अधिकारी, कर्मचारी, रोजंदारी, कंत्राटी, मानधनावरील सर्व सेवकांना कॅशलेस औषधोपचार सुरू करावा. गुणवंत कामगारांना पुरस्काराबरोबर एक वेतनवाढ देऊन सन्मान करावा. लाड समितीच्या अंमलबजावणीबाबत शासन निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ व दिनांक १३ ऑक्टोबर २०२४ रोजी सुधारित तरतुदीप्रमाणे सफाई कामगारांच्या वारसांना तात्काळ नोकरीत घ्यावे, आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. यावेळी कार्याध्यक्ष शेषराव शिरसट, अजय क्षीरसागर, लिंबराज जेटीथोर यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# कुर्डूवाडी स्टेशन येथे मर्यादित उंचीचा सबवे बसवला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने १५ जानेवारी रोजी दौंड-सोलापूर विभागातील कुर्डूवाडी स्टेशन येथे मर्यादित उंचीचा सबवे बसवण्याचे काम यशस्वीरित्या पूर्ण केले. रद्द केलेल्या लेव्हल क्रॉसिंग ३८ च्या जागी हा महत्त्वाचा पायाभूत सुविधा प्रकल्प रेल्वेने उभा केला आहे. ज्यामुळे रहिवाशांना कनेक्टिव्हिटी आणि सुविधा सुधारण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. कुर्डुवाडी स्टेशन जवळील गावे रेल्वे रुळांमुळे दोन भागात विभागली गेली होती. गावकऱ्यांसाठी वाढीव कनेक्टिव्हिटी आणि सुलभतेची गरज ओळखून, मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने मर्यादित उंचीचा सबवेच्या तरतुदीला मंजुरी दिली. पूर्वी, मूळ एलसी गेटपासून सोलापूर टोकाकडे अंदाजे



५०० मीटर अंतरावर असलेला रोड ओव्हर ब्रिज रहिवाशांसाठी वाहनांच्या हालचालीचे एकमेव साधन होते. नवीन स्थापित केलेले एलएचएस आता हलक्या मोटार वाहनांची हालचाल सुलभ करेल, ज्यामुळे अधिक सुलभ आणि कार्यक्षम उपाय मिळणार आहे.

रेल्वे रुळाखाली २३ रिइन्फोर्स्ड काँक्रीट सिमेंट ट्विन बॉक्स एकत्र करून २ (४.० मीटर रुंदी २.६० मीटर उंची) आकाराचे बसवण्यात आले आहे. आरसीसी बॉक्स घालण्यात काटेकोर नियोजन आणि अंमलबजावणीचा समावेश होता. सिग्नल आणि टेलिकम्युनिकेशन केबल्स, ओव्हरहेड इक्विपमेंट वायर्सची उपस्थिती आणि जागेची कमतरता यासारख्या अनेक आव्हानांना पेलत हा प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केला आहे. १५ जानेवारी रोजी या कामाच्या शेवटच्या टप्प्यात २५० मेट्रिक टन क्षमतेच्या ४ पोखलेन मशीन, २ जेसीबी मशीन, ३ डंपर आणि २ क्रेन तैनात करण्यात आल्या. सोलापूर विभागाच्या अभियांत्रिकी विभागाचे वरिष्ठ विभागीय अभियंता सचिन गणेर, वरिष्ठ विभागीय अभियंता अवदेश मीना, सहायक विभागीय अभियंता, कुर्डूवाडी यशवंत भाटकर आणि वरिष्ठ विभाग अभियंता दीपक कुमार सिंग, सैंतन आणि कैलाश वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि ८० कामगारांच्या परिश्रमाने हे कार्य पार पडले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर• दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

## क्राईम वृत्त...

### मल्लिकार्जुन नगरात दीड लाखांची घरफोडी

**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

शहरातील होटगी रोडवरील हत्तुरे वस्ती येथील मल्लिकार्जुन नगरमधील बंद घर फोडून चोरट्याने १ लाख ६७ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेली. याबाबत नंदा हरी शिंदे (वय ५८, रा. ३४, मल्लिकार्जुन नगर, होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ जानेवारी रोजी सकाळी सव्वा आठच्या सुमारास नंदा शिंदे या बाहेर गेल्यानंतर त्यांचा नातू ओम पवार याने घराला कडी लावून त्यावर कुलूप अडकावून ट्यूशनला गेला होता. त्यावेळी कोणीतरी चोरट्याने दरवाजाला अडकाविलेले कुलूप काढॅन घरात प्रवेश करून घरातून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा १ लाख ६७ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरून नेला. म्हणून विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार शिर्के पुढील तपास करीत आहेत.

### सिध्देश्वर मंदिरातून महिलेचे मंगळसूत्र चोरीस

**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

श्री सिध्दरामेश्वर मंदीरात दर्शनासाठी आलेल्या महिलेच्या गळ्यातून चोरट्याने २० हजार रुपये किंमतीचे २ ते अडीच ग्रॅम वजनाचे सोन्याचे मणी मंगळसूत्र चोरून नेले. याबाबत मिनाक्षी मल्लप्पा बुक्का (वय ३९, रा. भारतरत्न इंदिरा नगर, अशोक चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १४ जानेवारी रेजी सायंकाळी मिनाक्षी बुक्का या सिध्देश्वर मंदीरात पतीसह दर्शनासाठी गेल्या होत्या. त्यावेळी मंदीरातील दर्शनासाठी असलेल्या गर्दीचा फायदा घेऊन कोणीतरी चोरट्याने मिनाक्षी बुक्का यांच्या गळ्यातील मणी मंगळसूत्र चोरून नेले. याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार चुंगे पुढील तपास करीत आहेत.

### घरगुती भांडणावरून महिलेने स्वत:वर ब्लेडने केले वार

**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

घरगुती भांडणावरून महिलेने स्वतः वर ब्लेडने वार करून घेतल्याने ती महिला जखमी झाली. निर्मला नागनाथ राठोड (वय ४०, रा. दोड्डी, ता. दक्षिण सोलापूर) असे जखमी महिलेचे नाव आहे. १५ जानेवारी रोजी सायंकाळी राहत्या घरी घरगुती भांडणाच्या कारणावरून डाव्या हातावर ब्लेडने मारून घेतले. त्यामुळे त्यांना उपचारासाठी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### मित्र नगरमधून ३० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

शहरातील शेळगी परिसरातील मित्र नगरातील नटराज सोसायटीमध्ये घरासमोर लावलेली ३० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत हेमंत मल्लिनाथ भोसले (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हेमंत भोसले यांनी १३ जानेवारी रोजी सायंकाळी त्यांची एमएच १३ डीजे ६९६२ क्रमांकाची दुचाकी ही घरासमोर हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार आरेनवरू तपास करीत आहेत.

### बोरामणी नाका येथे ट्रकखाली येऊन दुचाकीस्वार जखमी

**सोलापूर, दि.१६ जानेवारी-**

शहरातील बोरामणी नाका येथे दुचाकी आणि ट्रकचा भीषण अपघात होऊन एकजण जखमी झाला. अनिल आनंदराव शिंदे (वय ५२, रा. बाळीवेस, बुधले गल्ली, सोलापूर) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. गुरुवारी सकाळी अनिल शिंदे हे मार्केट यार्ड येथून राहत्या घरी म्हणजेच बाळीवेस येथे निघाले होते. ते बोरमानी नका येथे आले असता ट्रकने त्यांना जोराची धडक दिली. या धडकेत त्यांच्या उजव्या पायास मुकामार लागल्याने त्यांना म दतनीस संजीव कुमार कोळी यांनी उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालय या ठिकाणी दाखल केले. याबाबत सिव्हील पोलीस चौकीत नोंद झाली आहे.

# डीजीसीएकडून एक परवाना अजूनही प्रलंबित

- फ्लाय ९१ साठी मुंबई विमानतळावर स्लॉट निश्चित

## विमानसेवा लवकर सुरु न झाल्यास स्लॉट जाण्याची भीती

## सोलापूर विकास मंचचा पाठपुरावा सातत्याने सुरूच




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोलापूरहून येणाऱ्या आणि जाणाऱ्या फ्लाय ९१ विमानासाठी स्लॉट निश्चित करण्यात आलेला असून, या स्लॉटच्या आधारावर सोलापूरमधून नागरी विमानसेवा सुरू होण्याची शक्यता आहे. मात्र, विमानसेवा लवकर सुरू झाली नाही, तर हा महत्त्वाचा स्लॉट दुसऱ्या विमान कंपनीला दिला जाण्याची भीतीही सोलापूर विकास मंचचे अध्यक्ष केतनभाई शहा यांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि. १६) व्यक्त केली.

सोलापूरहून नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी सोलापूर विकास मंच गेल्या साडेचार वर्षांपासून अथक प्रयत्न करीत आहे. या मंचने प्रशासनावर सातत्यपूर्ण दबाव आणत सोलापूरच्या नागरिकांसाठी हा विषय प्राधान्याने पुढे नेला. सोलापूर येथील होटगी रोड विमानतळ मुंबईसह देशातील प्रमुख शहरांशी जोडण्यासाठी विकासमंच महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. मात्र शहरातील लोकप्रतिनिधी त्यांच्या हाकेला ओ देत नसल्याची विकास मंच पदाधिकाऱ्यांची खंत आहे.

एकही लोकप्रतिनिधी यासाठी पाठपुरावा करीत नसून, सामान्य नागरिकच विमानसेवा चालू करण्यासाठी अविरत धडपड करीत असल्याचेही ते म्हणाले.

### सोलापूरच्या विमानतळासाठी सर्व परवानग्या मिळाल्या



होटगी रोड विमानतळ पूर्णत्वाच्या मार्गावर असून, सोलापूरच्या नागरी विमानसेवेसाठी प्रशासकीय परवानग्या मिळाल्या आहेत. आता विमानसेवा सुरू करणे ही केवळ औपचारिकता राहिली आहे. केव्हाही विमान आले तरी त्यांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यासाठी सोलापूरच्या विमानतळावरील अधिकारी सक्षम आहेत.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी, सोलापूर**

### विमानसेवा सुरू झाल्यास काय होणार फायदा?

सोलापूर-मुंबई विमानसेवा सुरू झाल्यास, व्यावसायिक, विद्यार्थी, तसेच प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. सोलापूरच्या औद्योगिक विकासालाही चालना मिळेल. त्यामुळे सोलापूरवासीयांनी या विम ानसेवेची प्रतीक्षा अधिक उत्सुकतेने सुरू ठेवली आहे.

### मिळालेला स्लॉट गमावण्याचा धोका




सध्या फ्लाय ९१ या विमान कंपनीसाठी सोलापूर-मुंबई मार्गासाठी स्लॉट निश्चित झाला असला तरी, विमानसेवा तात्काळ सुरू न झाल्यास हा स्लॉट इतर कंपन्यांना दिला जाऊ शकतो. ही स्थिती टाळण्यासाठी प्रशासनाने त्वरित पावले उचलून नागरी विमानसेवा सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### सोलापूर विकास मंच नियमित करतेय पाठपुरावा

सोलापूर विकास मंचने गेल्या काही वर्षांत या विमानसेवेच्या मुद्द्याला प्राधान्य देत प्रशासनाला जागे केले आहे. या मंचाचे नेतृत्व करणाऱ्या केतन शहा, मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, विजय कुंदन जाधव, ॲड. दत्तात्रय अंबुरे, मनोज क्षिरसागर आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी केले. विमानसेवा सुरू करण्यासाठी प्रशासन आणि सोलापूर विकास मंचने एकत्र येऊन काम केल्यास सोलापूरचा आंतरराष्ट्रीय ओळख मि ळवण्याचा मार्ग नक्कीच सुकर होईल!

**- केतन शहा, अध्यक्ष, सोलापूर विकास मंच**

# योगदंडाच्या पूजनाने यात्रेची सांगता

**देशमुख वाड्यात सिद्धरामेश्वर यात्रेतील धार्मिक विधी संपन्न**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१६ जानेवारी-**

'सिद्धरामेश्वर महाराज की जय' च्या घोषात योगदंडाची महापूजा व मानकरी हिरेहब्बू यांना आहेर करून दक्षिण कसब्यातील देशमुख वाड्यात श्री सिद्धरामेश्वर यात्रेतील धार्मिक विधींची आज सांगता झाली.



सुरवातीला योगदंडाला स्नान घालण्यात आले. त्यानंतर सुधीर देशमुख व राजशेखर देशमुख यांनी योगदंडाला विभूती, हळद-कंकू लावले. त्यानंतर कळसाची पूजा होऊन हळद-कुंकू लावण्यात आले. त्यासमोर पान-सुपारी ठेवण्यात आली. योगदंडाला पुष्पहार घालण्यात आला. आरती करण्यात आली. दूध, खीर, पुरण-पोळी, शेंगा चटणी, तीळ चटणी, कटाची आमटी, गाजर, मेथी, वांगी, घेवडा, गरगटा, ताकाची कढी, दही शेंगा चटणी, तिळ चटणी, मिक्स पालेभाज्यांची पातळ भाजी आदी पदार्थांचा नैवेद्य दाखविण्यात आला. सागर हिरेहब्बू, मनोज हिरेहब्बू, विनोद हिरेहब्बू, शिवशंकर हब्बू, अमित हब्बू, राजेश हब्बू ओंकार हब्बू गणेश हब्बू यांची पाद्यपूजा करून आरती करण्यात आली. होमाची पूजा करून नैवेद्य दाखविण्यात आला.

यावेळी आ. विजयकुमार देशमुख, अभिराज देशमुख, क्षमा देशमुख, शिल्पा देशमुख, शीला देशमुख, संगीता देशमुख, अनिशा देशमुख, उर्वशी देशमुख उपस्थित होत्या. हिरेहब्बू यांचा प्रसाद झाल्यानंतर बाराबंदी काढून त्यांना आहेर करण्यात आला.

# वैराग, भालगाव भागात बिबट्याचा वावर

**रेडकावर हल्ला करून केले ठार; बिबट्या सदृश्य प्राण्याची दहशत कायम**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१६ जानेवारी-**

वैराग भागातील नागरीक वाघाच्या दहशतीतून सावरत असतानाच दुसरीकडे बिबट्या सदृश्य प्राण्याने वैराग, भालगाव येथे पाळीव प्राण्यांची शिकार करून त्यांना ठार केल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी बिबट्याचे ठसे असण्याचा वृत्ताला दुजोरा दिल्याने नागरिकात पुन्हा भीतीचे वातावर निर्माण झाले आहे. पानगाव शिवारात नऊ जानेवारीला फॉरेस्ट परिसरात नागरिकांना बिबट्या दिसला होता. त्यानंतर तो कोणालाही दिसला नाही व कुठे आढळून आला नाही त्यानंतर आता पुन्हा एकदा आठ दिवसांनी बिबट्याच्या हल्ल्याची घटना घडली आहे. मी सकाळी सात वाजता शेतात धार काढण्यासाठी गेलो पुन्हा घरी येऊन नऊ वाजता शेतात गेलो असता वैराग जवळील लाडोळे रोडवरील आमच्या शेतात गोठ्या बाहेर बांधलेल्या म्हशीच्या रेडकावर गुरुवारी सकाळी बिबट्या सदृश्य प्राण्याने हल्ला केला त्यात त्याचा जागीच मृत्यू झाला अमोल भोसले या शेतकऱ्याने सांगितले. एकीकडे बिबट्या



सदृश्य प्राण्यांचे हल्ले वाढत आहेत तर दुसरीकडे वनविभागाची संपूर्ण टीम येडशी-पांगरी भागातील जंगलात वाघोबाला शोधाण्याच्या कामात आहे. अशातच गुरुवारी सकाळी वैराग-माढा रोडवर संतनाथ साखर कारखान्या जवळ कोल्हा मृत अवस्थेत आढळून आला आहे.

अज्ञात वाहनाच्या धडकेमुळे त्याचा मृत्यू झाला आहे. वैरागचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रामचंद्र पाटील यांनी कोल्ह्याचे शिवविच्छेदन करून त्याला वनविभागाच्या ताब्यात दिले आहे.



# फसवणूक, घरफोडीचे गुन्हे उघडकीस

**मोहोळ पोलिसांना यश; २ गुन्ह्यांमधील पावणे चार लाखांचा मुद्देमाल जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

मोहोळ पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेला पोलीस ठाण्याकडील फसवणूक व घरफोडीचे दोन गुन्हे उघडकीस आणण्यात यश आले आहे. पोलिसांनी दोन आरोपींना गजाआड करून त्यांच्या ताब्यातून जवळपास पाऊणे चार लाख रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

यासंबंधी मिळालेली अधिक माहिती अशी की, मोहोळ तालुक्यातील शिरापूर येथील रंजना अशोक खांडेकर या महिलेस अज्ञातांनी तिच्या गळ्यातील मंगळसूत्राच्या बदल्यात जास्तीचे सोने देण्याच्या आमिषाने अर्धा तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र काढून घटनास्थळावरून काढता पाय घेतला होता. ही घटना मोहोळ शहरातील पाटील हॉस्पिटलजवळ ५ जानेवारी रोजी घडली.

अभिमान बापू तुपे (रा.पिटी, ता. पाटोदा, जि.बीड) आणि धिरज कैलास गुंड (रा. आष्टी) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

मोहोळ पोलीस ठाण्यात दाखल घरफोडीच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज पाहणी, गोपनीय खबऱ्यांकडून मिळालेली महत्वपूर्ण माहिती तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे याचा शोध घेऊन पोलिसांनी अभिमान तुपे व धिरज गुंड या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली. त्यावेळी त्यांच्याकडून मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल असलेले दोन गुन्हे उघडकीस आले आहेत. तुपे याच्याकडून फसवणुकीच्या गुन्ह्यात गेलेले अर्धा तोळे वजनाचे ३० हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मंगळसूत्र हस्तगत करण्यात आले. तर मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आष्टी येथील संगीता दत्तात्रय माने यांच्या घरातील घरफोडीचा गुन्ह्यात धिरज गुंड यास अटक करून त्याच्याकडून घरफोडीच्या गुन्ह्यात चोरीस गेलेल्या साडे तीन लाख रूपयांपैकी ३ लाख ४५ हजार रूपयांची रोकड जप्त करण्यात आली.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक हेमंत शेंडगे, पोलीस उपनिरिक्षक अजय केसरकर, हवालदार दयानंद हेंबाडे, पठाडे, संदेश पवार, पोलिस नाईक चंद्रकांत ढवळे, पोलिस शिपाई अमोल जगताप, संदीप सावंत, अविराज राठोड, स्वप्नील कुबेर, सुनिल पवार व सायबरकडील युसूफ पठाण यांनी केली.

# ॲड. कै. एकनाथराव माने यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्कार

**वारस ज्येष्ठ विधीज्ञ धनंजय माने यांनी सन्मान स्वीकारला**

**तभा वृत्तसेवा,**
**वैराग, दि.१६ जानेवारी-**

येथील छत्रपती शिवाजी प्रशालेत मराठा सम ाज सेवा मंडळाच्या वतीने मराठा समाज सेवा मंडळ सोलापूर संस्थेचे पहिले अध्यक्ष कै. ॲड. एकनाथराव तुळशीराम माने यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांचे वारस ज्येष्ठ विधीज्ञ धनंजय माने यांनी हा पुरस्कार स्वीकारला.



छत्रपती शिवाजी प्रशालेत मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने शिवतीर्थ पुरस्काराचे वितरण माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे हे होते. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून हभप प्रकाश महाराज बोधले यांची उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक सरचिटणीस प्रा.महेश माने यांनी केले. वारस ज्येष्ठ विधीज्ञ धनंजय माने यांना सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या सन्मानपत्रात म्हटले आहे की, ज्येष्ठ विधीज्ञ कै. ॲड. एकनाथ तुळशीराम माने यांनी वकीली पेशा स्विकारून सामान्य माणसाला न्याय देत, मातृऋण, पितृऋण, समाजऋण हे ऋण फेडताना मराठा समाज स्थिर स्थावर झाला पाहिले. तो शिक्षित झाला पाहिजे.ही भावना मनात ठेवून समाजासाठी वेळ देऊन वाटचाल केली होती.सोलापूरात मराठा समाज अत्यंत अल्प होता.

असंघटित, अशिक्षित असलेला हा मराठा समाज मील कामगार व मोल मजुरी करून जीवन जगत होता. मराठा समाजाची मुले शिकून डॉक्टर, वकिल, इंजिनियर व अधिकारी झाली पाहिजेत. हा विचार घेऊन त्यावेळच्या मराठा समाजातील मान्यवरांना एकत्रित व संघटीत करून १९६० साली मराठा समाज सुधारणा मंडळाची स्थापना केली. या मंडळाचे पहिले अध्यक्षपद भूषविले. या मंडळामार्फत १८ जून १९६२ साली छत्रपती शिवाजी हायस्कूल या शाळेची निराळे वस्तीतील उंब्रजकर यांच्या तीन खोल्यामध्ये सुरूवात केली होती. पुढे त्यांनी या संस्थेसाठी १०१-व मुरारजी पेठ, प्रभात टॉकिजच्या समोर एक रूपये भाडे तत्वावर सरकारकडून एक एकर जागा प्राप्त केली. या जागेत ऐतिहासिक, भव्य इमारत बांधण्याचा संकल्प केला. या शाळेच्या दुसऱ्या बॅचचे विद्यार्थी म्हणून शिकत असताना, पी.टी.च्या तासाला शाळेच्या बांधकामासाठी वाळू, विटा, दगड, वाहतूक करण्याचे काम तत्कालीन विद्यार्थ्यांनी केले. आपण लावलेले रोपटे आज वटवृक्षात रूपांतरीत झाले आहे. के. जी. ते पी.जी. पर्यंतच्या शिक्षणाची सोय या शिक्षण संकुलात आता केली आहे. दिवसभर काम करणारे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून रात्र कनिष्ठ व रात्र वरीष्ठ महाविद्यालयाची सद्यस्थितीत सोलापुरात सुरूवात केली शाहू, फुले, आंबडेकरांचे विचार सध्याचे पदाधिकारी या शिक्षण संकुलात रूजवीत आहेत.

कै. ॲड. एकनाथ तुळशीराम माने यांनी बांधलेली ही ऐतिहासिक वास्तू जपण्याचे आम्ही प्रयत्नही करीत आहोत. आपल्या कर्तृत्वाचा हा इतिहास समाजापर्यंत पोहचवावा व भावी पिढीला माहित व्हावा म्हणूनच संस्थेने त्यांना मरणोत्तर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानीत करण्यात येत आहे. आपल्या विचारांची जपणूक करणारे आपले वारस चिरंजीव ॲड. धनंजय माने यांना जीवन गौरव पुरस्कार देवून सन्मानीत करण्यात येत आहे, असा गौरवपूर्ण उल्लेख या सन्मानपत्रात मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केला आहे.

### ट्रॉलीतून खाली पडून तीन वर्षीय बालकाचा मृत्यू

**अक्कलकोट तालुक्यातील म्हैसलगी येथील घटना**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

ऊसाच्या ट्रॅक्टर ट्रॉलीतून खाली पडून ट्रॉलीचे चाक अंगावरून गेल्याने तीन वर्षीय बालकाचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी सकाळी नऊच्या सुमारास म्हैसलगी (ता. अक्कलकोट) येथे घडली. मनिष मुकेश काजल (वय ३, रा. करवानी, ता. खालवा, जि. खांडवा, मध्य प्रदेश सध्या रा. म्हैसलगी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर) असे मरण पावलेल्या बालकाचे नाव आहे.


मनिष काजल हा त्याच्या आई-वडीलांसोबत म्हैसलगी येथील बिराजदार यांच्या शेतात ऊसतोडीसाठी गेला होता. गुरुवारी सकाळी नऊच्या सुमारास बिराजदार यांच्या शेतात मनिष हा आईसोबत ट्रॅक्टरच्या ट्रॉलीमागे बसून जात असताना खड्ड्यामध्ये गाडी आदळल्याने मनिष हा वरून खाली पडला. त्यावेळी पाठीमागून येणाऱ्या ट्रॅक्टरचे छकडा गाडीचे मागील चाक मनिषच्या तोंडावरून गेल्याने तो गंभीर जखमी झाल्याने त्याला तात्काळ बेशुध्दावस्थेत वडील मुकेश काजल यांनी सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात दाखल केले. परंतु, डॉ. प्रतिक माने यांनी मनिष याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - १००५

**तुका म्हणें अवघें फिकें भावाविण ।**
**मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ।।**

मुके प्राणीसुध्दा एकमेकांच्या भावनेची किंमत करतात, त्यामुळे बुध्दीजीवी माणूस भावनेची किंमत करतो किंवा कसे ? असा प्रश्नच निर्माण होत नाही. मानवी जीवनात भावनेला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. भावना हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे, असे म्हटले तरी चुकीचे होणार नाही. शारीरिक दृष्टया जवळीक असणारी माणसं मनाने एकत्रित असतीलच असे नाही. त्याचबरोबर शरीराने दूर असणारी माणसं मनाने दूरच असतील असेही नाही. शरीराच्या एकत्रितपणापेक्षा मनाची एकत्रितता अत्यंत महत्वाची असते. मनाला जोडण्याचे महत्वपूर्ण साधन व माध्यम म्हणजे भाव होय. भावच नसेल तर मनाची जोडणी अशक्य असते. जेथे मनाची जोडणी होत नाही, तेथे केवळ व्यवहार उरतो. जेथे व्यवहार असतो तेथे प्रेम, आपुलकी आदिला योग्य ते स्थान नसते. भावनेची बळकटी असणाऱ्यांना आर्थिक दारिद्र्य सतावू शकत नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाले तर ज्या कुटूंबात एकमेकांबद्दल भाव, प्रेम नाही. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर आर्थिक संपन्नता असतांनाही मनाच्या दारिद्र्याचे राज्य त्या कुटूंबात चालते. मनाच्या दारिद्र्याच्या राज्यात पैसा, संपत्ती, धन कांही कामाचे नसते. मानवी जीवनाचा आधारस्तंभ असणारा भाव जेथे नाही ते कितीही मूल्यवान असले तरी ते व्यर्थ आहे. अत्यंत सुंदर पक्वान्न बनविले पण त्यात मीठच नसेल तर ते जसे फिके किंवा आळणी असते. त्याप्रमाणे भाव नाही ते सर्व आळणी,व्यर्थ,फिके असते. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात.



**तुका म्हणें अवघें फिकें भावाविण ।**
**मीठ नाहीं अन्न तेणें न्यायें ।।**

एखादी गोष्ट, व्यक्ती आपल्या मनाला आवडतच नसेल तर ती रात्रं-दिन जवळ असूनही उपयोगाची नसते. मोठे झालेले म्हणजे दूध न पिणारे वासरु गायीजवळ बांधले तरी ती माता त्या वासराला जवळ घेत नाही. त्या वासराने कासात तोंड घातले तर ती त्याला लाथाडते. कारण त्या वासराविषयी तिच्याकडे पुर्वीप्रमाणे भाव शिल्लक राहिलेला नसतो. त्याप्रमाणे माणूस जवळ असूनही त्याच्याबद्दल जर आपल्याकडे भावच नसेल तर त्याच्या जवळ असण्याला अर्थ उरत नाही. पती-पत्नी म्हणून नांदणारे अनेक जोडपी आपणाला पहायला मिळतात की, जे केवळ शरीराने एकत्र आहेत. प्रत्यक्षरित्या त्यांच्यामध्ये भावनेचे/विचाराचे अत्यंत मोठे अंतर असते. भावनेचे अंतर असणारे हे जोडपे एकमेकांबद्दलची आवड जोपासत नाहीत. म्हणूनच यांचे कलह बाहेर येतात. नाईलाजास्तव एकत्र राहणारे, एकत्र काम करणारे असे अनेक लोक आहेत की, जे केवळ शरीराने एकत्र असतात. भगवंताच्या मूर्तीजवळ असणारे अनेक पूजारी, भक्त हे केवळ व्यवहारापोटी जवळीक दाखवितात. प्रत्यक्षात भावनेने ते दूर असतात. आपल्याही जीवनात असे अनेक प्रसंग आले असतील की, जेथे भावना शून्य असतांना जवळीक दाखवावी लागली असेल. असो, ज्याला कुटूंबात भावना जोपासता येत नाही, त्याला समाजात भावना जोपासता येणे अशक्य असते. भावना ही पैशाने खरेदी होणारी बाब नाही. ती आपल्या ह्रदयातून आपणालाच निर्माण करावी लागते. ईश्वरालासुध्दा मानवाप्रमाणे आपल्या भावनेचीच आवश्यकता आहे, हे लक्षात असू द्यावे.

**जय जय राम कृष्ण हरी ।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# ‘तिळगुळा’मुळे स्नेहभाव वृद्धिंगत

### मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम; जि. प. कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने तिळगुळ समारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

भारतीय संस्कृतीतील मकर संक्रांत सण हा संक्रमण कालावधीमध्ये येत असतो. तिळगुळातून शरीरास स्निग्धता अन् ऊर्जा मिळते व स्नेहभाव वृद्धिंगत होऊन एकात्मतेची भावना वाढीस लागते हे मकर संक्रात सणाचे वैशिष्ट्य असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.



जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक एक च्या वतीने आयोजित तिळगुळ समारंभाच्या निमित्ताने सीईओ जंगम यांनी भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी जिल्हा परिषदेतील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना जंगम यांनी तिळगुळ देऊन मकर संक्रांतीच्या शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी मुख्य लेखा व वित अधिकारी मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, महिला संचालक मृणालिनी शिंदे, श्वेता राऊत यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांना हळदीकुंकू लावून संक्रातीचे वाण व तिळगुळ दिला. याप्रसंगी जिल्हा परिषदेतील त्याचप्रमाणे पंचायत समिती दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर मधील सर्व महिला कर्मचारी यांनी उत्साहात सहभाग नोंदविला. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, मुख्य लेखा वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, जिल्हा कार्यक्रम अधिकारी महिला बालकल्याण प्रसाद मिरकले, शिक्षणाधिकारी प्राथमिक कादर शेख, कृषी विकास अधिकारी हरिदास हावळे, सागर बारावकर, वरिष्ठ भू वैज्ञानिक मुस्ताक शेख, कार्यकारी अभियंता संतोष कुलकर्णी, संजय पारसे, पंडित भोसले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर, प्रा. डॉ.ऋतुराज बुवा उपस्थित होते. प्रास्ताविक चेअरमन डॉ.एस पी.माने यांनी तर सूत्रसंचालन ज्येष्ठ संचालक विवेक लिंगराज तर आभार प्रदर्शन व्हॉईस चेअरमन सुरेश कुंभार यांनी मानले.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (२३) त्याग

मी आणि राष्ट्र एकच आहे. हा प्रत्येकामध्ये असणे यासाठी संघ प्रयत्नशील आहे. काहीजण मोठ्या अभिमानाने म्हणतात मी राष्ट्रासाठी खूप त्याग केला. परंतु जसे स्वतःच्या कुटुंबा करता केलेला त्याग हा स्वार्थत्याग नाही तसेच राष्ट्ररूपी कुटुंबाची सेवा करणे स्वार्थत्याग नाही; राष्ट्रासाठी खर्च करणे, कष्ट करणे त्यासाठी झिज सोसणे हे तर प्रत्येकाचे पवित्र कर्तव्य आहे. या संस्कारामुळेच संघ स्वयंसेवक देशभरात जवळपास २००० सेवा प्रकल्प चालवतात. या प्रकल्पांची आपण पुढे थोडक्यात ओळख करून घेऊच समाजोपयोगी काम करण्यामागे स्वार्थाची भावना नको. सारे जण आपले खाणे-पिणे- भोजन निवास- संतती या सर्वांच्या निर्मितीसाठी कष्ट करतात. आपल्या देशाच्या निर्मितीसाठी पण असे कष्ट उपसणे आवश्यक असते. राष्ट्र निर्माण व व्यक्ती निर्माण साठीच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापन केला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात संघ भावी हिंदु राष्ट्राची आशा आहे व 'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व' या विचाराची भावी पिढी निर्माण करण्याचे एकमेव स्थान आहे.

**- क्रमशः**

## गड्डा यात्रेत चाईल्ड हेल्पलाईन १०९८ ची यंत्रणा कार्यान्वित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १६ जानेवारी-**

सिध्दरामेश्वर यात्रेत हरवलेल्या बालकांचा शोध घेऊन अथवा सापडलेले बालक पोलीसांच्या मदतीने त्यांच्या पालकांपर्यंत सुखरूप पोहोचविण्याकरीता जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय व जिल्हा बालसंरक्षण कक्ष अंतर्गत चाईल्ड लाईन १०९८ ची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली माहिती जिल्हा बाल संरक्षण अधिकारी रेशमा गायकवाड यांनी कळविले आहे.

तसेच ज्या बालकांना काळजी व संरक्षणाची गरज आहे. अशा बालकांना सेवा येत असून, यात रस्त्यावरील बालके, बालकामगार शोषित बालके, देह विक्रिस बळी पडलेली बालके, व्यसनाधिन बालके, संघर्षग्रस्त बालके, मतिमंद बालके, एच.आय.व्हि. एड्स ग्रस्त बालके, आपत्ती ग्रस्त बालके, कौटुंबिक कलहास बळी पडलेली बालके, वैद्यकिय मदतीसाठी, निवाऱ्याच्या शोधात असलेले, हरवलेले बालके परत पाठविण्यासाठी, शोषणापासून संरक्षण, भावनिक मदत व मार्गदर्शन माहिती व संदर्भ सेवेकरीता कार्यरत असून, जर अशी कोणती बालके निदर्शनास आल्यास तात्काळ होम मैदान पोलीस चौकीशी संपर्क साधवा अथवा चाईल्ड हेल्पलाईनच्या टोल फ्री नंबर १०९८ वर कळवावे.




## संभाजी आरमारतर्फे छत्रपती संभाजी महाराज राज्याभिषेक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

संभाजी आरमारच्यावतीने छत्रपती संभाजी महाराजांचा राज्याभिषेक दिन साजरा करण्यात आला. ६ जून १६७४ रोजी संपन्न झालेल्या शिवराज्याभिषेकाने हिंदवी स्वराज्य निर्माण झाले तर १६ जानेवारी १६८१ या दिवशी छत्रपती संभाजी महाराजांच्या राज्याभिषेकामुळे हिंदवी स्वराज्याचे रक्षण झाले. शिवराज्याभिषेकप्रमाणेच शंभू राज्याभिषेक देखील तितकाच महत्वपूर्ण आहे. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराजांच्या जयजयकाराच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या.

यावेळी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष शिवाजी वाघमोडे, सरचिटणीस गजानन जमदाडे, उपाध्यक्ष शशिकांत शिंदे, जिल्हा संघटक अमित कदम, शहरप्रमुख सागर ढगे, उपशहर प्रमुख राज जगताप, सामाजिक कार्यकर्ते मोहन यडेलेलू, जनार्दन मदले, नागेश कणगी, संतोष कदम, अविनाश विटकर, मल्लिकार्जुन पोतदार, सोमनाथ मस्के, द्वारकेश बबलादीकर, प्रवीण मोरे, सुधाकर करणकोट आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

## नीती आर्टस्तर्फे शनिवारी ‘सरो-स्वर’ संगीत मैफल

### अनुपम जोशी यांचे सरोद वादन तर मुकुल कुलकर्णी यांचे गायन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ जानेवारी-**

नीती आर्टस्तर्फे शनिवारी (दि. १८) 'सरो-स्वर' या संगीत मैफलीचे आयोजन करण्यात आले आहे. या मैफलीत सुप्रसिद्ध सरोद वादक अनुपम जोशी यांचे सरोद वादन होणार असून मुकुल कुलकर्णी यांचे गायन होणार आहे.


अनुपम जोशी


मुकुल कुलकर्णी

मैफल दि. १८ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता लोकमान्य टिळक सभागृह, हिराचंद नेमिचंद वाचनालयातील म्फी थिएटर येथे होणार आहे. कलाकारांना डॉ. प्रवीण कासलीकर (संवादिनी), महेशराज साळुंके (तबला आणि धामा-जोरी) साथसंगत करणार आहेत. गायन वादनाची मैफल रसिकांसाठी खुली आहे. अनुपम जोशी हे सरोद वादनाचे सखोल अभ्यासक असून युवा पिढीतील सरोद वादकांमध्ये त्यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. युवा पिढीतील तबलावादक महेशराज साळुंके यांनी पंडित उमेश मोघे तसेच पंडित नयन घोष यांच्याकडून तबला वादनाचे शिक्षण घेतले असून त्यांनी अनेक दिग्गज कलाकारांना तबला साथ केली आहे. सांगीतिक कुटुंबात जन्म झालेल्या प्रा. डॉ. प्रवीण कासलीकर यांना वडिल विवेक कासलीकर यांच्याकडून संगीत क्षेत्राची ओळख झाली. वयाच्या सहाव्या वर्षीच प्रवीण यांनी वडिलांकडून गायन, संवादिनी तसेच तबला वादनाचे शिक्षण सुरू केले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - |
| दि. १७ जानेवारी २०२५ | चांगला दिवस, |
| विक्रम संवत् २०८०-८१ | संकष्टी चतुर्थी, |
| शके - १९४६ | ....राहू काल.... |
| संवत्सर - क्रोधी नाम | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - पौष | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| कृ. चतुर्थी - (२९.३०) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - शिशिर | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - मघा (१२.४४) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - सौभाग्य (२४.५५) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - बव (१६.४२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : आपल्या कामातील नियमीतपणाच आपल्याला यश देणार आहे. दुसऱ्याच्या भरोशावर काम टाकू नका. कौटुंबिक जीवन आनंदमय राहणार आहे.

**वृषभ** : शुभकार्यात भाग घेतल्यामुळे आनंदी रहाल. शत्रूवर विजय मिळवाल.

**मिथुन** : धैर्यामुळे आपली सर्वात मोठ्यातली मोठी महत्वकांक्षा पूर्ण होईल. साहस, पराक्रमात वाढ होईल.

**कर्क** : घराची समस्या दूर होईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे. वायफळ बडबड करू नका. व्यापार व्यवसायात प्रगती होईल.

सिंह : गुंतवणूकीच्या योजना फायदेशीर ठरतील. स्वाध्याय व ज्ञानात भर पडणार आहे. तणावाकडे लक्ष न देता कामे करा.

**कन्या** : प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप होईल ज्यामुळे आपली प्रगती होणार आहे. भावनेच्या आधारावर कोणताही निर्णय घेऊ नका. कायद्याचा निकाल आपल्या बाजूने लागण्याचा योग आहे.

तुळ : संकोच केल्यामुळे आपल्याला निष्कारण नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक कामात अडचणी निर्माण होतील.

**वृश्चिक** : अनोळखी व्यक्तिच्या सहकार्यामुळे आत्मविश्वासात वाढ होईल. खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करा.योजलेले कामे पार पडतील.

**धनु** : फायद्याच्या संधी मिळून कार्यक्षमता वाढल्यामुळे उत्साह वाढणार आहे.

**मकर** : मान सन्मान मिळण्याच्या संधी आल्यामुळे कार्यशील रहाल. वाद विवादापासून दूर रहा. व्यापारात वेळेवर निर्णय घेऊ न शकल्यामुळे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**कुंभ** : स्थावर संपत्तीबाबतचे वाद मिटल्यामुळे आनंदी रहाल. आरोग्याच्या तक्रारी दूर होतील. व्यापार व्यवसाय चांगला चालेल. काही निर्णय चूकीचे ठरण्याची शक्यता आहे.

**मीन** : जवळच्या व्यक्तिची भेट झाल्यामुळे आनंदी वातावरण निर्माण होईल. आधिकारी लोकांचे सहकार्य मिळेल. मुलांच्या बाबतीत चांगल्या बातम्या ऐकावयास मिळतील.

# मु. पो. १०; फुलराणी

**या पुस्तकाबाबत जरा गंमतच झाली. हे पुस्तक पहिल्यांदा हातात घेताना ते उलटे हातात घेतले गेले. त्या मलपृष्ठावर एक फोटो आहे. त्यात प्रसिद्ध साहित्यिक किंवा साहित्यिकांच्या पत्नी असणार असे वाटतच होते. त्यातच या पारधे कुटुंबीयांचा आणि साहित्य सहवासचा जुना संबंध आहे हे या कुटुंबीयांचे आधीचे पुस्तक वाचलेलं असल्याने आणि तसेही ऐकून माहीत होते. म्हणून कुतूहलाने तो फोटो पाहायला लागलो. अपेक्षेप्रमाणे त्या फोटोत डींरी उरींं होतीच. पण त्या क्षणापासून आत्तापर्यन्त त्या फोटोतील व्यक्तिंपेक्षा त्या फोटोचे कॅप्शन माझ्या जास्त लक्षात राहीले आहे. त्या व्यक्तींची नावे न देता या आजी, त्या बाई अशी नावे आहेत त्यात! हे एकदम भावले. माझे स्वतः चे लहानपण वाडा संस्कृतीत गेले आहे. आज आम्हाला तो वाडा सोडून ५४-५५ वर्षे झाली आहेत. त्यातली अनेक माणसे आता हे जगही सोडून गेली आहेत.**

--------------------------------

पण आजही ते दिवस ती माणसे यांचा कोणताही संदर्भ आला की त्या व्यक्तींची अधिकृत नावे तोंडात येत नाहीत ; येतात ती अमूक आजी, ती तमूक काकू, ती अमक्याची आई. अगदी असेच शीर्षक त्या मागच्या पानावरच्या फोटोचे आहे. त्या ओढीने पुस्तक एका झटक्यात सुलटे करून वाचायला सुरुवात केली. कारण या आई माझ्या आई सारख्याच असणार जिद्दशिखा याची पुस्तकाचा पहिला शब्द वाचण्याच्या आदीपासून खात्री होती. हे पुस्तक सुलटे करताना मनात आले की मराठी पुस्तकांच्या विश्वात आत्ता किंवा सध्या दोन आया गाजत आहेत. एक या पुस्तकातील आई आणि दुसरी देवा झिंजाड यांच्या एक चूल, दोन भाकरी पुस्तकातील आई! मनात आले. अशी आई आयुष्यात असली ना की आयुष्याचा विनोद होत नाही. (तसे आई हा विषय मराठी साहित्यात गाजण्याची परंपरा जुनी आहे. म्हणून सध्या म्हणाले साने गुरुजींच्या श्यामची आई) पुस्तकाचे शीर्षक वाचताना अडखळलो. या शीर्षकात दोन शब्द समूह आहेत. मु.पो. १० हा पहिला शब्द-समूह आणि फुलराणी हा एकच शब्द असणारा दुसरा शब्द समूह.

मी यातल्या कोणत्याच शब्द समूहामुळे अडखळलो नाही. मी थबकलो ते या दोन शब्द समूहाच्या मधे असणाऱ्या अर्ध विराम या चिन्हमुळे. हे दोन्ही शब्द समूह हे पारधी कुटुंबियांच्या निवासाचे पत्ते आहेत हे उघड आहेत. पण ते तेवढेच असते तर या दोन शब्द समूहाच्यामध्ये स्वल्पविराम आला असता अर्ध विराम नाही. व्याकरणाचे नियम असे सांगतात की, अर्धविराम हा पूर्वार्धाच्या पेक्षा वेगळा असणारा उत्तरार्ध दाखवायचा असतो तेंव्हा वाक्याच्या मध्ये येतो. मला नेहमी वाटते की. स्वल्पविराम दिशा, अनुक्रम सांगतात आणि अर्धविराम स्थिती! आईच्या जिद्दीमुळे पारधे कुटुंबीय आता मु.पो.१० इथे राहत नसतात तर पारधे आता फुलराणीमध्ये रहातात हा त्या अर्धविरामचा अर्थ आहे. मी जर या पुस्तकाचा लेखक-संपादक-प्रकाशक असतो ना तर हा अर्धविराम सगळ्यात जास्त प्रकाशित केला असता. हे माझ्या मनात आले आणि मला वाटले की या पुस्तकाच्या शीर्षकातला फुलराणी हा शब्द खूप सांकेतिक आहे. पु. ल. देशपांडे यांचे (खरं म्हणजे भक्ति बर्वे यांच्या त्या भूमिकेने अजरामर झालेले,) एक गाजलेले नाटक आहे ती फुलराणी ! हे पुस्तक आणि ते नाटक या दोन्हीत एक समान शब्द आहे. फुलराणी ! त्या नाटकात एक गाजलेले स्वगत आहे. फुलराणी प्रा. अशोक जागीरदारला उद्देशून म्हणते तुला शिकवेन चांगलाच धडा! ती फुलराणी त्या नाटकात हे म्हणते आणि तसे करते. नाटकात इथे प्रत्यक्ष आयुष्यात, ही फुलराणी जिचे, कागदोपत्री नाव आहे कोंडाबाई लक्ष्मण पारधे, ती साक्षात नियतीला म्हणते. तुला शिकवेन चांगलाच धडा! नुसते म्हणत नाही. प्रत्यक्षात करते. नाटकात म्हणत नाही; जित्या जागत्या आयुष्यात करते. त्यामुळे या पारधे कुटुंबियांच्या नुसत्या वास्तव्याच्या जागेचे नाव फुलराणी नाहीये; ते त्यांच्या आईच्या आयुष्याचे नाव आहे. फुलराणी हा पारधे यांचा निव्वळ भौगोलिक पत्ता नाही; तो त्यांचा भावनिक पत्ता आहे. हा या पुस्तकाच्या शिर्षकातील फुलराणी या शब्दाचा अर्थ आहे. मी जर या पुस्तकाचा लेखक-संपादक- प्रकाशक असतो तर मुखपृष्ठावर फुलराणी हा शब्द नक्कीच इतर दुसऱ्या कोणत्याही शब्दापेक्षा वेगळ्या ठळक आकर्षक रंगात, आकारात, स्वरूपात छापला असता. १६८ पाने आणि २५० रुपये किंमत असणारे, एप्रिल २०२४ मधे पहिली आवृत्ती प्रसिद्ध झालेले, कोंडाबाई लक्ष्मण पारधे यांचे कथन आणि सिद्धार्थ लक्ष्मण पारधे यांचे शब्दांकन असलेले, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या या पुस्तकाचे मुखपृष्ठ ओलांडून पुढें गेलो आणि पुन्हा गडबडलो. कारण मुखपृष्ठावर पुस्तकाचे नाव मु. पो. १०; फुलराणी एवढेच. पण या पहिल्या पानावर मु. पो. १०; फुलराणी याच्या जोडीला अजून एक शब्द येतो. साहित्य सहवास आणि त्याच्या खाली कंसात शब्द येतात कोंडाबाईची कालोनी. पहिल्यांदा हे मी पाहिले ना तेंव्हा हे काही मला जरासुद्धा आवडले नाही. म्हणले काय पुस्तकाची प्रूफे वगैरे तपासतात की नाही! पण मग स्वतःलाच दटावले की बाब्या, लक्षात घे या पुस्तकाचे प्रकाशक अशोक कोठावळे यांचे मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस आहे. ते अशी गडबड करणार नाहीत. मग मनात आले की हे म्हणजे आधीच्या बंगल्याचे नूतनीकरण करून नविन इमारत बांधल्या सारखें झाले. त्यामुळे १ मालक आणि १-२ भाडेकरू यांच्या जागी आता २०-२१ सदनिका धारक! जुन्या बंगल्यात असतात ते मालक आणि भाडेकरू. मु. पो. १०. नूतनीकरण झालेल्या इमारतीत असतात ते सदनिका धारक साहित्य सहवास. आपल्या दर्जात झालेली सुधारणा आपल्या स्वतःच्या मनावरही बिंबवावी लागते. म्हणून मग पहिल्या पानावर येते. मु. पो. १०; फुलराणी साहित्य सहवास. या दर्जात्मक सुधारणेचे आपण निव्वळ लाभार्थी असतो. त्याचे सारें श्रेय असते त्या व्यक्तीला! कारण नवीन इमारत हा आपला निव्वळ पत्ता असतो पण त्या व्यक्तीसाठी असते तिच्या संपूर्ण आयुष्याचे ध्येय जिद्दीने पूर्ण करण्याचे यालाच मिशन म्हणतात. त्यामुळे त्या प्रक्रियेला आपण मनोमन एक नाव देतो ते नाव असतें ती व्यक्ती ज्या शब्दाने सतत त्या प्रक्रियेचा उल्लेख करत असतें ती प्रक्रिया, ते उद्दिष्ट साध्य होईपर्यंत ती व्यक्ती स्वतःला आणि तिच्या घरातल्यांना सतत आठवण करून देत असते ते नाव घेत आणि मग आपणही नकळत उद्दीष्ट साध्य झालेली गोष्ट त्या गोष्टीचा अधिकृत नावाने ओळखत नाही तर ती कारणीभूत व्यक्ती ज्या नावाने त्या ध्येयाला ओळखते त्या नावाने ओळखत राहतो. आपल्या आयुष्यभर अगदी अशाच अर्थाने या पहिल्या पानावर शब्द येतो. कोंडाबाईची कालोनी! मला गंमत वाटली. कोंडाबाईची कालोनी हे शब्द पहिल्या पानावर कंसामधे येतात. आपण आपल्या व्यावसायिक-सामाजिक आयुष्यात आपले पासवर्ड सांभाळून ठेवतो तसे आहे हे ! कोंडाबाईची कालोनी हा या पुस्तकाचा, पारधे कुटुंबीय यांच्या आयुष्याचा पासवर्ड आहे आणि तो पासवर्ड सांभाळून ठेवायचा म्हणून तो कंसात छापला असावा या पुस्तकाच्या पहिल्या पानावर पण मी जर या पुस्तकाचा लेखक, संपादक, प्रकाशक असतो तर मी या पुस्तकांचे शीर्षक ठेवले असते कालोनी! कोंडाबाई यांच्या प्रक्रियेचे कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क असल्या सारखे! होय. मला माहीत आहे की सिद्धार्थ पारधे यांचे याआधी प्रसिद्ध / प्रकशित झालेल्या पुस्तकाचे नाव कॉलनी आहे. लक्षात घेऊया सिद्धार्थ पारधे यांची आहे ती कॉलनी आणि कोंडाबाई पारधे यांची आहे ती कालोनी कालोनी आणि कॉलनी हे एकमेकांचे कारणही आहेत आणि परिणामही! कदाचित, परिमाण ही! असे सगळे वाटण्याचे कारण म्हणजे नंतरच्या अख्ख्या पुस्तकाचा आशय आणि अभिव्यक्ती! याचे एक उदाहरण सांगतो. या पुस्तकाच्या निवेदनात एक ओळ आहे. कालोनीच्या नावापेक्षाही मोठी नावे असलेली लोकं ज्या कालोनीत राहतात त्या कालोनीला साहित्य सहवास म्हणतात. म्हणून तर पहिल्या पानावर कालोनी हा शब्द कंसात नसावा ना असे संपूर्ण पुस्तकभर वाचत गेले की जाणवतं की अज्ञान, दारिद्र्य यातून बाहेर पडणे हे कोंडाबाईंच्या जीवनाचे उद्दिष्ट होते. त्या साध्याला आणि प्रयत्नांचे साध्य, साधन, उद्दिष्ट इतकेच नव्हे तर असणारे अधिष्ठान होते. कालोनी म्हणून मी या लेखात आधी म्हणले की मी जर या पुस्तकाचा लेखक, संपादक, प्रकाशक असतो तर या पुस्तकाचे शीर्षक ठेवले असते कालोनी हे पुस्तक कोंडाबाईंचे निवेदन आहे अशा स्वरूपात येते. दि. बा. मोकाशी त्यांचे आनंदओवरी हे पुस्तक कसे कान्होबा निवेदन करत आहेत असे समजून लिहितात तसे आहे हे! या दोन्ही ठिकाणी ते फक्त निवेदन नाही. ते त्यांचे जगणे आहे. हे जगणे केवळ त्यांचे नाही तर साऱ्या पारधे कुटुंबीय यांचे आहे. एकापेक्षा जास्त व्यक्ती, एकापेक्षा जास्त वर्षे, एकापेक्षा जास्त अनुभव या सगळ्यांची ती कालोनी आहे. या पुस्तकात साहित्य सहवास मधे राहणाऱ्या अनेक साहित्यिकांचे विविध किस्से आहेत. त्यातल्या एका किश्यात कविवर्य विंदा करंदीकर यांनी कोंडाबाईंना सांगितलें. मी या अर्जावर सही जरूर करतो. पण या अर्जाचा सरकारवर कांहीही परिणाम होणार नाही. कारण दगडावर शाई उमटत नसते. इतर सगळ्या पेक्षा कोंडाबाई वेगळ्या होत्या. त्या दगड नव्हत्या. त्यावर शाई उमटत होती. त्यांची शाई त्यांच्या पुढच्या पिढीवर उमटत होती. कारण ती पुढची पिढीही दगड नव्हती. ती पुढची पिढी दगड होणार नाही याची पायाभरणी आणि निगराणी कोंडाबाईनी केली. म्हणून मु. पो. १० हे फुलराणी झालं. पुस्तकाची सुरुवात कोंडाबाईने होते. पण उत्तरार्ध मात्र सिद्धार्थ पारधे सांगतात. हा उत्तरार्ध या पुस्तकाचा भाग म्हणून न येता जर एक स्वतंत्र पुस्तक किंवा आधीच्या, कॉलनी चा पुढचा भाग म्हणून आला असता तर जास्त उचित झाले असते असे एक वाचक म्हणून नमूद करावेसे वाटते. कारण हे पुस्तक कोंडाबाई आणि फक्त कोंडाबाई असे व्हायला हवे होते असे राहून राहून वाटते. मी जर या पुस्तकाचा लेखक, संपादक, प्रकाशक असतो तर असा आग्रह नक्कीच धरला असता.

**- चंद्रशेखर टिळक, डोंबिवली**
**मो. ९८२०२९२३७६**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त




### करकंब येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये राज्य क्रीडा दिन साजरा

**करकंब, दि.१६ जानेवारी-**

भारताला १९५२ साली हेलसिंकी ऑलिंपिकमध्ये पहिले वैयक्तिक पदक जिंकून देत ज्यांनी भारताची मान जगात उंचावली ते महाराष्ट्राचे पैलवान खाशाबा जाधव यांचा १५ जानेवारी हा जन्मदिन त्यांच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्राचाही गौरव वाढला. त्यांच्या क्रीडाक्षेत्रातील योगदानामुळे त्यांचे नाव आजही अजरामर आहे. त्यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने खाशाबा जाधव यांचा जन्मदिन राज्य क्रीडादिन म्हणून घोषित केला. क्रीडा व युवक सेवा संचनालय,क्रीडा प्रबोधिनी,क्रीडा संकुले,प्राथमिक व माध्यमिक, शाळा, कनिष्ठ, वरिष्ठ, महाविद्यालये, क्रिडा संकुले, क्रिडासंस्था,मंडळे,अकादमी,क्रीडायोजनांचा लाभ घेणाऱ्या क्रीडा संस्थांमध्ये राज्य क्रीडादिन साजरा केला जातो. यावेळी खाशाबा जाधव यांच्या जीवनावर व्याख्याने, मॅरेथॉन, मार्गदर्शन शिबिरे, खेळाडूंचा गौरव, क्रीडा उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्या अनुषंगानेच न्यू इंग्लिश स्कूल करकंब येथे राज्यक्रीडा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी माजी जेष्ठ क्रिडाशिक्षक व मल्लखांब या खेळाचे राष्ट्रीय खेळाडू विलास जगताप यांच्या हस्ते स्व. पै. खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. क्रीडा शिक्षक विलास जगताप यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवून दिले. प्रशालेतील विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. याप्रसंगी संस्था अध्यक्ष संजीवकुमार म्हेत्रे, शाळा समिती अध्यक्ष प्रशांत वेळापूरकर, मुख्याध्यापिका संगीता करमाळकर, पर्यवेक्षिका शिंदे, शिक्षक, शिक्षिका, शिक्षिकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार चव्हाण सर यांनी मानले.



### विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत उतरले पाहिजे : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी-**

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय आणि उच्च माध्यमिक विद्यालयाचे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ नुकताच पार पडला. यावेळी क्रीडा, सांस्कृतिक व विविध कला क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या तसेच गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना यावेळी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आला.याप्रसंगी बोलताना संस्थेचे संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यानी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. सध्या स्पर्धा परीक्षेचे महत्त्व वाढले असून विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत उतरले पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी संस्थेच्या संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, संस्थेच्या सीईओ सौ रुपाली शहा, ज्युनियर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेमी विभागाचे प्रमुख दिगंबर जगताप पर्यवेक्षक सूर्यकांत रुगे आदी मान्यवर उपस्थित होते. पारितोषिक वितरणानंतर दैनंदिन जीवनात अभ्यास व इतर कामामध्ये व्यस्त असलेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये एक नवचैतन्य यावे यासाठी एक आगळावेगळा कार्यक्रम म्हणून शेला-पागोटे चा मजेशीर कार्यक्रम घेतला गेला. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांनी भरभरून दाद देत मनसोक्त आनंद लुटला. सूत्रसंचलन कल्पना स्वामी, निशिगंधा कोळी यानी केले तर सागर मठदेवरू यानी आभार मानले.



### माढा येथील आर्या स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन

**माढा, दि.१६ जानेवारी-**

विठ्ठल प्रतिष्ठान निमगाव ( टें) संचलित, आर्या पब्लिक स्कूल, माढा सीबीएसई मान्यताप्राप्त स्कूलच्या २०२४-२५ वार्षिक क्रीडा सप्ताहाचे उद्घाटन शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख पाहुणे केंद्रप्रमुख विजय काळे यांच्या हस्ते पार पडले. सर्वप्रथम ग्रामदेवता माढेश्वरी मंदिर या ठिकाणहून क्रीडा सप्ताहाची ज्योत स्कूलमध्ये आणण्यात आली. ज्योतीचे स्वागत करून हॉकीपटू मेजर ध्यानचंद व खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेचे पूजन करून, विद्यार्थ्यांचे कवायत संचालन घेण्यात आले. यावेळी रुबी, सफायर, यमराल्ड, टोपॅज असे विद्यार्थ्यांचे ग्रुप तयार करण्यात आलेले आहेत. सदर क्रीडा सप्ताहामध्ये, १०० मीटर रनिंग, २०० मीटर, रनिंग ,४०० मीटर रनिंग, रिले, गोळा फेक, भालाफेक, थाळीफेक, लांब उडी, उंच उडी, हॉलीबॉल, कबड्डी, डिस्को थ्रो, लिंबू चमचा, रस्सीखेच, इत्यादी क्रीडा प्रकार होणार आहेत. यामध्ये तीनशेहून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग असणार आहे. यावेळी आर्या पब्लिक स्कूलचे प्राचार्य प्रा. सागर थोरात, प्राचार्य सागर जाडकर ,अरूण माने, तुषार तोडकरी, क्रीडा शिक्षक शुभम पुरवत सर इत्यादी उपस्थित होते. क्रीडा सप्ताह पार पाडण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत. सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रेरणा राऊत, यशश्री आरे, साजिरी क्षिरसागर, आरोही कदम यांनी केले तर आभार दिव्या धायगुडे हिने मानले.

# महेश जमदाडेंचा सायकलवरून १० हजार किमी प्रवास

## एका दिवसात १०० ते १२५ किमीचा प्रवास; संत सावता माळी ट्रस्ट, समाजाच्या वतीने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. १६ जानेवारी-**

येथील महेश जमदाडे (सध्या नोकरी निमित्त नाशिक) याने ११५ दिवसात १० हजार २९० किमी चा प्रवास सायकलवरून केला असून भिमाशंकर येथे या सायकल प्रवासाची सांगता करणार असल्याचे त्यांनी सांगितले. माळशिरस शहरात प्रवेश केल्यानंतर श्री संत सावता माळी ट्रस्ट व समाजाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी अध्यक्ष अनिल मस्के, शैला गायकवाड, प्रभाकर पिसे,राजाभाऊ पिसे, सचिन केमकर, कुमार जमदाडे यांच्यासह महिला व पुरुष उपस्थित होते. महेश जमदाडे हे कृषी पदवीधर असून एका खाजगी कंपनीत काम करतात. त्यांना लहानपणा पासूनच सायकलवरून प्रवास करण्याचा छंद आहे.यापूर्वी त्यांनी अमरनाथ वैष्णवीदेवी, शेगाव याठिकाणी सायकलवरून यात्रा केल्या आहेत. १२ ज्योतिर्लिंग व ४ धाम प्रवासाची सुरुवात १५ सप्टेंबर २०२४ रोजी नाशिक पंचवटी येथे केली, इच्छा शक्ती व भक्तीच्या जोरावर हा प्रवास सुरु केला. दररोज १०० ते १२५ किमी चा प्रवास करावयाचा हे ध्येय ठेवले होते त्याप्रमाणे तेरा राज्यातून व नेपाळ या देशातून प्रवास केला.

> हमारा देश हमारा नाम, एक भारत श्रेष्ठ भारत राष्ट्रीय एकता अभियान हा संदेश घेऊन मी प्रवास केला असून, मला प्रत्येक ठिकाणी नागरिकांचे सहकार्य लाभले. एवढ्या प्रवासात नेपाळ देशातील जंगलातून केलेला प्रवास विस्मरणीय असून या प्रवासाचा उद्देश सर्वांचे कल्याण व्हावे हाच आहे. मला माझ्या कुटुंबाचे मोलाचे सहकार्य लाभले. माळशिरसकरांनी माझा केलेल्या सन्मानाने भारावून गेलो आहे.
>
> **-महेश जमदाडे, सायकलस्वार, माळशिरस**



### बारा ज्योतिर्लिंग, चार धामांचे घेतले दर्शन

सोमनाथ (गुजरात), मल्लिकार्जुन (आंध्र प्रदेश), महाकालेश्वर (मध्य प्रदेश), ओंकारेश्वर (मध्य प्रदेश) केदारनाथ (उत्तराखंड), विश्वनाथ (उत्तर प्रदेश), त्र्यंबकेश्वर (महाराष्ट्र) वैद्यनाथ (झारखंड), नागेश्वर (गुजरात), रामेश्वर (तमिलनाडू), घुश्मेश्वर (महाराष्ट्र), भीमाशंकर (महाराष्ट्र), चार धाम, पुरी, द्वारका, बद्रीनाथ, रामेश्वरम येथे जाऊन त्यांनी दर्शन घेतले.

### असा केला प्रवास

नाशिक ते हरिद्वार (१४१५ किमी), हरिद्वार ते गोरखपूर (७४६ किमी), गोरखपूर ते काटमांडू (३७० किमी), काटमांडू ते गोपाळगंज (२३९ किमी), गोपाळगंज ते देवघर (३८२ किमी), देवघर ते पुरी (६८५ किमी), पुरी ते वाराणशी (९२१ किमी), वाराणशी ते उजैन (९०२ किमी), उजैन ते ओंकारेश्वर (११४१ किमी), ओंकार्श्वर ते द्वारका (७८० किमी), द्वारका ते सोमनाथ (२५० किमी), सोमनाथ ते घ्रुंश्नेश्वर (७४२ किमी), घ्रुंश्नेश्वर ते परळी वैजिनाथ (२४८ किमी), परळी वैजिनाथ ते औंढा नागनाथ (११९ किमी). औंढा नागनाथ ते श्रीशैलम (५६२ किमी), श्रीशैलम ते रामेश्वर (९५१ किमी), रामेश्वर ते पंढरपूर (११७२ किमी), पंढरपूर ते माळशिरस (५२ किमी) असा प्रवास पूर्ण केला असून माळशिरस ते भिमाशंकर हा २६१ किमी प्रवास करून या सायकल यात्रेची सांगता करणार असल्याचे त्यांनी सांगितले



## शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षेत शंकरलिंग प्रशालेचे यश

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. १६ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्यकला शिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत दरवर्षी एलिमेंटरी व इंटरमिजिएट या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा घेतल्या जातात. २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात वळसंगच्या श्री शंकरलिंग प्रशालेतून एलिमेंटरी ग्रेड परीक्षेस २८ विद्यार्थी तर इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेस १९ विद्यार्थी बसले होते. सदर दोन्ही परीक्षांचा निकाल १०० टक्के निकाल लागला आहे.

एलिमेंटरी ग्रेड परीक्षेस बसलेल्या २८ विद्यार्थ्यांपैकी ६ विद्यार्थ्यांना ए श्रेणी, १६ विद्यार्थ्यांना बी श्रेणी तर ६ विद्यार्थ्यांना 'सी' श्रेणी प्राप्त झाले आहे. तसेच इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेस बसलेल्या १९ विद्यार्थ्यांपैकी ११ विद्यार्थ्यांना ए श्रेणी, ५ विद्यार्थ्यांना बी श्रेणी तर ३ विद्यार्थ्यांना सी श्रेणी प्राप्त झाले आहे. एसएससी बोर्ड परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेचा लाभ मिळणार आहे. या परीक्षेत ए श्रेणी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना ७ गुण, बी श्रेणी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना ५ गुण तर सी श्रेणी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना ३ गुण असे वाढीव गुण मिळणार आहेत.

दोन्ही परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांना कला विभागातील वीरेश थळंगे, अजय माणकोजी यांच्यासह संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, शैला निंबाळ, विजय प्याटी, बसवराज दुधगी, गंगाधर बिराजदार, स्नेहा हळगोदे, शिवराज अष्टगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी व सेवक कट्टेप्पा कोळी यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, संचालक विश्वनाथ थळंगे, प्रकाश दुधगी, शिवशरण प्याटी, रमेश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, संजय दुधगी, मुख्याध्यापक विरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

### पिलीव येथे दलितवस्ती योजनेतील विहीर, पाईपलाईनचे भूमिपूजन

**पिलीव, दि. १६ जानेवारी -**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथे ग्राम पंचायत स्तर पंधराव्या वित्त आयोगातुन २०२३-२४ यावर्षी मंजुर असणाऱ्या सातपुतेवस्ती व करडेवस्ती या भागाला पाणीपुरवठा करण्यासाठी नवीन विहीर व पाईपलाईन अंदाजे ७,४०,००० रुपये एवढ्या कामाचा शुभारंभ करण्यात आला.

जिल्हा परिषदेचे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संग्रामसिंह जहागिरदार, ग्रामपंचायतीचे प्रशासक अनिल सावळजकर, ग्रामविकास अधिकारी विलास बाबर, माजी लोकनियुक्त सरपंच नितीन मोहिते, माजी सरपंच संग्राम पाटील, माजी उपसरपंच संजय आर्वे, माजी ग्रामपंचायत सदस्य अविनाश जेऊरकर, राजेंद्र जामदार, सुषमाताई जामदार, जिवन गुरव, तंटामुक्तीचे अध्यक्ष महादेव जरग, मोहन करांडे, वकील काझी, लक्ष्मण भैस, स्वप्नील पाटील, शयाम उपाध्ये, तानाजी लोखंडे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ करण्यात आला. या योजनेमुळे करडेवस्ती व सातपुते वस्ती या भागाला नियमीत व सुरळीतपणे पाणीपुरवठा होणार आहे.

## इंटरमिजिएट, एलिमेंटरी परीक्षेत 'जिव्हाळा'चे यश

### शंभर टक्के निकालाची परंपरा यंदाही कायम

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि. १६ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य कला संचालनालय मुंबई यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला इंटरमिजिएट व इलेमेंटरी परीक्षेत जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

शासकीय इंटरमिजिएट परीक्षेत एकूण २१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यापैकी अ श्रेणीमध्ये ८ विद्यार्थी, ब श्रेणीमध्ये ६ तर क श्रेणीमध्ये ७ विद्यार्थ्यांनी यश मिळवले. एलिमेंट्री परीक्षेत एकूण ३७ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यापैकी ४ विद्यार्थ्यांनी अ श्रेणीमध्ये, २१ विद्यार्थ्यांनी ब श्रेणीमध्ये तर १२ विद्यार्थ्यांनी क श्रेणीमध्ये स्थान मिळवले. अ श्रेणी-जयश्री गोरे, सायली शिंदे, सई टोणपे, वैष्णवी गायकवाड, समीक्षा वाळूजकर, वैदेही शेंडगे, निरजा शहा, साईराज वायचळ, राधिका चोपडे, ओम गायकवाड, सरस्वती भगत, इच्छा सोळंकी. ब श्रेणी-गौरी रेडे पाटील, राधिका सुतार, भक्ती खांडे, कार्तिकी सुतार, चैतन्य गोपने, राजलक्ष्मी भगत, आर्यन खांडेकर, आशिया दाळवाले, कल्याणी चव्हाण, समर्थ पाटील, आशुतोष अनभुले, ओमराज अनभुले, रोहन हजारे, विराज क्षीरसागर, प्रणव क्षीरसागर, सुयश लोंढे, वृषाली गोरे, साक्षी शिंदे, स्वराली कदम, सई पाटील, अस्मिता कदम, गायत्री गोरे, श्रावणी लोंढे, तृणाली गोरे, प्रतिक्षा गोरे, सिद्धी थोरात, सार्थक हजारे. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे, गटशिक्षणाधिकारी विकास यादव, प्रशासनाधिकारी शाहू सतपाल, केंद्र समन्वयक लक्ष्मण कारंडे आदींनी अभिनंदन केले.

साधना झोळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे यांचे मार्गदर्शन लाभले.

## करकंब येथे मकर संक्रांत सण उत्साहात

### माता, भगिनींकडून लहान बालकांचे बोरन्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१६ जानेवारी-**

नवीन वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांत, हळदी कुंकाचे कार्यक्रम, तिळगुळ वाटून एकमेकांना शुभेच्छा देणे, पतंग उत्सव अशा विविध माध्यमातून मकरसंक्रांत हा सण साजरा केला जातो. मकरसंक्रांत हा हिंदू संस्कृतीतील अत्यंत महत्त्वाचा सण आहे.या दिवशी सूर्य, धनु राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. त्यानंतर ऋतुबदलाचा काळ सुरु होतो. याबरोबरच आणखीन एक उत्सव साजरा केला जातो तो म्हणजे बोरन्हान बोरन्हान संस्कार करण्यामागे लहान मुलांचे आरोग्य चांगले रहावे, रोगप्रतिकारक शक्ती वाढावी हा हेतू असतो. संक्रांतिनिमित्त बोरन्हान करण्याची जुनी प्रथा आहे. माता भगिनींकडून लहान बालकांच्या बोरन्हानाचा कार्यक्रम पार पडला.

#### बोरन्हाणाची अख्यायिका

बोरन्हान का करावे? याविषयी एक आख्यायिका आहे.करी नावाचा एक राक्षस होता त्या करी नावाच्या राक्षसाची वाईट दृष्टी, वाईट विचार भगवान श्रीकृष्णांवर पडू नयेत यासाठी सर्वप्रथम भगवान श्रीकृष्ण लहान असताना भगवान श्रीकृष्णांना बोरन्हान घालण्यात आले.तेव्हापासून लहान बालकांना बोरन्हान घालण्यात येते. लहान बालक हे भगवान श्रीकृष्णांचे स्वरूपच आहे.त्यामुळे या लहान बालकांवरती करी राक्षसाचे वाईट विचार आणि वाईट दृष्टी पडू नये म्हणून लहान बालकांवर बोरन्हान केले जाते.

#### बोरन्हाण करण्यामागचे शास्त्रीय कारण

या कालावधीत वातावरणात अनेक बदल होत असताना लहान मुलांना या ऋतूची बाधा होऊ नये याचा विचार करून या काळात मिळणारी फळे जसे बोर,ऊस,हरभरे,भुईमुगाच्या शेंगा यांचे सेवन मुलांनी केल्यास त्यांचे शरीर सुदृढ होण्यास मदत होते,त्यांची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते.या युद्देशाने हा उत्सव साजरा केला जातो.




श्वेता व रणजीत व्हावळ यांच्या स्वराज या बालकाची बोरन्हान प्रसंगी भगवान श्रीकृष्णांच्या रूपातील मनमोहक वेशभूषा.

# संत भगवान बाबांची पुण्यतिथी साजरी

## टाळ-मृदंगाच्या गजराने अणदूरनगरी दुमदुमली

**तभा वृत्तसेवा,**
**अणदूर, दि. १६ जानेवारी-**

येथील भगवान बाबा प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी प.पू.ह.भ.प.वै. राजयोगी संत भगवानबाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये, मंगळवार (दि.१४) रोजी श्री.ह.भ.प.अशोक महाराज इलग शास्त्री (बोधेगाव, अहिल्यानगर) यांचे कीर्तन , तर बुधवार (दि.१५) रोजी श्री.ह.भ.प.युवा कीर्तनकार प्रशांत महाराज नांदे आळंदी देवाची यांचे काल्याचे कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते.



यावेळी जवळपास पन्नास बालकलाकारांनी टाळ व मृदुंगाच्या गजराने अणदूर नगरी दुमदुमून सोडली. यावेळी, मुख्य कीर्तनकार ह.भ.प.अशोक महाराज इगल शास्त्री यांनी त्यांच्या किर्तनाने उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. किर्तन कार्यक्रमाच्या सुरुवातीला ह भ प राजयोगी संत भगवान बाबा,श्री.ह.भ.प.संत वामनभाऊ महाराज आणि स्व. गोपीनाथजी मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर समस्त समाजबांधव व ग्रामस्थांच्या वतीने श्री.ह.भ.प.अशोक महाराज इलग शास्त्री (बोधेगाव, अहिल्यानगर) यांचा वै. हभप भगवान बाबा प्रतिष्ठान च्या वतीने सन्मान करण्यात आला. बुधवार दि १५ जानेवारी रोजी अणदूर गावामधून बाल वारकरी, समाजबांधव व किर्तनप्रेमींच्या सहभागाने टाळ व मृदंगासह पालखी मिरवणूकही काढण्यात आली. यावेळी कै. वत्सलाबाई धनराज घुगे यांच्या स्मरणार्थ धनराज बाबुराव घुगे यांच्या वतीने महाप्रसाद देऊन समारोप करण्यात आला. दि.१४ व १५ जानेवारी रोजीच्या सर्व धार्मिक कार्यक्रमांचा अणदूर येथील समाजबांधव, भगवान बाबा प्रतिष्ठान समितीचे पदाधिकारी, सदस्य व ग्रामस्थानी महाप्रसादाच्या लाभ घेतला.

### एलिमेंटरी, इंटरमिजिएट ग्रेड परीक्षेत वखारिया विद्यालयाचे ६२ विद्यार्थी उत्तीर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १६ जानेवारी-**

एलिमेंट्री व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत उपकेंद्र दुमालाच्या वखारिया विद्यालयाने यश संपादन केले. एलिमेंट्री परीक्षेचा निकाल ९१.०५ टक्के निकाल लागला असून, या परीक्षेत ए व बी श्रेणीमध्ये ११ विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर इंटरमिजिएट परीक्षा निकाल ९५ टक्के लागला. या परीक्षेत ए व बी श्रेणीमध्ये १६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. वरील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना चित्रकला विभाग प्रमुख महाले सर, वैद्य सर व शिंदे व्ही.व्ही. सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी.वाय.यादव, उपाध्यक्ष एन.एन. जगदाळे, सचिव पी.टी.पाटील, सहसचिव देबडवार सर 'खजिनदार शितोळे बापू, शाळा व्यवस्थापन समितीचे चेअरमन डॉ. बुरगुटे कार्यकारिणी व संस्था सदस्य,व मुख्याध्यापक श्री दयानंद रेवडकर यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## कुरनूर येथे राजमाता जिजाऊ जयंती उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी-**

अक्कलकोट तालुक्यातील कुरनूर येथे राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊ जयंती मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी आदर्श पुरस्काराने सन्मानित करणे, ५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करणे, तीन वर्षासाठी विद्यार्थी दत्तक घेतले जाते अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष विश्वजीत



बिराजदार यांनी दिली. सुरेश माने यांनी मनोगत व्यक्त केले. आदर्श शिक्षक सुरेश माने यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला. यावेळी विश्वजीत बिराजदार, समाधान मोरे, केदार मोरे, परशुराम बेडगे, दिगंबर जगताप, अशोक काळे, मनोज सुरवसे, रवी कोळी, श्रीकांत चेंडके, आकाश सुरवसे, किरण मोरे, विश्वजीत बिराजदार, नारायण निंबाळकर, समाधान मोरे, केदार मोरे, आदेश सुरवसे, शुभम मोरे उपस्थित होते. सूत्रसंचालन दिगंबर जगताप तर बाबासाहेब चौधरी यांनी आभार मानले.



## संक्षिप्त वृत्त...



### तुमच्यामुळेच मिळाले कुणबी प्रमाणपत्र

**मोडनिंब, दि. १६ जानेवारी-**

> मराठा बांधवांनी व्यक्त केल्या जरांगे-पाटलांकडे भावना...

पाटील, तुम्ही सुरू केलेल्या मराठा आरक्षण आंदोलनामुळेच संपूर्ण राज्यात जनजागृती झाली असून, गावोगावी कुणबी नोंदी सापडत आहेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत, कुणबी प्रमाणपत्रही मिळू लागले आहे ही सर्व आपलीच देण आहे, अशी भावना माढा तालुक्यातील सकल मराठा समाजाच्या वतीने तालुकाध्यक्ष नीलेश देशमुख यांनी मनोज जरांगे-पाटील यांच्याकडे आंतरवली सराटीत व्यक्त केली. माढा तालुक्यातील ११७ गावांत तब्बल १९,४३३ कुणबी नोंदी सापडल्या आहेत. त्यापैकी ८३९६ लोकांना कुणबी प्रमाणपत्र वाटपही करण्यात आले आहे. या वेळी मराठा सेवा संघ माढा तालुक्याच्या वतीने माजी जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटील, कार्याध्यक्ष राम मिटकल यांनी भेट घेतली. माढा तालुक्यातील अनेक बांधवांना आपण स्वतः कुणबी असल्याची कल्पनाही नव्हती, मात्र मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनानंतर शासकीय नोंदी तपासली असता अनेक लोकांच्या कुणबी नोंदी सापडल्या आहेत.या सर्व नोंदी सापडण्यामागे मनोज जरांगे-पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे, असे निलेश देशमुख यांनी सांगितले.

### कोन्हाळीच्या उपसरपंचावरील अविश्वास प्रस्ताव नामंजूर

**अक्कलकोट, दि. १६ जानेवारी-**

तालुक्यातील कोन्हाळी ग्रामपंचायतचे उपसरपंच प्रतिका संतोष बनसोडे यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव नामंजूर करून त्यांना कायम ठेवण्यात आले. विहित सदस्य संख्या नसल्याने अविश्वास ठराव ५ विरोधात चारने नामंजूर झाला. सरपंच चिदानंद उण्णद यांच्या गटाचा अविश्वास प्रस्ताव फेटाळून लावला. उपसरपंच प्रतिका बनसोडे यांच्याबाजूने दिलीप गायकवाड, नागुबाई पाटील, सुलोचना बनसोडे आणि प्रतिका बनसोडे असे एकूण ४ मतदान झाले. सदस्य संख्या दहा असल्याने अविश्वास ठरावासाठी ३/४ म्हणजे आठ सदस्यांची गरज होती तर विरोधी गटाच्या म्हणजेच सरपंच चिदानंद उण्णद यांच्या बाजूने उर्वरित ५ मतदान झाले. विहित सदस्य संख्या नसल्याने अविश्वास ठराव ५ विरोधात चारने नामंजूर झाला. चिदानंद उण्णद यांच्या गटाचा अविश्वास प्रस्ताव फेटाळून लावला. उपसरपंच प्रतिका संतोष बनसोडे यांच्या विरोधातील अविश्वास प्रस्ताव नामंजूर करून विद्यमान उपसरपंच यांना कायम करण्यात आले.यावेळी ग्रामविकास अधिकारी मारूती सुरवसे उपस्थित होते.

### भोसरेत झालेल्या अपघातात तरुण ठार

**कुर्डूवाडी, दि. १६ जानेवारी-**

माढा रोडवर भोसरे गावच्या हद्दील अनेक वर्षापासून रखडलेल्या पुलाचे काम चालू असून त्याकामासाठी कचखडी टाकलेला ढिगारा न दिसल्याने दुचाकीवरील तरुण थेट ढिगाऱ्यावर गेला आणि पडला. या अपघातात तरूणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी १४ रोजी रा. १० वा. सुमारास घडली. संग्राम दत्तात्रय वरपे (वय २९, रा. निमगांव टें, ता. माढा) असे अपघातात मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे.याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की संग्राम दत्तात्रय वरपे हा निमगांवहून कुर्डुवाडीमार्गे



माढ्याकडे सासुरवाडीला मोटारसायकल (क्र. एम. एच. ४५/एच. ४०५५) वरुन जात असताना माढा रस्त्यावर भोसरे शिवारात अनेक वर्षापासून अर्धवट असलेल्या पुलाचे काम सध्या सुरु असून या पुलासाठी म्हणून कचखडी आणून टाकण्यात आली होती. सदर कचखडीचा ढिगारा असलेल्या ठिकाणी कोणताही सूचना फलक लावलेला नसल्याने मोटारसायकलवरील संग्राम दत्तात्रय वरपे याला या ढिगाऱ्याचा अंदाज न आल्याने मोटारसायकलसह ढिगाऱ्यावर जाऊन पडला. यामध्ये तो गंभीर जखमी होऊन जागीच मयत झाला. याबाबत निलेश दत्तात्रय वरपे यांनी कुर्डुवाडी पोलिसांत फिर्याद दाखल केली आहे. याचा तपास पो. ह. हनुमंत जाधव हे करीत आहेत.



### सांगोल्यात 'माता बालक'चा हळदी-कुंकू कार्यक्रम उत्साहात

**सांगोला, दि. १६ जानेवारी-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र प्रांत सेवा विभागातर्फे सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने मकर संक्रांत या सणाचे औचित्य साधून माता बालक उत्कर्ष प्रतिष्ठान, सांगोला या संस्थेतर्फे बुधवार दि.१५ जानेवारी रोजी इंदिरानगर, सांगोला येथे हळदीकुंकवाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी उत्साहाने सर्व महिला सहभागी झाल्या होत्या. याप्रसंगी तिळगुळ एकमेकींना देण्याचे महत्त्व सांगून वेगवेगळ्या निमित्ताने आपण भेटत राहूया असे सह विचाराने ठरवून कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी संस्थेच्या पदाधिकारी संसहिता कुलकर्णी, कार्यकर्त्या अनुराधा कुलकर्णी, मंगल कुलकर्णी उपस्थित होत्या. महिलांना हळदी-कुंकू देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मुंगशीतील कृषीशक्ती महिला गटाने

# २२ एकरातील कांद्यातून घेतले ६० लाखांचे उत्पन्न

### पानी फाऊंडेशन फार्मर कपच्या प्रशिक्षणाचे फलित; इर्जिक पद्धतीमुळे वाचविली ५ लाख ७२ हजारांची मजुरी

**तभा वृत्तसेवा । रामदास पवार**
**वैराग, दि. १६ जानेवारी-**

पानी फांऊडेशन फार्मर कपचे प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर बार्शी तालुक्यातील मुंगशी ( आर) येथील ११ महिलांनी एकत्रीत येत पानी फाऊंडेशनच्या माध्यमातून कृषीशक्ती महिला शेतकरी गटाची स्थापना केली. या ११ महिलांनी प्रत्येकी दोन एकरावर कांद्याचे पीक घेण्याचे नियोजन करून त्यांनी २२ एकरावर कांदा पिकाचे उत्पादन घेण्याचे ठरविले. २२ एकरातून महिलांनी कांदा पिकाचे सुमारे ६० लाखाचे उत्पन्न घेतले असून इर्जिक पद्धतीच्या कामामुळे ५ लाख ७२ हजार रुपयांची मजूरीची बचत झाल्याचे महिला शेतकऱ्यानी सांगितले.



कृषी शक्ती महिला शेतकरी गटाने सुरुवातीपासूनच बी बियाणे, खते एकत्रीतरित्या खरेदी केली त्यांनी शेतीची सर्व कामे इर्जिक पद्धतीने (सावड) करण्याचे ठरविले होते. त्यानुसार त्यांनी कांद्याचे रोप तयार करण्यापासून ते कांदा काढणी पर्यंतची सर्व कामे इर्जिक पद्धतीने केली गेली. कांदा लागवड, खुरपणी, काढणी, आणि चिरणे ही कामे एकत्रीतपणे केल्याने मजुरांचा तुटवडा जाणवला नाही. तसेच कामे वेळीत झाली. सर्व कामे एकत्रित केल्याने मुरीची बचत झाली. पाणी फाउंडेशनच्या एसओपीचा म्हणजेच शेतीच्या उत्तम पद्धतीचा वापर करून आदर्श रोपवाटिका तयार केली. बेडवर कांदा लागवड केली निमार्क दशपर्णी अर्कचा वापर केला तसेच बायोमिक्सचादेखील वापर केला. वेळोवेळी दर शनिवारी शेतीशाळा जॉईन करून विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांकडून ज्ञान घेऊन शेती केली. त्यामुळे विक्रमी उत्पादन निघाले आहे. इर्जिक पध्दतीमुळे कृषी शक्ती महिला शेतकरी गटाची कांदा पिकाची लागणीपासून ते काढणीपर्यंत सुमारे सहा लाख रूपयांची मजुरी वाचली आहे. पाणी फाऊंडेशनचे बार्शी तालुका समन्वयक नितीन आतकरे, ओम कुर्ड यांच्या मार्गदर्शनाखाली मुंगशी येथील ११ महिलांनी एकत्र येत कृषी शक्ती महिला शेतकरी गट स्थापन केला. सुरुवातीपासून त्यांनी प्रत्येक कामे इर्जिक पद्धतीने करण्याचे ठरविले होते. त्यांनी एकत्रीत कांद्याचे बी, खते, औषधे कमी दराने खरेदी करून पैशाची बचत केली. प्रत्येक महिलेने दोन एकर क्षेत्रावर कांद्यांची लागवड एकत्रीत केल्यामुळे पैशाची बचत झाली. कांदा फवारणीसाठी रासायनिक औषधे न फवारता इर्जिक पध्दतीने दशपर्णी अर्क, निमार्क, जिवामृत तयार करून त्यांच्या फवारण्या केल्या गेल्या. त्यामुळे रासायनिक औषधांचे पैसे वाचले. कांद्याची खुरपणीची कामे एकत्रीतपणे केल्याने कामे वेळेवर झाली. महिला शेतकरी गटामध्ये पुष्पा कुरुंद, गीता कुरुंद, लक्ष्मी कुरूंद, अमृता कुरूंद, सविता साठे, सिमा कुरुंद, शर्मिला कुरुंद, राहीबाई साठे, संगिता शिंदे, सुलोचना साठे, प्रगती कुरुंद यांचा समावेश आहे.

> फार्मर कपमुळे महिला शेतकरी एकत्र येत असून गट शेती करणे फायद्याची ठरत असून वेळ, पैसा याची बचत होत आहे.
>
> **-लक्ष्मी कुरूंद,**
> मुंगशी (आर), महिला शेतकरी

> फार्मर कपच्या स्पर्धेमुळे महिलांची एकजूट होत असून त्यांच्यामध्ये प्रेम, जिव्हाळा, आपुलकी निर्माण होत असून एकत्रिपणे इर्जिक पद्धतीने कामे केल्यामुळे मजुरांची टंचाई भासली नसून वेळेवर कामे झाल्याने शेतीचे उत्पन्न वाढले तसेच बाहेर जाणारी मजुरी वाचल्याने गटामुळे शेती फायद्याची ठरू लागली आहे.
>
> **-गीता कुरुंद**

## सहकार महर्षी गणपतराव साठे यांची शोभायात्रा

### चार दिवसीय माढा महोत्सवाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि. १६ जानेवारी-**

जिल्ह्याचे पहिले सहकार महर्षी गणपतराव साठे यांच्या १३७ व्या जयंती निमित्ताने आयोजित माढा महोत्सवाला शोभायात्रेने सुरूवात झाली. चार दिवसांच्या महोत्सवात विविध कार्यक्रम होणार आहेत.



सकाळी नऊ वाजता गणपतराव साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून शोभायात्रेचा प्रारंभ झाला. यावेळी माजी आ. अॅड. धनाजीराव साठे, नगराध्यक्षा अॅड. मिनलताई साठे, दादासाहेब साठे, वेदांत साठे, उपनगराध्यक्षा कल्पनाताई जगदाळे, मुख्याध्यापक नागेश खेडकर यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते. या शोभायात्रेत माढा आणि पंचक्रोशीतील प्राथमिक आणि माध्यमिक शाळांनी सहभाग घेतला होता. या शोभायात्रेत ऐतिहासिक देखावे, समाज प्रबोधनात्मक देखावे तर प्रचलित समस्या मांडण्याचा आणि त्यावरील उपाययोजना यावरचे सजीव देखावे सादर करण्यात आले होते. या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण ठरले ते म्हणजे मुलींचे लेझीम आणि झांझ पथक या पथकातील मुलींनी शहरातील चौकाचौकात आपल्या कलांचा आविष्कार सादर केला. या शोभायात्रेत राष्ट्रमाता जिजाऊ, झाशीची राणी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या भूमिका करणाऱ्या मुली घोड्यावर स्वार झाल्या होत्या तर अग्नी ५ या क्षेपणास्त्राची प्रतिकृती या शोभायात्रेचे आकर्षण ठरले होते.

> **विद्यार्थी सादर करणार आज कलाविष्कार**
>
> शुक्रवारी शहर आणि परिसरातील विविध शाळांचे विद्यार्थी आपल्या कलेचा आविष्कार विविध गुणदर्शनाचे कार्यक्रमात सादर करणार आहेत. ही शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी नितीन साठे, ताना साठे, विकास साठे, रमेश शहाणे संदीप साठे, अरूण कदम, सुहास जोशी, प्रवीण घाडगे, समाधान लटके, विजय साठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## बेकायदा मुरुम उपसा; दोन लाखांचा ठोठावला दंड

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. १६ जानेवारी-**

हिवरगाव परिसरातून अवैध मुरुम उपसा करुन वाहतूक करताना महसूल पथकाने टिपर पकडून त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान २ लाख २० हजार ४०० रुपये इतका दंड आकारला असून या कारवाईमुळे अवैध मुरुम वाहतूक व वाळू वाहतूक करणार्या वाहन चालकामध्ये उडाली आहे.



हिवरगाव परिसरात अवैध मुरुम उपसा होत असल्याची गोपनीय माहिती तहसिलदार मदन जाधव यांना मिळताच त्यांनी एक पथक पाठवून शहनिशा केली असता एम.एच.१३ सी.यू.१५४० क्रमांकाचा टिपर ४ ब्रास अवैधरित्या मुरुम भरुन जात असताना शिंदे वस्ती जवळ पथकाला मिळून आला. पथकाने तात्काळ हा टिपर ताब्यात घेवून तहसिल कार्यालयाच्या प्रांगणात आणून लावला असून या टिपरला गौण खनिज विभागाने २ लाख २० हजार ४०० रुपये इतका दंड ठोठावला आहे.

## शेतकरी ते ग्राहक संकल्पनेवर तुळशी आठवडा बाजाराला सुरुवात

### बाजारात लाखोंची उलाढाल

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १६ जानेवारी-**

शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेवर आधारित तुळशी (ता. माढा) येथे आठवडी बाजाराचे उद्घाटन झाले. तुळशी आणि परिसरातील शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याला भाव मिळावा, तसेच ग्राहकांना ताज्या भाजीपाल्यासह इतर वस्तू घराजवळ स्वस्त भावांत मिळाव्यात, या हेतूने दर गुरुवारी आठवडी बाजाराची सुरुवात करण्यात आली असल्याचे सरपंच डॉ. शरद मोरे यांनी सांगितले.

या आठवडे बाजाराचे उद्घाटन सरपंच मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. परिसरातील शेतकऱ्यांच्या मालाला योग्य भाव व ग्राहकांना फायदा व्हावा, या उद्देशाने आठवडा बाजार सुरू करण्यात आल्याचे सांगण्यात आले. पहिल्याच बाजार दिवशी भाजीपाला उत्पादक किराणा भेळ भत्ता विक्रेत्यांनी मोठ्या प्रमाणात दुकाने थाटली होती प्रथमच गावात बाजार यशस्वीरित्या झाल्याने नागरिकांकडून कौतुक करण्यात आले. भाजीपाल्यासह इतर वस्तूंसाठी स्थानिकांसह परिसरातील गावातील नागरिकांना सुमारे पाच किलोमीटर पायपीट करावी लागत होती,



> तुळशी येथे शेतकरी ते ग्राहक या संकल्पनेवर आधारित आठवडा बाजारामुळे ग्राहकांना ताज्या भाजीपाल्यासह इतर वस्तू घराजवळ स्वस्त भावांत मिळतील. परिसरातील शेतकऱ्यांच्या भाजीपाल्याला भाव मिळेल. शेतकऱ्याना आर्थिक बळ मिळेल.
>
> **-उदय माने, पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस**

गावात आठवडे बाजार सुरू झाल्याने ग्रामस्थांचा वेळ व प्रवासाचा खर्च वाचणार आहे. येथे बाजार सुरु झाल्याने विक्रेत्यांसह स्थानिकांनी स्वागत केले.यावेळी उपसरपंच दिगंबर माळी, चांगदेव मोरे, पांडुरंग गव्हाणे, प्रमोद वसेकर, तात्यासाहेब मोरे, माऊली खांडेकरयासह ग्रामपंचायत सदस्य आदी उपस्थित होते.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीला चांदीची फुलदाणी, बाऊल भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१६ जानेवारी-**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस नंदकुमार नागू जगताप, भाळवणी (ता. पंढरपूर) यांनी सुमारे ५५० ग्रॅम वजनाची चांदीची फुलदाणी तसेच सुहास शिवाजी मरळ, पुणे यांनी ९९६ ग्रॅम वजनाचे दोन बाऊल भेट दिल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

सदरच्या या दोन्ही वस्तूची अनुक्रमे ४४ हजार व ८८ हजार इतकी किंमत होत आहे. संबंधित देणगीदार जगताप यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीचे सदस्य संभाजी शिंदे व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच मरळ यांचा मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर यांच्या हस्ते श्रीची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब, व्यवस्थापक मनोज श्रोत्री, विभाग प्रमुख ज्ञानेश्वर कुलकर्णी, सराफ गणेश भणगे व सुपेकर उपस्थित होते. श्री विठ्ठल रुक्मिणीमातेस सोने चांदी भेट स्वीकारण्यासाठी स्वतंत्र विभागाची निर्मिती, यासाठी अनुभवी विभाग प्रमुख तसेच तज्ञ दोन सराफाची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच संगणक प्रणाली देखील विकसित करण्यात आली असून, भाविकांना संगणकीकृत पावती देण्यात येते.



> **चेन्नईच्या भक्ताची लाखाची देणगी**
>
> नटराजन श्रीनिवासन, चेन्नई यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या अन्नछत्रास एक लक्ष रुपयाची देणगी दिली आहे. त्याबद्दल त्यांचा मंदिर समितीच्या वतीने मंदिर समितीची व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा व उपरणे देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी देणगीदार यांचे कुटुंब व विभाग प्रमुख राजेश पिटले उपस्थित होते.

## दहिगाव उपसा योजनेसाठी पाणी द्या : आ. पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १६ जानेवारी-**

आम्हाला आमच्या हक्काचे पाणी उचलू द्या. आमदार नारायणआबा पाटील यांनी दहिगाव उपसा योजनेबाबत पाटबंधारे विभागाच्या आढावा बैठकीत आपली भूमिका मांडली.

जेऊर येथील आयोजित पाटबंधारे विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाचे अधीक्षक अभियंता खांडेकर यांच्या उपस्थितीत दहिगाव उपसा सिंचन योजनेचा तपशीलवार घोषवारा आमदार नारायणआबा पाटील यांच्यासमोर सादर करण्यात आला. या आढावा बैठकीसाठी पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता जाधवर, कुकडी डावा कालवा उपविभाग क्रमांक



१२चे उपविभागीय अभियंता राजगुरू, पाटबंधारे उपविभागाचे उपविभागीय अभियंता प्रकाश बाबा, घोडेस्वार, दाभाडे, आवटे, शिंदे, देवकाते उपस्थित होते. यावेळी दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या दहिगाव व कुंभेज येथील दोन्ही पम्प गृहातील विद्युत पंपाची स्थिती तसेच आवर्तन काळात येणाऱ्या अडचणी यावर चर्चा झाली. यावेळी करमाळा तालुक्यासाठी दहिगाव उपसाचे १.८१ टी एम सी पाणी हे उजनीत राखीव आहे पण हे पाणी संपूर्ण उचलले जाऊ शकत नाही. यामुळे आताआवर्तन कालावधी वाढला जावा आणि हक्काचा पाणी साठा संपेपर्यंत शेतकऱ्यांच्या गरजेनुसार व मागणी नुसार आवरतने मिळाली पाहिजेत अशी आपली भूमिका आहे, असे आ. पाटील यांनी सांगितले. यावेळी आमदार कार्यालयाच्या वतीने जिल्हा अधीक्षक श्री खांडेकर यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी सभापती अतुल भाऊ पाटील, बाजार समिती माजी संचालक देवानंद बागल, भारत शिक्षण प्रसारक मंडळ सचिव प्रा अर्जुन सरक आदी उपस्थित होते.

> **पाणी पोहोच करा**
>
> येत्या कालवा सल्लगार समितीच्या बैठकीत आपण हा विषय मांडणार आहे. लाभ क्षेत्रात शेतकऱ्यांच्या पाणी साठ्यापर्यंत पाणी पोहोच केले जावे अशी सूचनाही आ. नारायण पाटील यांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना दिली.

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ढोकी येथील शिव जयंतीच्या महोत्सवाच्या कार्याध्यक्षपदी सागर घाडगे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त बैठक ढोकी (ता. धाराशिव) आयोजित करण्यात आली होती. दत्ता देशमुख व पोलिस पाटील राहुल वाकुरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक संपन झाली. तसेच २०२५ सालची कार्यकारिणी व शिवजयंतीचे नियोजन करण्यात आले.

या बैठकीत कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यात अध्यक्ष यशराज संतोष तिवारी, उपाध्यक्ष ऋतुराज गुणवंत सुतार, सचिव गजानन समुद्रे, भाऊसाहेब गरड, कार्याध्यक्ष सागर सुरेश घाडगे, सहसचिव दीपक वाकुरे यांची एकमताने निवडण्यात आली.



दि.२० फेब्रुवारी रोजी महाराजांचा पालखी सोहळा, टाळकरी, चित्ररथ, लेझिम पथक, काठी लाठी पथक, उक्ष सोहळा, व्याख्यानमाला व इतर सांस्कृतिक स्पर्धा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीस शिवभक्त मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### डाक तिकीटाच्या प्रदर्शनास प्रतिसाद

**तेर, दि.१६ जानेवारी -**
धाराशिव तालुक्यातील तेर येथे डाक विभागाच्या वतीने आयोजित मुद्रांक डाक तिकीटाच्या प्रदर्शनास उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. या प्रदर्शनाचे उद्घाटन तेर सोसायटीचे माजी चेअरमन व्यंकटराव माळी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा डाकघर अधिक्षक संजय अंबेकर, डाकघर निरीक्षक सचिन स्वामी, सहाय्यक डाकघर निरीक्षक शामसुंदर गायकवाड, श्रीकांत माने यांची प्रमुख उपस्थिती होती. मुंद्रांक डाक तिकीटाच्या प्रदर्शन पाहण्यासाठी प्रचंड गर्दी विद्यार्थी, विद्यार्थीनी व नागरिक यानी गर्दी केली होती. यावेळी उपडाकपाल एम.व्ही. दोबोले, डाक सहाय्यक कल्याण माळी, डी. ऐ. जाधव, महेश वाघमोडे, विपणन अधिकारी बी.सी. माळी, प्रविण जाधवर, यशवंत वाघमारे, रविंद्र देडे, नरहरी बडवे व नागरिक उपस्थित होते.



### पाणी बचतीचा जनजागृती कार्यक्रम

**उमरगा, दि.१६ जानेवारी -**
उमरगा शहरात मकर संक्रांतीचा उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करण्यात आला. यावेळी टीम स्वच्छता ही सेवा या संस्थेचे संतोष वकारे यांच्या वाढदिवसानिमित्त पंचशील नगर येथील मुला-मुलींना तिळगुळ देऊन मकर संक्रांतीचे महत्त्व सांगितले सांगण्यात आले. वाढदिवसानिमित्त गरजूंना वही व पेन वाटप करण्यात आले. वस्तीमधील प्रत्येक घराघरात जाऊन स्वच्छतेच्या व पाणी बचतीच्या महत्त्वावर लक्ष केंद्रित करणारी पत्रके वितरित करण्यात आले आणि नागरिकांशी संवाद साधण्यात आला. यावेळी परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. यावेळी श्रीधर ढगे, संजीवन कुंभार, अमित तूकशेट्टी, अतुल खराटे, अजय कांबळे, विठ्ठल खराटे, सुरज आबाचाने आधीस सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

### हर्षदा येरमाळकर हिचे सुयश

**येरमाळा, दि.१६ जानेवारी -**
येरमाळा येथील सुकन्या हर्षदा प्रसाद येरमाळकर हिने थ्रो बॉल स्पर्धेत लातूर विभागाचे प्रतिनीधीत्व करीत



राज्यात व्दितीय क्रमांक मिळवीत राज्य खेळाडू चा दर्जा प्राप्त केला. कोल्हापूर जिल्हयातील माले ईथे २०२४-२५ च्या राज्यस्तरीय शालेय क्रिडा स्पर्धा नुकत्याच पार पडल्या. भारतीय शालेय खेळ महासंघाच्या वतीने १७ वर्ष वयोगटातील थ्रो बॉल या क्रिडा प्रकारात लातूर विभागाचे प्रतिनीधीत्व येरमाळ्याची कन्या हर्षदा येरमाळकर हिने करीत लातूर विभाग संघाला व्दितीय क्रमांक मिळवून दिला आहे. हर्षदा ही श्री.श्री. रविशंकर विद्यामंदिर लातूर येथे शिक्षण घेत असुन या यशामुळे तिने शाळेचे नाव राज्यात उंचावले आहे. येरमाळा पंचक्रोशीत सर्वत्र हर्षदा हीचे कौतुक होत आहे.



### जळकोट येथे हळदी-कुंकू

**जळकोट, दि.१६ जानेवारी -**
तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटिव क्रेडिट सोसायटी शाखेत मकर संक्रांतनिमित्त महिलांसठी हळदी-कुंकू कार्यक्रम घेण्यात आला. जळकोट येथील लोकमंगल मल्टीस्टेट शाखेत मकर संक्रांतीचे औचित्य साधून महिलांसाठी तिळगुळ वाटप व हळदी-कुंकू कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात संचालक मंडळ व परिसरातील महिलांना हळदी-कुंकू व तिळगुळ देऊन तसेच शाखेची दिनदर्शिका शाखेचे व्याजदराचे पत्रक देऊन त्यांना सर्व लोकमंगल समूहाबद्दल माहिती सांगण्यात आली. यावेळी शाखेचे सल्लागार मंडळ, कर्मचारी, महिला उपस्थित होत्या.

### श्रीमंतराव पुजारी यांचे निधन

**जळकोट, दि.१६ जानेवारी -**
अचलेर येथील श्रीमंतराव गणपतराव पुजारी (वय ८५) यांचे दि.१५ रोजी अचलेर (ता. लोहारा) येथील



राहत्या घरी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सूना, नातवंडे असा परिवार आहे. धरिद्री विद्यालयाचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक, राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त व अखिल भारतीय साने गुरुजी कथामाला, मुंबईचे प्रमुख कार्यवाह सुनील पुजारी यांचे ते वडील होत.

# बांधकाम कामगारांनी केंद्र, राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा

## आ. राणाजगजितसिंह पाटील यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
प्रभू रामचंद्रांच्या कुळात जन्म लेल्या व ज्यांच्या अथक प्रयत्नाने गंगा भारतभूमीवर अवतरली आणि आपला प्रदेश सुजलाम सुफलाम झाला. त्या राजा भगीरथाला आदर्श मानून वाटचाल करणार्या गवंडी समाजाचे राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात मोठा हातभार आहे. अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या या वर्गाला दिलासा देण्यासाठी महायुती सरकारने अनेक कल्याणकारी योजना आखल्या आहेत, त्याचा सामान्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.



तुळजापूर तालुक्यातील किलज येथे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी विधानसभा निवडणुकीत ऐतिहासिक विजय संपादन केल्याबद्दल ग्रामस्थांनी त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास भाजपाचे जेष्ठ नेते सुनील चव्हाण, माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, सतीश दंडनाईक, युवा नेते विनोद गंगणे, तुळजापूर बाजार समितीचे माजी सभापती सचिन पाटील, ॲड. दीपक आलुरे, वसंत वडगावे, प्रभाकर मुळे, प्रशांत लोमटे, अनिल बंडगर, प्रभाकर भोसले, दिनकर पाटील, अशोक शेळके, वैजीनाथ कोणाळे, बनसिद्धप्पा कोणाळे, शिवराज मरडे, विठ्ठल मरडे, विलास मरडे उपस्थित होते. यावेळी आ. पाटील म्हणाले की, राज्यात महायुती व देशात मोदींचे केंद्र सरकार देशहित आणि देशाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करीत आहे. सरकारकडून गवंडी समाजासाठी महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून मुलांचे शिक्षण, पक्के घर बांधणी, मध्यान्ह भोजन योजना यांच्यासह राबविण्यात येणार्या इतर कल्याणकारी योजनांची माहिती दिली. धाराशिव जिल्ह्याचा कायापालट करण्यासाठी आपले नियोनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. पर्यटन, उद्योग व शाश्वत सिंचनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती करण्यासाठी आपण एक कालबद्ध कृती कार्यक्रम आखला आहे.

पहिल्या टप्प्यात १० हजार रोजगारनिर्मिती करण्याचा आपला निश्चय असून यासाठी आपली साथ गरजेची आहे.

### सामाजिक सभागृहासाठी १० लाख

किलज येथे गवंडी समाजबांधवांच्या विविध कार्यक्रम व उपक्रमांसाठी राजा भगीरथ सामाजिक सभागृहाची मागणी गवंडी समाजबांधवांनी केली. यावेळी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी तातडीने त्यासाठी आमदार निधीतून १० लाख निधी देण्याचे आश्वासन दिले.

## महात्मा बसवेश्वर पुतळा विटंबनाप्रकरणी उमरग्यात निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ जानेवारी -**
भालकीमध्ये श्री महात्मा बसवेश्वर यांच्या पूर्णकृती पुतळ्याची विटंबना झाल्यानंतर कर्नाटकाबरोबरच महाराष्ट्रातही तीव्र पडसाद उमटत आहेत. महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्यावर सप्त कारवाई करण्यात यावी ही मागणी शिव-बसव प्रतिष्ठानच्या वतीने गुरुवारी (दि.१६) रोजी करण्यात आली.

भारतातील थोर समाजसुधारक जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळ्याची कर्नाटकातील बिदर जिल्ह्यातील भालकी येथील पुतळ्याची काही अज्ञात समाजकंटकांनी विटंबना केली आहे. जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचा पुतळा विटंबना केली ही घटनाच निषेधार्ह आहे. या घटनेतील आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करून सदरील आरोपींना त्वरीत जेरबंद करावे, अन्यथा याप्रश्नी शिव-बसव प्रतिष्ठानच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

यावेळी शिव-बसव प्रतिष्ठानचे दिनेश बिराजदार, निखिल वाघ, गिरीश अष्टगे, प्रविण पाटील, शिवकुमार पुरतं, अभय अष्टगे, अतुल वरकले, विजय अष्टगे, सुमीत दडंगे, आकाश परांडे, स्वप्निल पुजारी, उमेश आबाचने व पदाधिकारी उपस्थित होते.

## इंडोन व इंडीयन रिसर्च सेंटर यांच्यामध्ये सामंजस्य करार

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ जानेवारी -**
इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशन व इंडीयन इन्स्टिट्युट ऑफ पल्सेस रिसर्च सेंटर यांच्यामध्ये दि.१६ जानेवारी रोजी कानपूर उत्तर प्रदेश येथे झालेल्या बैठकीमध्ये सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती इंडो पल्सेस डेव्हलपमेंट असोसिएशनचे चेअरमन नारायण नन्नवरे यांनी दिली.

या करारामध्ये कृषी विस्तार संदर्भात विविध प्रशिक्षणे व क्षमता बांधण्याचे करार करण्यात आले. बैठकीस इंडो पल्सेसचे चेअरमन नारायण नन्नवरे, आयआयपीआर सेंटरचे डायरेक्टर डॉ. गिरीश दीक्षित, व्यवस्थापक शुभ्रा देशपांडे, राष्ट्रीय सल्लागार रावसाहेब बेंद्रे, अंजली मिश्रा, यांच्यासह रिसर्च सेंटरच्या सर्व विभागाचे प्रमुख शास्त्रज्ञ उपस्थित होते.

## भारतीय जनता पार्टीच्या विकास कार्याचा भाग व्हा : शरण पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
भारतीय जनता पार्टीच्या विकास कार्याचा भाग व्हा. युवा नेते भाजपा शरण बसवराज पाटील मुरूम शहरातील माधवराव पाटील महाविद्यालय येथे भारतीय जनता पार्टी सदस्यता नोंदणी कॅम्पमध्ये युवा नेते शरण पाटील बोलताना म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभरात सुरू असलेल्या सदस्यता नोंदणी अभियानला उमरगा-लोहारा मतदारसंघात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



**मुरूममध्ये भाजपा सदस्य नोंदणीचा शुभारंभ...**

भाजपा सदस्य अभियानात सहभागी होण्यासाठी युवा नेते शरण पाटील यांनी नागरिकांना आवाहन केले.

आपल्या देशाला २०४७ पर्यंत महासत्ता बनविण्याचा संकल्प नरेंद्र मोदी जी यांनी केला असून, या संकल्पाच्या पूर्ततेसाठी आणि या महान कार्यात योगदान देण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील रहावे.

भारतीय जनता पार्टीच्या या सदस्यता अभियानात सहभाग घेतल्यामुळे, आपले राष्ट्र आणखी मजबूत होईल आणि एक समृद्ध, आत्मनिर्भर भारत निर्माण होईल हा विश्वास युवा नेते शरण पाटील यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच भाजपच्या सदस्यता नोंदणीला गती येण्यासाठी मतदार संघात सर्वत्र अभियानाच्या प्राचारा करिता व्हॅनचा शुभारंभ शरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी जि.प. सदस्य रफिक तांबोळी, उमरगा पं.स. सभापती सचिन पाटील, योगेश राठोड, रितेश जाधव, प्रविण गायकवाड, अप्पू गुंजोटे, राजूभाई मुल्ला, गौस शेख, सुजित शेळके तसेच मतदार संघातील भाजपा पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



## तेंग सुडो स्पर्धेत जि.प. हायस्कूलला दोन सुवर्ण, दोन रौप्य, चार कांस्य पदक

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ जानेवारी -**
येथील आयएसओ मानांकित जिल्हा परिषद हायस्कूलला राज्यस्तरीय शालेय तेंग सुडो स्पर्धेत दोन सुवर्ण दोन रजत आणि चार ब्राँझ पदक मिळाले आहेत.

या स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, धुळे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धुळे, तेंग सुडो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपळनेर धुळे येथे पार पडल्या.

या स्पर्धेमध्ये राज्यभरामधील आठ विभागातील १४, १७ व १९ वयोगटातील एकूण ३८४ खेळाडूंनी आपला सहभाग नोंदवला होता. या स्पर्धेत जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या वजन गटामध्ये १० पदके मिळवून दबदबा निर्माण केला या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे उमरगा-लोहारा तालुक्याचे आ. प्रवीण स्वामी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांच्या हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन सत्कार करण्यात आला. त्यामध्ये श्रेयसी शिंदे सुवर्ण, गीता गायकवाड सुवर्ण, अनुराधा गुंडे रजत, मोहिनी घोडके रजत, अश्विनी जाधव अफसाना नदाफ, अर्चना धोत्रे, ईश्वरी माने या विद्यार्थ्यांनी ब्राँझ पदकाची कमाई केली. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक, महंमद रफी शेख, फजल शेख, धनराज तेलंग, यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी हे मोठे यश प्राप्त केलेले आहे.

या यशाबद्दल अशोक पतगे, अमर वरवटे, सदानंद शिवदे-पाटील, सुजाता मोरे, गटशिक्षणाधिकारी शिवकुमार बिराजदार, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके आदि मान्यवर उपस्थित होते.

## प्रतिक्षा कायम; शेतकऱ्यांची पीककर्ज माफी कधी?

**महायुती सरकारने दिले होते वचननाम्यात शेतकऱ्यांना आश्वासन... शेतकरी प्रतिक्षेत...**

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१६ जानेवारी -**
जगाचा पोशिंदा समजला जाणारा बळीराजा सद्या अर्थिक संकटात सापडला आहे. मागील काही दिवसांपासून पिकांचे भाव कोसळले असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. खत, औषधांचे भाव गगनाला भिडले आहेत. मात्र शेत मालाच्या भावात काय सुधारणा झालेली दिसत नाही. शेतीला जोडधंदा म्हणून समजला जाणारा दुग्ध व्यवसाय देखील सध्या कमी दरामुळे मोडकळीस आला असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

त्यामुळे शेती करायची तरी कशी असा सवाल शेतकरी विचारात आहेत. महायुती सरकार सत्तेवर येण्या अगोदर शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव देऊ असे आश्वासन शेतकऱ्यांना दिले



होते मात्र आश्वासनाचा सरकारला विसर पडलेला दिसतो. त्याच बरोबर राज्यात निवडणुकीत गाजलेला शेतकऱ्यांचा महत्वाचा मुद्दा म्हणजे पीक कर्ज माफी खरेतर आमचे सरकार सत्तेत आल्यानंतर शेतकऱ्याच कर्जमाफ करू असे आश्वासन महायुतीनं त्यांच्या वचननाम्यात दिले होते. तसेच अनेक जाहीर प्रचार सभेत महायुतीच्या नेत्यांनी शेतकऱ्यांना शब्द दिला होता. आता जवळपास महायुती सरकार सत्तेवर येऊन बराच कालावधी उलटला आहे. तरी अद्याप ठोस असा निर्णय झालेला नाही. का शेतकऱ्यांचा कर्जमाफी निर्णय आणि शेतमालाचे भाव

वचननाम्यातच राहतात का? अशी शेतकऱ्यांच्या मनात साशंकता निर्माण झाली आहे.

## श्री सिध्दीविनायक परिवारतर्फे हळदी-कुंकू कार्यक्रम संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
श्री सिध्दीविनायक परिवार यांच्या वतीने आयोजित मकर संक्रांत हळदी-कुंकू कार्यक्रम शहरातील महिलांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे यशस्वीपणे पार पडला.

१५ जानेवारी रोजी धाराशिव येथे पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमात महिलांसाठी विविध सांस्कृतिक उपक्रम आणि अल्पोपहाराचे आयोजन करण्यात आले होते. तिळगुळ वाण, पारंपरिक भेटवस्तू वाटप, तसेच सणाच्या महत्त्वाबद्दल मार्गदर्शन हे या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले.

या समारंभामध्ये श्री सिध्दीविनायक परिवाराचे संस्थापक दत्ता कुलकर्णी यांच्या सुविद्य पत्नी दीपाली कुलकर्णी व कुटुंबातील महिला सदस्य माधुरी कुलकर्णी, प्राची कुलकर्णी व श्री सिध्दीविनायक परिवारातील महिला भगिनी यांचे हस्ते वाण देण्यात आले. यावेळी महिलांच्या उत्स्फूर्त सहभाग होता.

# पालक सचिव अन्शु सिन्हा यांनी घेतला विविध योजनांचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ जानेवारी -**
पालक सचिव अंशु सिन्हा यांनी आज १६ जानेवारी रोजी दुरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून आढावा बैठक घेतली. या बैठकीत सिन्हा यांनी जिल्ह्यात झालेल्या विकास कामांबाबत समाधान व्यक्त करत यापुढेही विविध कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच प्रत्येक विभागाचा आढावा घेत असताना विभागाला असलेल्या अडीअडचणी जाणून घेतल्या. जिल्हा प्रशासनाकडूनही त्यांनी अनेक बाबींचा आढावा घेतला.

यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयात या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, रोहयो उपजिल्हाधिकारी संतोष राऊत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुर्यकांत भुजबळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शाम गोडभरले, जिल्हा महिला व बालकल्याण अधिकारी देवदत्त गिरी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी किशोर गोरे, जिल्हा प्रशासन अधिकारी डोके, श्री तुळजाभवानी मंदीर संस्थानच्या व्यवस्थापक तथा तहसीलदार माया माने, महसूलचे तहसीलदार अभिजीत पाटील, सहाय्यक नियोजन अधिकारी



कुंटजा उपस्थित होत्या.

सिन्हा यांनी जिल्ह्यातील महसूल, कृषी, भूसंपादन, मुख्यमंत्री, रेल्वे प्रकल्प सद्यस्थिती, सुरत-चेन्नई महामार्ग, पी.एम. किसान, गाव तिथे स्मशानभूमी सुविधा उपलब्ध करुन देणे, शेतरस्ते, १०० दिवसांचा कृती कार्यक्रम आदीचा संबंधित विभाग प्रमुखांकडून आढावा घेतला. आतापर्यंत जिल्ह्यात वाटप झालेल्या पिक विम्याबद्दलही श्रीमती सिन्हा यांनी समाधान व्यक्त केले. तसेच त्यांनी यावेळी रेशीम शेतीला जिल्ह्यात उपयुक्त वातावरण आहे.

रेशीम शेतीच्या माध्यमातून कोष निर्मितीत जिल्हा हा एक जिल्हा एक उत्पादन उपक्रमात सहभागी होवून उत्पादन करु शकतो.

त्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या उपक्रमासाठी विशेष प्रयत्न करण्याचे निर्देशही यावेळी सिन्हा यांनी दिले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## पॅंथरचे पुनर्जीवन काळाची गरज : प्रा. यू. डी. गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
सध्याची राजकीय आणि सामाजिक परिस्थिती पाहता पुन्हा मनुवाद येत असल्याचे जाणवत आहे. त्यामुळे पुन्हा दलित पॅंथर पुनर्जीवित होण्याची काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा. यु. डी. गायकवाड यांनी प्रकाश नगरमधील नालंदा बुद्ध विहार येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन कार्यक्रमात बोलताना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते बापू घोलप होते.

यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बुद्धांच्या प्रतिमेचे पूजन करून त्रिशरण पंचशील घेण्यात आले. नामांतर चळवळीमध्ये शहीद झालेले पोचिराम कांबळे, जनार्धन मेवाडे, गोविंद भुरेवार, दिलीप रामटेके, चंदर कांबळे, विलास ढाणे, नारायण गायकवाड, शरद पाटोळे, रोशन बोरकर, सुहासिनी बनसोडे, प्रतिभा तायडे, अविनाश डोंगरे, विलास घोगरे, गौतम वाघमारे या शहिद वीर भीमसैनिकांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रा. यु. डी. गायकवाड यांनी दलित पॅंथर व नामांतर लढ्याचा रक्तरंजित इतिहास सांगितला. याप्रसंगी माजी समाज कल्याण सभापती बालाजी कांबळे, महाराष्ट्र विकास आघाडीचे बसवंतप्पा उबाळे यांची यथोचित भाषणे झाली.

कार्यक्रमाला पत्रकार अशोक देडे, जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती बाबासाहेब गायकवाड, नालंदा विहारचे अध्यक्ष उत्तमराव कांबळे, सचिव बाबुराव बनसोडे, ज्ञानोबा सुरवसे, सुरेश सोनकांबळे, मधुकर श्रगारे, माजी नगरसेवक नागसेन कामेगावकर, अरुण गायकवाड, मारुती आपटे, सामाजिक कार्यकर्ते रणजीत कांबळे, उत्तम कांबळे आदी उपस्थित होते.



### संक्षिप्त वृत्त...

## स्वामित्व योजनेंतर्गत मालमत्ता कार्ड, सनदचे उद्या वितरण

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
स्वामित्व योजनेंतर्गत देशातील ५० लाखाहून अधिक घरमालकांना मालमत्ता कार्ड, सनदचे ई-वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १८ जानेवारी रोजी सुरु होत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधींच्या प्रतिनिधींच्या उपस्थित लातूर जिल्ह्यातही ३० गावांमध्ये सनद वितरण करण्यात येणार आहे. पंतप्रधानानी २४ एप्रिल २०२० रोजी स्वामित्व योजनेचे उद्घघाटन केले होते. या योजनेचा उद्देश गावांतील अबादी क्षेत्रातील घरांसाठी मालमत्ता पत्रक देणे हा आहे. यासाठी ड्रोन तंत्रज्ञान आणि प्रगत नकाशांकन तंत्राचा उपयोग केला जातो. ही योजना ग्रामीण भागातील नागरिकांच्या आर्थिक समावेशनात सुधारणा, पतपुरवठ्यास सुलभता आणि सामाजिक - आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी महत्वाची भूमिका बजावत आहे. १८ जानेवारी २०२५ रोजी मालमत्ता कार्ड, सनद, ई-वितरण झाल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी या योजनेतील लाभार्थ्यांशी संवाद साधतील. या कार्यक्रमानंतर लोकप्रतिनिधी, अधिकारी यांच्या उपस्थितीत स्थानिक कार्यक्रमाद्वारे मालमत्ता कार्डांचे, सनदचे प्रत्यक्ष वितरण करण्यात येणार आहे. स्वामित्व योजनेंतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये आतापर्यंत ५०२ गावांच्या सनद प्राप्त झालेल्या असून त्याचे लाभार्थी संख्या ६९ हजार ३०४ आहेत. यापैकी २३३ गावाचे सनद वाटप झालेले आहे. १ ऑक्टोबर, २०२४ ते २० डिसेंबर, २०२४ अखेरे पीआरसी जनरेशन झालेली ३० गावांची सनद वाटप १८ जानेवारी, २०२५ रोजी करण्यात येणार असल्याचे जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख एन.एन. पटेल यांनी कळविले आहे.

## राष्ट्रपती पोलीस पदक सन्मानित माजी विद्यार्थी सय्यद रहेमान यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील माजी विद्यार्थी राष्ट्रपती पोलीस पदक सन्मानित सय्यद रहेमान यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी नुकताच सत्कार केला यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांची उपस्थिती होती. माजी विद्यार्थी सय्यद रहेमान सन १९८१-८२ यावर्षी या कला शाखेमध्ये त्यांनी शिक्षण घेतले असून पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे त्यांनी सहाय्यक पोलीस सब इन्स्पेक्टर म्हणून कार्य केले आहे. त्यांचा सन २०१५ मध्ये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सन्मानचिन्ह देऊन गौरविले. तसेच २०१८ साली त्यांना लातूर भूषण पुरस्कार सुद्धा प्राप्त झाला आहे. सन २०१९ रोजी न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या हस्ते राष्ट्रीय न्याय गौरव पुरस्कार सुद्धा त्यांना मिळालेला आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले राज्यस्तरीय पुरस्काराने २०२४ मध्ये ते सन्मानित झाले आहे. त्यांनी आतापर्यंत विविध शाळा आणि महाविद्यालयात एन. एस. एस., एन. सि. सी. शिबिरामध्ये व्यक्तिमत्व विकासावर मार्गदर्शन सुद्धा केले आहेत. त्यांच्या या उज्वल परंपरेसाठी त्यांचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## शिव उद्योग सहकार सेना महासंघाच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
शिवसेना मुख्य नेते तथामहाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार स्थापन झालेल्या अखिल भारतीय शिव उद्योग सहकार सेना महासंघाची स्थापना करण्यात आली आहे. उद्योजक, व्यावसायिक व शेतकरी यांच्या मूलभूत हक्कांसाठी लढणाऱ्या राष्ट्रव्यापी महासंघाच्या विविध पदांकरिता राज्यभर नेमणूक होणार आहेत. त्यासाठी २० जानेवारी २०२५ पासून विभागानुसार मुलाखती घेण्यात येणार आहेत. महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष हर्षद नेगीनहाळ यांनी ही माहिती दिली. राज्य कार्यकारिणी प्रदेश उपाध्यक्ष तथा विभागीय अध्यक्ष ७, प्रदेश समन्वयक ७, प्रदेश सरचिटणीस १५, प्रदेश संघटक ७, नियंत्रक ७, खजिनदार २ आणि १५ सदस्यांची नियुक्ती मुलाखतीद्वारे होणार आहे. याचवेळी जिल्हा कार्यकारिणी आणि शहर कार्यकारिणीसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत.

## पालावर जावून शासकीय सेवांचा लाभ देणे संवेदनशील प्रशासनाचे उदाहरण



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
जिल्हा प्रशासनामार्फत भटक्या विमुक्तांना त्यांच्या पालावर जावून विविध शासकीय सेवांच्या लाभ देण्यात आला आहे. हा अपक्रम म्हणजे संवेदनशील प्रशासनाचे उत्तम उदाहरण असल्याचे नमूद करून छत्रपती संभाजीनगर विभागाचे राज्य लोकसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या पुढाकाराने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले. जिल्हा प्रशासनाच्यावतीने ५५ शिबिरांचे आयोजन करून भटक्या विमुक्तांना विविध सेवांचा लाभ देण्यात आला आहे.

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या विविध सेवांच्या अंमलबजावणीची आढावा बैठक डॉ. जाधव यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झाली. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, प्रशिक्षणार्थी आयपीएस अधिकारी सागर खर्डे यांच्यासह विविध शासकीय विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

नागरिकांना शासनाच्या विविध सेवा, योजनांचा लाभ विहीत कालावधीत उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम तयार करण्यात आला. यानुसार राज्य शासनाच्या ६६२ सेवा अधिसूचित करून त्या ऑनलाईन स्वरूपात उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. तसेच त्यांची कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये ग्रामपंचायत पातळीपासून ते जिल्हास्तरीय कार्यालयाशी संबंधित सेवांचा समावेश असून या सर्व सेवांसाठी नागरिकांना ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा आहे. या अर्जावर निर्णय घेण्यासाठी पदसिद्ध अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. या पदसिद्ध अधिकाऱ्यांनी आपल्याकडे ऑनलाईन स्वरूपात प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारींचा निपटारा विहीत कालावधीत करावा, अशा सूचना डॉ. जाधव यांनी यावेळी दिल्या.

अधिसूचित करण्यात आलेल्या काही सेवांमध्ये एकापेक्षा जास्त विभागांशी संबंधित काही सेवांचा समावेश आहे. अशा सेवांसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर परस्पर समन्वयाने विहित कालावधीत असे अर्ज निकाली काढावेत. यासोबतच प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर प्राप्त होणाऱ्या अपिलांचा निपटारा गतीने करावा. आपले सरकार सेवा केंद्रांमधून विविध सेवांसाठी अर्ज करता येतो, त्याचप्रमाणे अपीलही करता येतात. याबाबतचा फलक प्रत्येक आपले सरकार सेवा केंद्रामध्ये लावावा. तसेच आपले सरकार सेवा केंद्रामध्ये तक्रार पेटी लावून त्याची जबाबदारी संबंधित तलाठी यांच्याकडे द्यावी. या माध्यमातून प्राप्त तक्रारींचा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दरमहा आढावा घ्यावा, असे डॉ. जाधव यांनी सांगितले.

## लातुरात कर्करोग विषयक कार्यशाळा व वैज्ञानिक परिषद

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, लातूर आय. एम. ए., असोसिएशन ऑफ प्रॅक्टिसिंग पॅथॉलॉजिस्ट ॲण्ड मायक्रोबायोलॉजिस्ट, लातूर व एम. आय. एम. एस. आर. मेडिकल कॉलेज, लातूर यांच्या वतीने १७ जानेवारी रोजी कर्करोग विषयक कार्यशाळा व १८ जानेवारी रोजी रक्तांच्या विविध आजारांबद्दलची वैज्ञानिक परिषद बार्शी रोडवरील पीव्हीआर टॉकीज येथे आयोजित केली आहे.

कार्यशाळा व परिषद सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. या कार्यक्रमात टाटा मेमोरियल हॉस्पिटल, मुंबई व इतर शहरांतील तज्ज्ञ डॉक्टर्स मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळा व परिषदेच्या निमित्ताने डॉक्टरांना कर्करोगाबाबत अद्ययावत तपासण्या, निदान पद्धती व उपचार, यासंदर्भात माहिती घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. याशिवाय, अन्य उत्तम माहितीही मिळणार आहे. कार्यशाळेस लातूर तसेच विविध शहरांतून साधारणतः चारशे डॉक्टर्स उपस्थित राहणार आहेत. तसेच कार्यशाळा व परिषदेस जास्तीत जास्त डॉक्टरांनी उपस्थित राहावे.

## समाजोपयोगी कार्यासाठी पुढाकार घ्यावा



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
आज प्रत्येक माणसांची जीवनशैली बदलली असून माणूस हा चंगळवादी,भोगवादी व विलासी बनत चालला आहे.समाजजीवनात व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे तंबाखू,गुटखा,सिगारेट, मद्यपान,धूम्रपान या व्यसनाच्या सवयी ह्या प्रकृतीसाठी हानिकारक आहेत.युवकांनी या वाईट सवयींपासून दूर राहिले पाहिजे. तसेच हुंडा व भ्रष्टाचार रोखण्यासाठी विद्यार्थ्यांनी समाजजीवनात जागरूकता निर्माण केली पाहिजे. समाजाच्या कल्याणासाठी व समाजोपयोगी कार्यासाठी नेहमी पुढाकार घेतला पाहिजे,असे प्रतिपादन आपल्या सुमधूर काव्यातून ज्येष्ठ कवी भारत सातपुते यांनी केले.

येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयोच्या वतीने औसा तालुक्यातील दावतपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबराचा समारोप दि.१२ जानेवारी २०२५ रोजी झाला.यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.यावेळी युगपुरुष स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादनही करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयक्यूएसी समन्वयक डॉ. जमन अंगुलवार होते.याप्रसंगी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.सुरज कोल्हे व डॉ.अमोल ठोसर,डॉ. चंद्रशेखर स्वामी,जयशंकर पाटील,बी.बी.चित्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप करताना डॉ.जमना अंगुलवार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगून आपण ज्या समाजात जन्माला येतो,त्या समाजाची व देशाची सेवा प्रामाणिकपणाने केली पाहिजे असे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन अविनाश जाधव यांनी केले तर आभार यश झंवर यांनी मानले.याप्रसंगी रासेयो विद्यार्थी प्रतिनिधी विलास चव्हाण यांच्यासह इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी व ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## डॉ. कराडांच्या वाढदिनानिमित्त आरोग्य सुरक्षा महाशिबिर



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
माईर्स एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष, विश्वधर्मी डॉ. विश्वनाथ कराड यांच्या जन्मदिनानिमित्त लातूर एमआयटी वैद्यकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातर्फे १५ जानेवारी ते ५ फेब्रुवारी दरम्यान आरोग्य सुरक्षा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचा रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एमआयटीचे कार्यकारी संचालक आमदार रमेश कराड यांनी केले आहे.

तळागाळातील गोरगरीब लाखो विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा ध्यास घेतलेले डॉ. विश्वनाथ कराड यांचा येत्या ३ फेब्रुवारी रोजी जन्मदिवस असून यानिमित्ते येथील एमआयटी वैद्यकीय महाविद्यालय आणियशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातर्फे सलग वीस दिवस सर्व प्रकारच्या रुग्णांसाठी मोफत वैद्यकीय तपासणी व उपचारासाठी आरोग्य सुरक्षा महाशिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. विविध प्रकारच्या रुग्णसेवेसाठी एमआयटीच्या ग्रामीण रुग्णालयासह शहरासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाच्या कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी सर्वरोग निदान शिबिरांचे नियोजन करण्यात येत आहे. गेल्या ३४ वर्षांपासून एमआयटी वैद्यकीय महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालयातर्फे रुग्णांना अविरत सेवा देण्यात येत आहे. या रुग्णालयात सर्व प्रकारच्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या शिबिराचा रुग्णांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार कराड यांनी केले आहे.

## शिलाई प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना प्रमाणपत्रांचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
विलासराव देशमुख फाउंडेशनतर्फे लातूर तालुक्यातील चांडेश्वर येथे सुरू करण्यात आलेल्या मोफत शिलाई प्रशिक्षणाचा समारोप नुकताच पार पडला. प्रशिक्षण घेतलेल्या ५८ महिलांना यावेळी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

या प्रशिक्षण केंद्रात महिलांना ३ महिन्यांचा शिलाईचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात शिलाईच्या विविध पध्दती, डिझाइनिंग आणि कटिंग यासंबंधीचे सखोल ज्ञान महिलांना देण्यात आले. विलासराव देशमुख फाऊंडेशनने चांडेश्वर येथील महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण देण्यासाठी हा उपक्रम राबविला आहे. देशमुख फाऊंडेशनच्या या मोफत शिलाई मशीन प्रशिक्षण केंद्रामध्ये ५८ महिलांनी सहभाग घेतला. या महिलांना प्रेमा ठाकूर यांनी प्रशिक्षण दिले. ३ महिन्यांच्या कालावधीत महिलांना शिलाई कामातील वेगवेगळ्या पध्दतीचे शिलाईचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण कालावधी पूर्ण केलेल्या महिलांचा प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी समन्वयक संगीता मोळवणे, चंद्रकांत नलावडे, सुबोद्दीन शेख, अविनाश देशमुख, प्रशिक्षक प्रेमा ठाकूर, गजानन बोयणे व प्रशिक्षणार्थी महिला उपस्थित होत्या.

## जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी रेशीम रथाला दाखविली हिरवी झेंडी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
जिल्ह्यात ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महारेशीम अभियान २०२५ राबविण्यात येत आहे. या अंतर्गत रेशीम शेतीविषयी जनजागृतीसाठी जिल्हा रेशीम कार्यालयाने रेशीम रथ तयार केला आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आज रेशीम रथाला हिरवी झेंडी दाखवून जनजागृती व नाव नोंदणी मोहिमेचा शुभारंभ केला. रेशीम शेतीविषयी तयार करण्यात आलेल्या घडीपुस्तिकेचे प्रकाशनही यावेळी त्यांच्या हस्ते झाले.

रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रमेश जाधव, आत्माचे प्रकल्प संचालक शिवसांब लाडके, रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट, जिल्हा परिषदेतील रोहयोचे गट विकास अधिकारी संतोष माने, जिल्हा रेशीम कार्यालयाचे व्ही. एन. पेठकर यांच्यासह रेशीम उत्पादक



शेतकरी यावेळी उपस्थित होते.

रेशीम ही कमी पाण्यात आणि कमी काळात उत्पन्न देणारे पीक आहे. लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी रेशीम शेती उपयुक्त ठरणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील जास्त जास्त शेतकऱ्यांपर्यंत पोहचून रेशीम शेतीची माहिती द्यावी. यामध्ये ज्या गावामध्ये रेशीम शेतीला सुरुवात झाली आहे, अशा गावांच्या आजूबाजूंच्या गावावर लक्ष केंद्रित करून क्लस्टर स्वरुपात रेशीम शेतीचा प्रसार करण्यावर भर द्यावा. सध्या रेशीम शेती करीत असलेल्या शेतकऱ्यांनीही आपल्या गावातील इतरही शेतकऱ्यांना रेशीम शेती करण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी केले.

जिल्ह्यात ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महारेशीम अभियान राबविले जात आहे. या काळात शेतकऱ्यांना रेशीम शेतीचे महत्व समजावून सांगण्यासोबतच इच्छुक शेतकऱ्यांची नाव नोंदणी करून घेण्यात येणार आहे. रेशीम शेतीसाठी अत्यल्प व अल्पभूधारक शेतकऱ्यांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून एका एकरासाठी सुमारे ४ लाख १८ हजार रुपये अनुदान देय आहे. तसेच इतर शेतकऱ्यांना सिल्क समग्र-२ योजनेतून एका एकरासाठी सुमारे ३ लाख ७५ हजार रुपये अनुदान देय असल्याची माहिती रेशीम विकास अधिकारी एस. बी. वराट यांनी दिली.



## बेवारस मृतदेहाला शाहू कॉलेजची विद्यार्थिनी अंकिताने दिला मुखाग्नी

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
गांधी चौक पोलीस स्टेशनच्या हद्दीत सापडलेल्या मृतदेहावर बुधवारी (दि.१५) मारवाडी स्मशानभूमीत श्री सेवा आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. राजर्षी शाहू महाविद्यालयात विज्ञान शाखेच्या पहिल्या वर्षाचे शिक्षण घेणाऱ्या कु. अंकिता हनुमंत मोटे या विद्यार्थिनीने या सेवा कार्यात सहभाग घेत बेवारस मृतदेहाला मुखाग्नी दिला.

राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला साजेसे कार्य करीत अंकिताने या निमित्ताने समाजासमोर नव्या विचाराचा वस्तूपाठ रचला आहे. अनेक वेळेला वंशाचा दिवा नसलेल्यांच्या मृतदेहाला पणती बनत मुलीने मुखाग्नी दिल्याच्या घटना अनेक वेळा समोर येतात. पण, जात-पात, धर्म-पंथ आणि नात्या- गोत्याच्या धाग्यापलीकडे जाऊन ज्याला कोणीच नाही आणि ज्याची ओळखही नाही, अशा मृतदेहावर अंत्यसंस्कार करीत बुरसटलेल्या विचाराचा पडदा फाडत अंकिताने टाकलेल्या या पावलाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## इच्छुकांना लागले स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे वेध

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.१६ जानेवारी -**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंधरा दिवसांपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत्या तीन महिन्यांत घेण्यात येणार, असे सूतोवाच केल्याने इच्छुकांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. गेल्या पावणेतीन वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका रखडल्या आहेत. आता माजी जिल्हा परिषद सदस्यांनाही आगामी निवडणुकीचे वेध लागले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची सर्वच राजकीय पक्षांकडून तयारी सुरू करण्यात आली आहे. लातूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुका गेल्या पावणेतीन वर्षांपासून रखडल्या आहेत. माजी जिल्हा परिषद सदस्य व इच्छुक मंडळी या निवडणुकीची वाट पाहात आहेत. नोव्हेंबर महिन्यात पार पडलेल्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत महायुतीला




भरघोस यश मिळाल्यानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास हरकत नाही, अशी धारणा महायुतीच्या नेत्यांची झाली आहे. पंधरा दिवसांपूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका येत्या तीन महिन्यांत घेण्यात येणार, असे सूतोवाच केले आहे. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा मार्ग मोकळा होणार असल्याची चर्चा सुरू आहे. या निवडणुकांबाबत सरकार सकारात्मक असल्याचे चित्र असल्याने निश्चितच येत्या तीन महिन्यांत निवडणुका होतील, असा अंदाज आहे. मुख्यमंत्र्यांच्या माहितीनंतर इच्छुकांच्या आशा तर पल्लवित झाल्या आहेतच शिवाय, इच्छुक कामाला लागले आहेत. माजी जिल्हा परिषद सदस्यही यात मागे नाहीत. त्यांनीही हालचाली सुरू केल्याची जोरदार चर्चा ग्रामीण भागात सध्या सुरू आहे. तसेच राजकीय पक्षही आपल्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना कामाला लागा, असा संदेश देत आहेत. त्यामुळे इच्छुक कामाला लागले असल्याचे दिसून येत आहे.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## महाराष्ट्र उदयगिरीत महिला कर्मचाऱ्यांना ग्रंथांचे वाण



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१६ जानेवारी -**
मकर संक्रांती सणाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाने एक आगळावेगळा उपक्रम राबवत महिला कर्मचाऱ्यांना ग्रंथांचे वाण देऊन त्यांचा सन्मान केला.

या उपक्रमाचा उद्देश ज्ञानप्रसाराला चालना देणे आणि महिलांच्या शैक्षणिक व वैयक्तिक विकासाला प्रोत्साहन देणे हा होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के यांच्या हस्ते ग्रंथांचे वाटप करण्यात आले. यावेळी प्राचार्यांनी ग्रंथ वाचनाचे महत्त्व स्पष्ट करत, ज्ञानार्जन हा सतत चालणारा प्रवास असल्याचे सांगितले. कार्यक्रमाला महिला प्राध्यापक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयातील महिला कर्मचाऱ्यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, ग्रंथ हीच संक्रांतीची सर्वोत्कृष्ट भेट असल्याचे मत व्यक्त केले.

## संक्षिप्त वृत्त...



### तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम संपन्न

**चाकूर, दि.१६ जानेवारी -**
चाकूर येथील व्यापारी मित्र परिवाराच्या वतीने मकर संक्रात निमित्त तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम स्वामी विवेकानंद चौक येथे घेण्यात आला. कार्यक्रमास पोनि. दत्तात्रय निकम, पोउनि. राजेश घाडगे, नगराध्यक्ष कपिल माकणे, चेअरमन गोविंदराव माकणे, काँग्रेसचे विलास पाटील, राधाकिशन तेलंग, बालाजी सूर्यवंशी, नगरसेवक भागवत फुले, रिपाइंचे पपन कांबळे, बाळू लाटे, नरसिंग गोलावार, महंमद शेख, भाजपाचे प्रशांत बिबराळे, सागर होळदांडगे, ॲड. संतोष माने, रवींद्र निळकंठ, प्रकाश रेड्डी, अजय नाकाडे, ॲड. युवराज पाटील, ॲड. पुरुषोत्तम शेटे, जयवंत कुलकर्णी, शरद सुवर्णकार, आदींची उपस्थिती होते.

### वादविवाद स्पर्धेचे आयोजन

**उदगीर, दि.१६ जानेवारी -**
येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात दरवर्षीप्रमाणे स्व. लालबहादूर शास्त्री यांच्या स्मरणार्थ मराठवाडा पातळीवरील आंतरशालेय वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दि.२३ व २४ जानेवारी या दोन दिवसात संपन्न होणार आहे. हे या स्पर्धेचे हे ४५ वे वर्षे असून पाऊण लाखाच्या वर पारितोषिकांची रक्कम आहे. स्पर्धेचा विषय 'समान नागरी कायदा देशहितास साधक-बाधक' हा असून मराठवाड्यातील माध्यमिक विद्यालयातील आठवी ते दहावी या वर्गातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभाग घेऊ शकतात. तरी मराठवाड्यातील जास्तीत जास्त शाळेने सहभाग घ्यावा, असे आवाहन स्थानिक समन्वय समितीचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार, शंकरराव लासुणे, सतनप्पा हुरदळे, मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, एकनाथ राऊत, अनिता मुळखेडे यांनी केले आहे.




### जिजाऊ-विवेकानंद यांना अभिवादन

**शिरूर अनंतपाळ, दि.१६ जानेवारी -**
येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व समाजशास्त्र विभागाच्या वतीने दि.१३ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे व व्याख्याते डॉ. हंसराज भोसले यांच्या हस्ते माँ जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. अमोल इंगळे, प्रा.डॉ. पांडूरंग मुठ्ठे, डॉ. मारोती गामकवाड, ग्रंथपाल के.ए. सुर्यवंशी, प्रा. किशोर कुरे, डॉ. शिंदे जे.यु., जाधव एस.टी., श्रीकांत नागटिळक, महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी उपस्थित होते.



### भूगोल दिन व मकर संक्रांत संपन्न

**उदगीर, दि.१६ जानेवारी -**
लालबहादूर शास्त्री विद्यालयात भूगोल दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष उपमुख्याध्यापक अरुण पत्की, प्रमुख वक्ते मीनाक्षी कस्तुरे, संस्था सभासद सुलभा कुलकर्णी, सुचिता संतपुरे, कृष्णा मारावार, माधव मठवाले, किरण नमेट, आशा गौतम या मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना तिळगुळाचे वाटप करूण वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांकांवर आलेल्या सायली कुलकर्णी व क्रीडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडुंचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक श्रद्धा पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभार छाया दिक्कतवार यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.



### मोफत गणेवश वाटप

**शिरूर अनंतपाळ, दि.१६ जानेवारी -**
तालुक्यातील जि.प.प्रा. शाळा थेरगाव येथील मुख्याध्यापक मलवाडे यांनी समग्र शिक्षा अभियानांतर्गत शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या मोफत गणवेशाचे वाटप करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीच्या वतीने गणवेश खरेदी करून शाळेतील सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यात आले. जे विद्यार्थी गणवेशापासून वंचित होते त्यांना गणवेश वाटप करण्यात आले. यावेळी उपस्थित मुख्याध्यापक मलवाडे बि.आर. सहशिक्षिका जाधव एस.ए., अमर सोनवणे, भिकाजी जोगी, भरत जाधव तसेच शाळेतील लाभार्थी विद्यार्थी उपस्थित होते.



## चाकूरात मोकाट कुत्र्याने घेतला तबब्ल 12 जणांना चावा; नागरिकांत भितीचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**
**चाकूर, दि.१६ जानेवारी -**
चाकूर शहरात एका मोकाट कुत्र्याने लहान मुलांसह १२ नागरिकांवर हल्ला करून चावा घेत गंभीर दुखापत केले आहे. त्यातील ११ जखमींना चाकूर ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी लातूर येथे जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. यामुळे चाकूर शहरात जनतेमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

चाकूर शहरात एका मोकाट कुत्र्याने दि.१५ जानेवारी रोजी दुपारी ३ च्या सुमारास ३ लहान बालकांना चावा घेऊन गंभीर दुखापत केले सदरील कुत्रा अधिक हिंसक होऊन शहरातील जय भवानी गल्ली जवळील नरसिंहाच्या मळ्यात काम करणारे शेतकरी नारायण झांबरे (वय ६५), पुष्पाताई झांबरे (वय ६०) या पती पत्नींना चावा घेऊन गंभीर जखमी केले. तसेच रोहित सदानंदे (वय २५), अनिता शत्रुघन शेंडगे (वय ४५), शादुल मैनोदिन पठाण (वय ४०), रेश्मा शादुल शेख (वय ३२), गजानन नारायण झांबरे (वय ३६) यांना कुत्र्याने जावा घेऊन गंभीर जखमी केले. यावेळी सर्व बाधित रुग्णांना लातूर येथे उपचारासाठी पाठवण्यात आले आहे तसेच शिवकन्या विशाल करंजकर (वय २७) यांना चाकूर ग्रामीण रुग्णालयात उपचार करून घरी पाठविण्यात आले आहे. या हिंसक कुत्र्याने आपला मोर्चा मुक्या जनावरांकडे



वळवला यात एक बैल आणि दोन गाईना चावा घेऊन जखमी केले.

चाकूर शहरातील या कुत्र्याने चांगलीच दहशत पसरवली आहे.

आज चाकुर शहरात मोकाट कुत्र्यांने शहरातील जवळपास पंधरा लोकांना चावा घेऊन जखमी केले.

त्यामध्ये लहान बालके सुध्दा होती. याचबरोबर ७ पाळीव जनावरांचा चावा घेतला आहे. विलासराव पाटील चाकुरकर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस पार्टी चाकुर तालुकाध्यक्ष यांनी माहिती मिळताच तात्काळ ग्रामीण रूग्णालयात येऊन डॉ. लोखंडे यांच्याशी उपचारा संबंधी चर्चा केली.



> लोकांच्या तक्रारीनंतर मुख्य कार्यकारी अधिकारी प्रतिक लंबे यांनी तात्काळ नगरपंचायत स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्यांना सूचना दिल्या व त्या मोकाट कुत्र्याला पकडण्यासाठी कर्मचाऱ्यांनी शर्यतीचे प्रयत्न करून शेवटी हिंसक कुत्र्याला पकडण्यात यशस्वी झाले व नागरिकांनी हिंसक झालेल्या कुत्र्यापासून मोकळा श्वास घेतला.

वैद्यकिय अधिक्षक जितेन जैस्वाल यांच्याशी संपर्क साधला. नगरपंचायतीचे मुख्याधिकारी प्रतिक लंबे यांनाही कुत्र्याचा बंदोबस्त करावा म्हणून फोन वरुन सुचना दिली. महाराष्ट्र राज्यांचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्याशी दुरध्वनीवर संपर्क साधला.

पाटील यांनी लातुर येथील आरोग्य यंत्रणेला तात्काळ आदेश देऊन पिसाळलेल्या कुत्र्यांवरील इंजेक्शन लस लवकर उपलब्ध करण्यासाठी आदेशीत केले आहे.

## उच्चशिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे एक साधन : प्रा. आचार्य

### मकर संक्रांतीनिमित्त महिलांना कपडे वाटप...

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१६ जानेवारी -**
उच्च शिक्षण हे बुध्दीजीवी वर्गाचे क्षेत्र असले तरी मराठवाड्यासारख्या मागासलेल्या भागातील दुर्बल, मागास घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण मिळायला पाहिजे उच्च शिक्षणातूनच समाजाची प्रगती होते. उच्चशिक्षण हेच सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, असे प्रतिपादन व्याख्याते प्रा. बालाजी आचार्य यांनी केले.



अहमदपूर येथील कर्मवीर भाऊसाहेब वाघंबर परिवार व महात्मा फुले शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या वतीने मकर संक्रांतीच्या औचित्याने गोर-गरीब महिलांना कपडे वाटप व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन आणि सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शिवानंद हेगणे तर डॉ. सिद्धार्थकुमार सुर्यवंशी, प्रकाश फुलारी, गोपीनाथ जोंधळे, आर.जी. कांबळे, प्रा. बाबासाहेब वाघमारे, आशिष तोगरे, अजहर बागवान, नीलकांत पाटील, राहुल शिवपुजे, मुसा तांबोळी, स्वरूप चिर्के, सरस्वती कांबळे, वसंतराव आचार्य, सुरेख आचार्य, प्रकाश राठोड, डी.बी. कांबळे, आचल ओस्तवाल, गणेश मदने, हुसेन मणियार, भांगे, दर्शना हेंगणे, शाहूताई कांबळे, सुजीत गायकवाड, शेख अफरोज भाई, महेश गुपिले, बिराजदार, कांताबाई आचार्य, शकुंतला बनसोडे हे उपस्थित होते. यानंतर शिवानंद हेगणे व उपस्थित मान्यवरांचे हस्ते ४८५ महिलांना साडी -चोळी कपड्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरुण भाऊसाहेब वाघंबर, माधव झुबरे, बालाजी भोगे, आदित्य वाघंबर, चेतन लामतुरे, रितेश वाघम्बर, राजकुमार आचार्य, शुभम वाघम्बर, आकाश व्यवहारे, विकास व्यवहारे, अनिल वाघमारे, सुशील आचार्य, तेजस बनसोडे, अंजली वाघंबर, अश्विनी वाघंबर, दैवशाला वाघम्बर, कांताबाई आचार्य, रसिका बनसोडे यांनी परिश्रम घेतले.

## नाईकनगर आश्रम शाळेत स्वयंशासन दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१६ जानेवारी -**
तालुक्यातील माध्यमिक आश्रम शाळा नाईकनगर धसवाडी येथे वर्ग दहावीच्या विद्यार्थ्यांचा स्वयंशासन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

त्यानिमीत्त मुख्याध्यापिका म्हणून आरती बालाजी राठोड तर उपमुख्याध्यापिका गीतांजली दत्ता मिरगेवाड व पर्यवेक्षक म्हणून दिपक आत्माराम काळे यांनी उत्कृष्ट रित्या आपापल्या भुमिका पार पाडल्या.

कार्यक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक झाडे बी.आर. व पर्यवेक्षक कुकाले एन.एस. तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच आजचे शिक्षक-शिक्षिका व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सुत्रसंचालन समीक्षा सोगेवाड, वैष्णवी आयलवाड व वैष्णवी कोपनर यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक चव्हाण एल.आर. तर आभार कराड यांनी व्यक्त केले.

## आरोग्य उपकेंद्राच्या इमारतीचे लोकार्पण करा : मिरगाळे

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१६ जानेवारी -**
तालुक्यातील नणंद येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्राच्या नवीन दुमजली इमारतीचे बांधकाम होऊन एक वर्ष झाले असून अद्यापपर्यंत ही इमारत सामान्य लोकांच्या रुग्णसेवेसाठी सुरू करण्यात आलेले नाही.

संबंधित कामातील पेव्हर ब्लॉक फुटून गेले आहेत. गिलावा व्यवस्थित केलेला नाही. स्लॅब मधून काही ठिकाणी पाणी खाली गळत आहे. अशा गोष्टीची तात्काळ दुरुस्ती करून सामान्य लोकांच्या रुग्णसेवेसाठी तयार करण्यात आलेली इमारत गेली एक वर्षापासून धुळखात पडून आहे. तरी सामान्य लोकांच्या रुग्ण सेवेसाठी लोकार्पण करावे, अशी मागणी युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी गटविकास अधिकारी यांना केली आहे.

## निलंगा एसटी आगारात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान साजरा

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१६ जानेवारी -**
एस.टी आगार निलंगा येथे राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्यात आला.

जानेवारी-२०२५ मध्ये दि. ०१ जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी या कालावधीत सुरक्षा सप्ताह अभियानाचे आयोजन करण्यात येते. निलंगा एसटी आगारात आयोजित सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे उदघाटन निलंगा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक रामदास केंद्रे यांच्या हस्ते करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लातूर चे उप यंत्रअभियंता संदीप मडवी होते. यावेळी बोलताना संदीप मडवी म्हणाले रस्ता सुरक्षा अभियानास महत्वाचे घटक असलेल्या चालकांनी अपघात होणार नाही. यासाठी सतर्क राहून कर्तव्य करावे. यांत्रीकांनी वाहनांची नियमित देखभाल करावी. जेणेकरुन वाहनामुळे अपघात होणार नाही. याची दक्षता घेतली पाहिजे असे सांगितले. तसेच वाहनांच्या देखभाल दुरुस्तीसाठी लागणारे स्पेअर पार्टस पुरवठा करण्यात येईल याची ग्वाही दिली. प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामदास केंद्रे यांनी राष्ट्रीय रस्ता सुरक्षीतता अभियाना वेळी चालक, वाहक, यांत्रीक यास मोलाचे मार्गदर्शन केले. चालकांनी रस्ता वाहतुकीच्या नियमाचे पालन करावे, वाहन चालविताना मोबाईलचा वापर करु नये. याबाबत मार्गदर्शन केले. आगार प्रमुख अनिल बिडवे यांनी चालकांना त्यांचे कर्तव्य करीत असतांना शिस्त व दक्षतापुर्वक आपले कर्तव्य करावे व यांत्रीकांनी गाडयांचे कामे वेळोवेळी करावे व दोषमुक्त वाहने मार्गावर देण्यात यावे असे सांगितले.

कार्यक्रमास विभागीय कार्यालयाचे वाहतुक निरिक्षक देशमुख शिवकुमार, सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक मच्छिंद्र कोळी, वाहतूक निरीक्षक ऋषि जगदाळे, सहाय्यक वाहतूक निरिक्षक अण्णासाहेब जाधव व राजेंद्र बिराजदार, शामराव येरनवाड, शरद शिंदे, प्रमोद जिवणे, स्वप्नील इगवे, राजू खंदकुरे, गोबाडे, बिराजदार कार्यक्रमास चालक, वाहक, यांत्रीक प्रशासकीय कर्मचारी मोठया प्रमाणात उपस्थीत होते.

## प्रा. अनिल चवळे यांचा नवी मुंबई येथे सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१६ जानेवारी -**
अहमदपूर येथील गेले अनेक वर्ष पर्यावरण वृक्ष लागवड व वृक्ष चळवळ या क्षेत्रात कार्य करणारे, रोटरी डिस्ट्रिक्ट थ्री वन थ्री टू चे पर्यावरण संचालक अनिल चवळे यांचा या क्षेत्रातील उत्कृष्ट व सातत्यपूर्ण कार्य बद्दल नवी मुंबई नेरूळ येथे तेरणा चॅरिटेबल ट्रस्ट, रायझिंग अँड ग्रीन मराठवाडा, एम.एस. बिडवे इंजीनियरिंग कॉलेज व इंजीनियर्स असोसिएशन मुंबई यांच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन त्यांचा कार्याचा गौरव करण्यात आला.

## खेळातून व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व विकसित होते : डॉ. गोपाळ मोघे

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१६ जानेवारी -**
मानवी जिवनात खेळ हा अतिश्य महत्वाचा असुन, खेळाला प्राचीन संस्कृती आहे. प्रत्येक जण आपआपल्या आवडीनुसार खेळ खेळून आपले व्यक्तीमत्व विकसीत करीत असतो, असे मत महाराष्ट्र महाविद्यालयाचे क्रिडा संचालक डॉ. मोघे यांनी कुस्तीपटू स्व. खासाबा जाधव यांच्या जयंतीनिमित दि.१५ जानेवारी रोजी राज्य क्रिडा दिनानिमित या शिवनेरी महाविद्यालयातील आयोजीत कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे सचिव पदमाकर मोगरगे हे होते. तर यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. अरुण धालगडे, क्रिडा संचालक प्रा. बालाजी हालसे स्टॉफ सेक्रेटरी प्रा. शाम कांबळे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. मोघे म्हणाले की खेळामुळे व्यक्ती प्रसन्न राहते. निरोगी जीवन शैलीमुळे त्याचे व्यक्तीमत्व प्रसन्न दिसते. व्यायामुळे व्यक्तीची दृष्टी सकारात्मक बनते. व्यक्तीमत्वाचे स्वभाव गुण-रूप, स्वभाव, वर्तणूक, दृष्टिकोन, चारित्र्य, बुद्धिमत्ता, कौशल्य, भाव, भावना, संवेदन शीलता, लोकसंग्रह, गुण, अवगुण, सामाजिक प्रतिमा या सर्व गोष्टी खेळामुळे विकशीत होतात, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. अरुण धालगडे व संस्था सचिव पदमाकर मोगरगे यांनी ही मार्गदर्शन केले.




कार्यक्रमाचे प्रस्तावीक क्रिडा संचालक प्रा. बालाजी हालसे यांनी केले तर आभार प्रा. शाम कांबळे यांनी मानले.

## तहसिलदारांच्या आश्वासनाने प्रलंबित शेतरस्त्याचा मार्ग मोकळा

**सात दशकानंतर का होईना उजनी-धुता गावाचा प्रश्न सुटणार; शेतकऱ्यांना सर्वाधिक फायदा..**

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१६ जानेवारी -**
गेल्या अनेक वर्षापासून रस्ता करण्याची मागणी असूनही केवळ अर्धवट मातीकामावरच बोळवण करुन आहे तो रस्ता बिघडावला. यानंतर या ना त्या कारणांनी गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला रस्ता करावा, अशी मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राज पाटील यांनी या परिसरातील शेतकऱ्यांना सोबत घेऊन तहसिलदार यांच्याकडे केली. शेतकऱ्यांना व दोन गावातील गावकऱ्यांना होत असलेली अडचण तात्काळ लक्षात घेऊन लवकरच या रस्त्याची पाहणी करुन रस्त्याचा विषय मार्गी लावू, असे आश्वासन तहसिलदार घनशाम अडसुळ यांनी शेतकऱ्यांना दिले. यामुळे सात दशकापासून प्रलंबित असलेल्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

औसा तालुक्यातील उजनी येथील तेरणा नदीकाठचा उजनी-धुता या दोन गावांना जोडणारा. तसेच या दोन्ही गावातील जवळपास हजारो हेक्टरावरील शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्वाचा रस्ता आहे. रस्ता काळ्या मातीचा असल्याने पावसाळा सुरु झाल्यापासून ते जवळपास नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यापर्यंत या रस्त्यावरुन शेतकऱ्यांना शेती कसण्यासाठी व धान्याच्या राशी घेऊन येण्यासाठी अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. अनेक वर्षे मागणी केल्यानंतर कांही वर्षापुर्वी या रस्त्यावर मातीकाम करण्यात आले. या झालेल्या मातीकामामुळे पावसाळ्यात शेतकऱ्यांना शेताकडे जाण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

हा मार्ग जेवढा शेतकऱ्यांसाठी महत्वाचा आहे, तेवढाच धुता व उजनी गावातील गावकऱ्यांसाठी महत्वाचा आहे. या रस्त्यामुळे या दोन गावातील अंतर इतर मार्गापेक्षा अर्ध्याहून अधिक कमी होणार आहे. या दोन्ही गावासाठी सर्वाधिक




जवळचा हा रस्ता असून गेल्या सात दशकापासून दुर्लक्षित आहे. अशा तीन किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे आ. अभिमन्यू पवार यांच्या आमदार निधीतून दोन किलोमिटरचे मातीकाम झाले आहे. उर्वरीत १ किलोमीटरचे काम रस्त्यालगतच्या शेतकऱ्यांनी अडविल्यामुळे अर्धवट अवस्थेत आहे. यामुळे या रस्त्यावरील शेतकऱ्यांना पेरणीपासून ते राशी घरी आणण्यापर्यंत अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. यामुळे या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन रस्त्याचा प्रश्न कायमस्वरुपी सोडवावा, अशी मागणी तहसिलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. या रस्त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तहसिलदार घनशाम अडसुळ यांनी या रस्त्याची स्वताः पाहणी करुन लवकरात लवकर प्रश्न सोडवू असे आश्वासन दिले आहे.

यावेळी अनिल कळबंडे, योगिराज ढवण, शिवाजी खराडे, रईस शेरीकर, अमोल चव्हाण, शेरीकर, तुकाराम ढवण, बशीर शेरीकर, गोकुळ कळबंडे, पांडुरंग ढवण, कालीदास ढवण, उत्तम ढवण, नानुद्दीन मुलाणी, राम ढवण, नशीर शेरीकर यांच्यासह शेतकरी यावेळी उपस्थित होते.